म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : २२६८५

IRBK-0122685

॥ श्री ॥

# भाऊबंदकी

लेखक

श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

IRBK-0122685

दहावी आवृत्ती, ऑक्टोबर १९८०

© नीलकंठ खाडिलकर

किंमत सहा रुपये

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४०० ००४

प्रकाशक :
नीलकंठ खाडिलकर
नवाकाळ प्रेस
शेणवीवाडी,
खाडिलकर रस्ता,
गिरगांव, मुंबई ४०० ००४

म. ग्रं.
वा. क्र. २२६५५
वि. .. ना१८७

# प्रस्तावना

श्री. नारायणराव पेशवे यांच्या वधानें आरंभ करून राघोबादादाच्या कारकीर्दीचे अखेरपर्यंत महाराष्ट्रांत माजून राहिलेल्या भाऊबंदकीचें वर्णन ह्या नाटकांत केलें आहे. प्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. वासुदेवशास्त्री खरे यांनीं प्रसिद्ध केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांचा व लेखांचा आधार या नाटकांतील ऐतिहासिक स्वभाववर्णनांना व विधानांना असून नाटकाचे सोईसाठीं कांहीं ठिकाणीं कथाभागास थोडेसें काल्पनिक वळण देण्यांत आलें आहे. आनंदीबाई, राघोबादादा, रामशास्त्री, सखाराम बापू, नाना फडणवीस, सुमेरसिंग, तुळोजी पवार वगैरे ऐतिहासिक पात्रांशिवाय नमकशास्त्री, चमकशास्त्री, म्हाळसा, दुर्गा, भिकंभट, आनंदीबाईच्या दासी वगैरे काल्पनिक पात्रें घरगुती व सामाजिक भाऊबंदकीचीं चित्रें वाचकांपुढें मांडून रसवैचित्र्यानें मूळ विषयास उठाव देण्याकरितां ह्या नाटकांत योजिलेलीं आहेत.

ह्या पुस्तकांत घातलेलीं चित्रें महाराष्ट्र नाटक मंडळींतील नटांच्या त्या त्या प्रसंगांच्या फोटोवरून तयार केलेलीं आहेत. नाटक पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यापूर्वीं रंगभूमीवर याचा प्रयोग पहाण्याची संधी देऊन कांहीं उपयुक्त सूचना केल्याबद्दल व चित्रांकरितां फोटो दिल्याबद्दल 'महाराष्ट्र नाटक मंडळी'चा मी आभारी आहे.

पुणें, ता. १ नोव्हेंबर १९०९

ग्रंथकर्ता.

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

या आवृत्तींत दुसऱ्या अंकाचे प्रारंभीं रंगभूमीचे सोईसाठीं एक अधिक प्रवेश घातला आहे. इतर फेरफार किरकोळ आहेत.

पुणें, ता. १५ ऑक्टोबर १९१०

ग्रंथकर्ता

## नाट्याचार्य श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांची इतर नाटके

- संगीत सावित्री
- संगीत त्रिदंडी संन्यास
- संगीत मेनका
- संगीत द्रौपदी
- संगीत स्वयंवर
- संगीत मानापमान
- संगीत विद्याहरण
- संगीत बायकांचें बंड
- कीचकवध
- प्रेमध्वज
- कांचनगडची मोहना
- सत्त्वपरीक्षा
- सवाई माधवराव यांचा मृत्यू
- सवतीमत्सर

# भाऊबंदकी

## अंक पहिला
### प्रवेश पहिला

[स्थळ : शनवारवाड्यांतील एक दिवाणखाना, एका बाजूनें भवानराव प्रतिनिधी, सखाराम हरि व दुसऱ्या बाजूनें व्यंकटराव आणि लक्ष्मणराव असे प्रवेश करितात.]

भवा० : सखारामपंत, आजचा हा सूर्य अस्तास जाण्यापूर्वी दादासाहेब पंतप्रधान झाल्याची द्वाही पुणें शहरांत फिरणार, अशी मला खात्री वाटूं लागली आहे.

सखा० : गारदी जर बेल-भंडाऱ्याला जागले तर दादासाहेबांच्या ऐवजी नारायणराव कैदेंत पडतील व आपल्या पक्षाचा अंमल चोहोंकडे सुरू होईल.

भवा० : या व्यंकटराव, या लक्ष्मणराव, या दोस्त या; पर्वतीहून सर्व मित्र मंडळी इकडे यावयास निघाली ना ?

व्यंक० : हो! निघाली. गारदी आतां इतक्यांत येऊन पोंचतील, ही वर्दी आपणांस देण्यास आम्ही पुढें आलों.

सखा० : पर्वतीहून निघतांना सुमेरसिंग, खरकसिंग, महमद, ह्यांनीं ठरल्याप्रमाणें तुमच्यापुढें पुन्हां आणा-शपथा घेतल्या ना ?

लक्ष्मु० : हो! त्यांनीं पुन्हां आणा-शपथा घेतल्या; काल त्यांनीं आपल्या हातावर—मराठी राज्याच्या प्रतिनिधीच्या हातावर बेल-भंडारा उचलून दिलाच आहे, व आज हा बेल-भंडारा बाईसाहेबांच्या हातीं देण्याकरितां आतां आमचे स्वाधीन केला आहे.

भवा० : दोस्त हो, गारद्यांकडून बेल-भंडारा उचलून देवविण्याचे कामीं

दादासाहेबांवर व आम्हां सर्व मंडळीवर तुमचे उपकार झाले आहेत. मुधोजी भोसल्यांनीं वऱ्हाडांतून जर तुम्हांला ह्या प्रसंगीं पुण्यास पाठविलें नसतें, तर हें गारद्यांचें कारस्थान कांहीं इतक्या चांगल्या रीतीनें जमलें नसतें.

सखा० : एकट्या तुळोजी पवारावर अवलंबून आम्ही काय करणार होतों!

भवा० : छे! छे! खिजमतगारांच्या हातून हीं कामें का होत असतात? व्यंकटराव, लक्ष्मणराव यांच्यासारखीं जर भलीं माणसें ह्या कारस्थानांत नसतीं, तर मी पहिल्यापासूनच अंग काढून घेतलें असतें! मुधोजीरावांना ह्या वेळीं तुम्हांलाच इकडे पाठविण्याची बुद्धि झाली, तेव्हां परमेश्वरच आम्हांला अनुकूल आहे म्हणायचा!

व्यंक० : मुधोजीरावांना ह्या कामांत न पडून कसें भागलें असतें? साबाजी-रावांच्या सैन्याला त्यांनीं इतका वेळ थोपवून धरलें खरें; पण पेशव्यांच्या सांगणीवरून आतां निजामाचें सैन्य साबाजीच्या मदतीला आलें आहे व खुद्द हुजुरातीला तयार होण्यास आज्ञा झाली आहे.

लक्ष्मु० : शनवारवाड्यांचे ह्या कैदखान्यांतून दादासाहेबांना मोकळे करून नाशिक-खानदेशच्या त्यांच्या जहागिरींत त्यांना नेऊन सोडल्याशिवाय पेशव्यांना व निजामाला पायबंद लागणें शक्यच नाहीं. मुधोजीरावांचा— आमच्या सर्वांचा—प्राण आज दादासाहेबांना बंधमुक्त करण्यावर अवलंबून आहे.

व्यंक० : दादासाहेबांना बंधमुक्त करण्याची प्रतिज्ञा करून आम्ही मुधोजीरावां-पासून निघालों, त्याच वेळीं पांच लाख रुपये खर्चाला आमच्या पदरीं त्यांनीं टाकले. त्यांपैकीं तीन लाख रुपये गारद्यांच्या ह्या मदतीसाठीं आम्हीं त्यांना दिले व दोन लाखांत एक हजार घोडा जमा करून ते सैन्य आज गारपिराच्या आसपास ठेविलें आहे.

लक्ष्मु० : आतां गारद्यांनीं दादासाहेबांना वाड्याबाहेर काढून त्यांना गारपिरावर आणले म्हणजे गारदी, आम्ही व दादासाहेब, नगरचे रस्त्याला लागलोंच म्हणून समजा. पेशव्यांचें सैन्य पुण्यास सध्या बेताचेंच आहे; तेव्हां हरिपंतानें किंवा मामांनीं, अगर हुजुरातीच्या पागांनीं पाठलाग केला, तरी आमचें कारस्थान वायां जाणार नाहीं.

व्यंक० : मुधोजीरावांपाशी केलेल्या प्रतिज्ञेतून आम्ही आतां बहुतेक मुक्त झालों.

भवा० : तुम्हांला जसें यश आलें, तसें आम्हांलाही यश आल्यासारखेंच आहे; कारण बाईसाहेबांच्या हातीं देण्याकरितां गारद्यांनीं तुम्हापाशीं वेलभंडारा उचलून दिला आहे.

लक्ष्मु० : हो! हा वेल–भंडारा आपल्या हातीं घ्या. ह्यासंबंधाने गारद्यांची अट एवढीच आहे कीं, शनिवारवाड्याच्या चौक्या गारद्यांनीं ताब्यांत घेऊन दादासाहेबांना बंधमुक्त केल्यावर आमच्या शपथेतून ते मोकळे झाले. त्यानंतर नारायणरावांसंबंधानें जर दादासाहेबांच्या मनांत गारद्यांना कांहीं हुकूम करावयाचा असला, तर स्वतःच्या सहीशिक्क्यानिशीं त्यांनीं तसा लेखी हुकूम केला पाहिजे.

व्यंक० : लेखी हुकूम पाहिजे, असा त्यांचा हट्ट आहे. त्यांतलें कारण असें आहे; पूर्वी माधवरावसाहेब व दादासाहेब चुलते-पुतणे भांडून जसे पुन्हा एक झाले तसे नारायणरावसाहेब व दादासाहेब पुन्हा एकच व्हावयाचे आणि गारदी मात्र तोंडघशीं पडावयाचे. पाणी काठीनें किती तोडलें, तरी अखेरीस एकच व्हावयाचें; तेव्हां काठीनें प्रथमपासून आपल्या बचावाची व्यवस्था केली पाहिजे.

सखा० : खरें आहे आणि ह्या अटी बाईसाहेबांनीं व दादासाहेबांनीं पूर्वीच कबूल केल्या आहेत.

व्यंक० : आणि पांच लाख रुपये बक्षीस देऊं; असेंही वचन पाहिजे.

भवा० : तेंही दादासाहेबांनीं कबूल केलें आहे.

व्यंक० : बरें तर! आम्हीं जातों. आता इतक्यांत गारदी येतील; नारायणरावसाहेबांना उलट कैदेंत टाकण्याचा आपला बेत सिद्धीस गेला, तर उत्तमच आहे. पण तसें साधलें नाहीं, तर दादासाहेबांनीं एकदम गारपिरावर यावें. आमचे हजार जवान घोड्यावर जीन घालून एक पाय रिकिबींत ठेवून नगरचे रोखाने घोड्यांचीं तोंडें फिरवून तयार आहेत म्हणून समजा.

लक्ष्मु० : एक गोष्ट प्रतिनिधीसाहेबांना विचारावयाची आहे. नारायणरावसाहेबांना अटकेंत ठेवण्याचें ह्या कटांत कारभारी सखारामबापू यांचें अंग आहे ना?

व्यंक० : दादासाहेबांना मुक्त करून मुधोजीरावांना नागपूरची गादी देण्याचे आमचे बेताला त्यांची संमती आहे. पण श्रीमंतांसंबंधानें—

भवा० : ही गोष्ट कारभाऱ्यांच्याजवळ काढली होती; पण दादासाहेबांना नाशिक

—खानदेशाची जहागीर तोडून देऊन मुधोजीरावांची नागपुरास स्थापना झाल्यावर धाकटे श्रीमंत पुण्याचे गादीवर असले तरी आपल्या पक्षास कशाची भीति नाहीं, असें त्यांचें मत आहे. थोरले श्रीमंत व मुधोजीराव ह्यांचा शह धाकट्या श्रीमंतांना नेहमी राहील व कारभाऱ्यांच्या मर्जीबाहेर धाकटे श्रीमंत जाणार नाहींत. अशा स्थितींत कर्त्या–सवरत्या दादासाहेबांपेक्षा अल्लड धाकटे श्रीमंतच सखारामबापूंच्या स्वतंत्र कारभारास अधिक चांगले; म्हणून तो धूर्त म्हातारा नारायणरावसाहेबांच्या अटकेच्या कटाला अनुकूल नाहीं.

लक्षु० : मग आमच्या सर्व बेतावर तो कारस्थानी म्हातारा विरजण घालणार काय ?

सखा० : नाहीं; दादासाहेबांना मोकळे करून भोंसल्यांच्याकडे पाठवावयाचें; ह्याच्या पलिकडे आम्ही जाणार नाहीं, असें त्याला भवानरावांनीं आश्वासन दिलें आहे !

भवा० : ह्यामुळें कारभाऱ्यांचे डोळे जागच्या जागीच सांप्रत थंड आहेत. एकदां त्या पोराला कैदेंत टाकल्यावर कारभारी दादासाहेबांच्या विरुद्ध थोडेच जाणार आहेत ?

व्यंक० : हो ! हें सर्व ठीक आहे. बरें आम्ही आतां गारपिरावर जातों. आपण बाईसाहेबांचे हातीं बेल-भंडारा देऊन तेवढा लेखी हुकूम आपल्याजवळ ठेवून घ्या, आणि आतां इतक्यांत गारदी आले म्हणजे त्यांच्या हातांत तो हुकूम द्या म्हणजे झालें—येतों आम्ही.

(व्यंक० व लक्षु० जातात)

भवा० : थोरले श्रीमंतांची सही बाईसाहेब गारद्यांच्या हुकुमावर घेणार होत्या ना ?

सखा० : होय. या पहा बाईसाहेब इकडेच येत आहेत. सही झाली किंवा कसें तें आतां समजेल.–त्या पहा; बरोबर तुळोजी पवार आहे.

(आनंदीबाई व तुळोजी येतात.)

आनंदी० : नारायणाच्या नुसत्या मुसक्या बांधून चालायचें नाहीं.

तुळो० : श्रीमंत सरकारची जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें मी व गारदी वागण्यास तयार आहों.

आनंदी० : तुळोजी, आमचे पक्षाच्या माणसाचा अभिमान तिकडे किती आहे ठाऊक आहे तुला ? तुझ्या पाठीवर नारायणानें मारलेले फटके स्वतःच्या पाठीवर मारल्यासारखे आहेत, असें तिकडे वाटतें.

तुळो० : दादासाहेबांची मजवर तशीच मर्जी आहे.

आनंदी० : आणि नारायणाच्या पाठीवर तुझ्या हातानें ओढलेले कोरडे पाहिल्याशिवाय माझें मन स्वस्थ व्हावयाचें नाहीं.

तुळो० : चाकराबद्दल धन्यांनीं इतका अभिमान धरल्यावर कसलीही बिकट कामगिरी असली तरी चाकर कधीं माघार घेणार नाहीं.

आनंदी० : पण कायरे, नारायणाच्या पाठीवर तूं फटके मारलेस आणि नारायण पुन्हां केव्हां तरी पेशव्यांच्या गादीवर बसला तर तुझें काय होईल?

तुळो० : आम्हां चाकरांना हें काय माहीत! धन्याची जी गत, ती चाकरांची; आणीक काय होणार आहे?

आनंदी० : आम्ही आतांच्याप्रमाणें पुन्हां कैदखान्यांत पडूं; पण मला बाई वाईट वाटतें; तुळोजी, तुझ्या पाठीवर तलवारीच्या धारेच्या चाबकाचे फटके मारल्याशिवाय मग नारायण कांहीं राहणार नाहीं—हा विचार मनांत आला म्हणजे वाटतें, आम्ही कैदखान्यांत आहों, तेंच बरें—सखारामपंत, हें हातांत काय आहे?

सखा० : सरकारचे हातांत देण्याकरितां हा वेल-भंडारा गारद्यांनीं पाठविला आहे.

भवा० : श्रीमंत करतील, तो हुकूम पाळण्यास गारदी तयार आहेत.

आनंदी० : भवानराव, मला वाटतें, आम्ही कैदेंत आहों, तेंच चांगलें.

भवा० : तें कां बरें बाईसाहेब! गारदी आतां इतक्यांत येऊन पोंचतील आणि बाईसाहेबांचा हा असा विचार! मग आम्ही सर्व तोंडघशीं पडलों म्हणावयाचें!

आनंदी० : हो; असें झालें खरें. पण वर्ष दोन वर्षांनीं तोंडघशीं पडून सर्व दांत पडण्यापेक्षां आज सर्व दांत शाबूत ठेवून तोंड फिरवलेलें काय वाईट?

भवा० : ते कसें बाईसाहेब?

आनंदी० : बापू कांहीं तुम्हांला अनुकूल नाहींत.

भवा० : पण ते आमच्याविरुद्ध खास जाणार नाहींत.

आनंदी० : अहो, त्या बापूच्या मनासारखे जर झालें नाहीं, तर पुन्हां नारायण गादीवर बसला म्हणून समजा. वर्ष सहा महिनेच काय तो आमचेकडे पंतप्रधानाचा हुद्दा व तुमचेकडे कारभार!

भवा० : पण आम्ही तेवढ्या अवधींत नारायणाचा एकाद्या किल्ल्यावर पक्काच बंदोबस्त करून टाकूं.

आनंदी० : खरें आहे. बरें पण काय हो, आज नारायणानें आपल्याकडून आमचा नाहीं का बंदोबस्त केला आहे? आज तशी त्याची गत, तशीच उद्यां आमची! 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' असलीं कारस्थानें तुम्हीं किती दिवस करीत बसणार देवाला ठाऊक! मला तर बाई ह्याचा कंटाळा आला आहे. रोज मरावयाचें व रोज जन्माला यावयाचें!

भवा० : पण बाईसाहेब, हें रहाटगाडगें मनुष्यप्राण्याचे मागें कायमचें लागलें आहे.

आनंदी० : ज्याला ह्या रहाटगाडग्यांतून सुटून कायमचा सोक्षमोक्ष करून घेतां येत नाहीं, तो मनुष्य कसला?

सखा० : सरकार, हा वेदांत आतां नको. गारदी आतां इतक्यांत येऊन पोंचतील. तेव्हां लेखी हुकमाची काय वाट?

आनंदी० : लेखी हुकुमांत जसे शब्द असतील तसे करायला गारदी तयार आहेत काय?

सखा० : हो तसा त्यांनीं बेलभंडारा उचलून दिला आहे.

तुळो० : मजपाशीं तर ते म्हणत होते, सरकारांनीं हें भिजत न ठेवतां कायमचा सोक्षमोक्ष करून घ्यावा.

भवा० : मोक्षप्राप्तीला मोठी तपश्चर्या लागते!

आनंदी० : माझी तपश्चर्या लहानसहान नाहीं. तुम्ही मात्र मोक्ष दृष्टीस पडू लागला म्हणजे डगमगूं नका.

भवा० : दादासाहेबांनीं पुण्याच्या गादीवर बसावें, अशी आमची खटपट आहे.

आनंदी० : आणि आपल्या पक्षाचा विजय कायमचा टिकावा, अशी माझी खटपट आहे. तुम्ही या गोष्टीस विरुद्ध नाहींना?

भवा० : आम्ही कसे विरुद्ध असूं? नारायणाला धरण्यासंबंधानें तेवढें पत्र बाईसाहेबांनीं आमचे स्वाधीन करावें. म्हणजे गारदी आले कीं त्यांच्या हातांत तें पत्र आम्ही टाकूं.

आनंदी० : नाही, तसें नाहीं, गारदी आले कीं त्यांना येथें पाठवून द्या. तिकडच्या समक्ष त्यांच्या हातांत मी हुकूम देईन.

(पडद्यांत गलबल.)

तुळो० : सरकार, गारदी आले वाटतें.

आनंदी० : भवानराव, ज'—त्यांना म्हणावें, नारायणाला घेऊन इकडे या. जा लवकर. (भवानराव जातो.) सखारामपंत, तुम्ही तिकडे जाऊन विनंती करा,

म्हणावें आतां घटका दीड घटका माझ्या महालांत येऊन बसलें पाहिजे. जा, त्यांना लवकर घेऊन इकडे या.

(सखाराम जातो.)

आनंदी० : तुळोजी, तुझ्या खऱ्या परीक्षेची वेळ आतां आहे. हें पहा, तूं गारद्यांच्या पाठीवर रहा व आम्ही हुकूम करूं तसे वागायला जर गारदी कां कूं करूं लागले तर—

तुळो० : सरकारनीं मला हुकूम करावा.

आनंदी० : तलवारीच्या धारेचा चाबूक पुढें केव्हांही तुझ्या पाठीवर मारला जाऊं नये, अशी तुझी इच्छा आहे ना?

तुळो० : हें काय विचारावें सरकार!

आनंदी० : पुढचें भय आज निर्मूळ उपटून टाकावें, म्हणतें.

तुळो० : दादासाहेब, ह्या गोष्टीला कबूल आहेत ना पण ?

आनंदी० : हा माझ्या हातांत लेखी हुकूम आहे.

तुळो० : लेखी हुकुमाप्रमाणें वागायला सर्व गारदी तयार आहेत.

आनंदी० : पण तूं तयार आहेस की नाहीं?

तुळो० : मी कसा तयार असणार नाहीं सरकार?

आनंदी० : ठीक. जा, गारद्यांच्या पाठीवर ऐस. आमची खरी भिस्त तुझ्यावर आहे हें ध्यानांत ठेव.

(तुळोजी जातो.)

आनंदी० : (हुकूम वाचून स्वगत) आम्ही जसा हुकूम करूं तसे वागायला जर गारदी तयार आहेत, आणि आणाशपथा म्हणून जर त्यांनीं बेल-भंडारा उचलून दिला आहे, तर नारायणाला 'धरावें' असा मिळमिळीत हुकूम कशाला केला?—पराक्रम करून धनदौलत कमवायची कशी, हें पुरुषांना समजतें, पण घरांत चालून आलेली लक्ष्मी घरांतच कशी कोंडून ठेवावयाची, ही अक्कल पुरुषांनीं बायकांपासून घेतली पाहिजे.—पुरुषांचा पुरुषार्थ बायकांमुळें पिढ्यानपिढ्या कायमचा टिकतो.—पुरुष चंचल वृत्तीचे व प्रसंगापुरता विलक्षण चमत्कार करून दाखविणारे; बायका स्थिर आणि गंभीर असून पुरुषांचे कामाला टिकाऊ स्वरूप देतात,—'नारायणाला धरावें.' धरावें काय म्हणून? 'मारावें' असें पाहिजे. एकदां आपल्या अंगावर पेशवाईचीं वस्त्रें पडलीं म्हणजे गंगेला घोडें न्हाइलें, असें तिकडे वाटतें; पण तिकडच्या

अंगावरचीं तीं अधिकाराचीं वस्त्रें माझ्या पोटीं जन्मलेल्या पेशव्याचे अंगावर झळकलेलीं पाहिल्याशिवाय मला कसें समाधान वाटेल? नारायणाला जिवंत ठेविला—आणि बाईंनीं पुन्हां कारस्थान केलें—आणि साठ्यांची ती पोर—कालची ती गंगटी—अधिकाराच्या तोऱ्यानें माझी सासू पुन्हां होऊन बसली—मला नाहीं ग बाई सहन व्हायचें. मी 'ध' चा 'मा' करणार. (आनंदीबाई 'ध' चा 'मा' करते. दादासाहेब येतात.)

दादा० : तूं ह्या वेळी लिहीत काय बसली आहेस; तुला हा गोंगाट नाहीं एकूं येत?

आनंदी० : खरेंच गडे, बरें वेळेवर येणें झालें—आतां इतक्यांत नारायणाला घेऊन गारदी येथें येतील—ही गडबड तीच आहे—आणि गारद्यांना द्यावयाचा लेखी हुकूम तयार नाहीं; तेव्हां थोडेसें लिहीत होतें. बापू नेहमीं म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं; इकडे सगळी तरवारबहादुरी; कलम कसें तें ठाऊक नाहीं.

दादा० : अग, आम्हीं पेशव्यांनीं कलमदानाचे धनी फडणविसांना केलें आहे ना?

आनंदी० : समरांगणावर तरवार गाजवून वैभव आपण वीरांनीं मिळवावें आणि कारभारी म्हणविणारांनीं लेखणीनें आपला गळा सोडवावा, ह्याचें मला वाईट वाटतें. खरोखर गडे, मला सांगायचें होतें, आपल्यासारखा पराक्रमी वीर आज एक तरी महाराष्ट्रांत आहे काय? असला तर मी हा हुकूम असाच्या असा फाडून टाकतें.

दादा० : पण त्या गोष्टीचा आणि ह्या हुकुमाचा काय संबंध?

आनंदी० : अटकेच्या पलीकडे भगवा झेंडा ज्या नरवीरानें नाचविला ते आपणच ना? इराणी दुराणीचा पंजाबांतील अंमल ज्या पराक्रमी पुरुषानें उठवला, ते आपणच ना? पानिपतच्या लढाईत जे सेनानायक हजर नव्हते म्हणून दख्खन बुडाली असें सर्व जग म्हणत आहे, ते वीरमणी आपणच ना? ज्यांच्या नांवाचा निजाम अल्लीला व हैदरला अत्यंत दरारा वाटतो, ते शौर्यसागर आपणच ना?

दादा० : हो! सगळें खरें. ज्याचें नांव ऐकलें म्हणजे हैदर, निजाम, रोहिले, पठाण सर्व भीतीनें कांपत राहतात, तोच मी राघो भरारी; रणांगणावरील ज्याच्या अतुल पराक्रमाचें वर्णन ऐकत असतांना असल्या सुंदर रमणीच्या

मनांत प्रेमाच्या लहरी उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहींत, तोच मी तुझा राघू मनोहारी!—पण ह्या हुकुमाशीं काय संबंध?

आनंदी : खरें खरें सांगू का गडे; आपले शत्रू, तो कालचा माधव किंवा आजचा हा नारायण, ह्यांच्यापेक्षां पेशव्यांच्या गादीवर बसण्यास आपण शतपटीनें—सहस्रपटीनें—लायक—

दादा० : नारायणाला धरण्यासंबंधानें गारद्यांना हुकूम लिहून तुझ्यापाशीं दिला ना? आतां पुन्हां—

आनंदी : होय गडे, पण—बायकांना हें सगळें बोलून दाखवायला लाज वाटते हो.—पण माझ्या मुलानें सवाई राघो भरारी होऊन वडिलांनंतर पेशव्यांचे गादीवर बसावें असें मला वाटतें. माझी ही हौस पुरवायची ना? पुरवायची ना? होय ना?—'होय' म्हटल्याशिवाय मी सोडायचीच नाहीं.

दादा० : पण पेशव्यांचा मान वडील घराण्याकडे नको का चालायला?

आनंदी : वडील घराणें! वडील घराणें!!—तो नारायण—तें शेंबडें पोर—नकटें असलें तरी पेशव्यांच्या गादीवर; आणि आपण सर्वांगसुंदर पण धाकटे म्हणून कैदखान्यांत! नाहीं गडे, मला हें बिलकूल सहनच करवत नाहीं. आपण बसायचें ना पेशव्यांच्या गादीवर—बसायचें ना—माझा मुलगाही पेशवा होणार ना?—होणार ना?

दादा० : माझ्या वडिलांच्या—त्या पुण्यप्रतापी बाजीरावसाहेबांच्या गादीवर मीं बसूं नयेसें मला कसें वाटेल? तुझ्या पोटीं बाजीराव पुन्हां जन्मास येऊन त्यांनीं पुन्हां पेशव्यांचे गादीवर बसूं नयेसें माझ्या मनांत कसें येईल? पण नुसती इच्छा असून काय उपयोग? ही गोष्ट माझ्या हातची नाहीं; आणि—

आनंदी० : न असायला काय झालें? गारद्यांना द्यावयाच्या आपल्या ह्या हुकुमांत थोडीशी मी दुरुस्ती केली आहे, ती आपल्या हातची नाहीं, असें म्हणूं नका म्हणजे झालें. मग आपल्या मनासारखें सर्व घडून येईल.

दादा० : पाहूं काय दुरुस्ती केली आहेस ती? (आनंदीबाई पत्र देते; तें वाचून) धरावें—मारावें—ही दुरुस्ती—मारावें कीं धरावें—धरावें कीं मारावें—राज्याधिकाराला कंटाळून कित्येक वेळां अग्निहोत्र घेण्याची मीं तयारी केलेली असली, तरी पेशवा व्हावेंसें मला वाटतें; पुत्रप्राप्तीची माझी बरीच निराशा होऊन मीं दत्तक घेतला असला तरी तुझ्या पोटीं जन्मास येणाऱ्या पेशव्याचेंही

नांव माझ्या वडिलांप्रमाणें नेहमीं लोकांच्या तोंडांत रहावें असें मला वाटतें; —पण—पण—मारावें—नको—नको—धरावेंच असूं दे—नारायणाचा जर मीं खून केला तर—

आनंदी० : तर—तर—तर काय? पेशव्यांची गादी आपल्या पुत्रपौत्रांकडे चालेल हो!

दादा० : पेशव्यांची गादी माझ्या पुत्रपौत्रांकडे चालेल!—चालेल खरी—पण ह्या भयंकर पापामुळें माझ्या पुण्यशील पूर्वजांनीं माझ्या कुळांत जन्म घेण्याचें नाकारिलें, तुझ्या पापी पोटांत माझ्या वाडवडिलांनीं नवीन अवतारापूर्वीचें पुन्हा शयन केलें नाहीं, आणि रिकाम्या पडलेल्या जागेवर तुला मला शासन करण्याकरितां—एखाद्या दुरात्म्याची परमेश्वरानें भरती केली, तर नारायणाच्या खुनामुळें मला मिळणारी गादी माझ्या त्या कुलांगार पुत्रपौत्रांकडे तरी चालून काय करायची? आनंदी, नाना प्रकारचीं कारस्थानें करून, अनेक लढाया जिंकून, आणि अटकेच्या पलिकडे पुन्हां भगवा झेंडा नेल्यानें प्रजाजनांना उत्साही व आनंदी करून, पेशव्यांच्या गादीवर स्वपराक्रमानें बसण्याची माझी इच्छा आहे. पण खून नको. नारायणाच्या खुनाच्या पापाशीं बिलगून असणारीं दुष्ट पिशाच्चें तुझ्या व माझ्या रक्तांत त्या पापाबरोबर मिसळून आमच्या अपत्याचें रूप घेतील व पेशवाईस आपल्या दुष्ट बुद्धीच्या दिवट्यांची आग लावतील, ही मला भीति वाटते—आनंदी, तुझ्या गोड चेहऱ्याला त्रासाचें, रुसव्याचें, क्रूरपणाचें काजळ फासूं नकोस. पेशवाईची स्थापना करणारे महात्मे तुझ्या पोटीं जन्मास येऊन तुझ्याच कुळांत पेशव्यांची सत्ता अधिक दिवस टिकण्यास नारायण आमच्या हातून मरतां कामा नये.

आनंदी० : आपण भोळ्या शंकराचे अवतार आहां, म्हणून सर्व जग म्हणतें; तें कांहीं खोटें नाहीं. नारायणाला मारण्याचा जर आपण हुकूम केला, तर त्यांत काय पाप? ती पार्वती—तो माधव—हा नारायण—हीं आपलीं शत्रू का आप्तसंबंधी? आप्तसंबंधी जर म्हणावें तर पानिपतच्या पूर्वी ती पार्वती बया कां एवढी आडवी आली असती? माधवानें, तुम्ही त्याला जीवदान देऊन हाताशी धरलें असतां, महाराज त्या माधवानें, आपणाला ऐन वेळेस कैदेंत कां टाकिलें असतें? नारायणावर विश्वास टाकून स्वस्थ बसलां आणि त्यानें केसानें गळा कापून तुम्हांआम्हांला कैदेंत टाकलें; अद्याप आपल्या गळेकापू शत्रूला तुम्हीं पुतण्या समजतां काय!

दादा० : होय, मी नारायणाला माझा पुतण्या समजतों.

आनंदी० : नाहीं, महाराज नाहीं; तुम्हीं त्याला आपला पुतण्या समजत नाहीं. मग त्याला 'धरावें' असा तरी हुकूम कसा लिहिलात? तो तुमचा शत्रू आहे.—हो आहेच शत्रू—तो जर शत्रू नसता, तर त्या पोरट्याचा निःपात व्हावा म्हणून आज दोन महिने सूर्यास संकट घालण्याकरितां आधणाच्या पाण्याचीं अर्घ्यें कां देत आहांत? काशीच्या त्या गौडाला उच्चाटणाचा मंत्र जपत कां बसविलें आहे? माधवाच्या मरणापूर्वीं तुम्ही अशींच अर्घ्यें दिलीं होतीं व असाच जप करविला होता. त्या वेळेप्रमाणें आजही तुमची तपश्चर्या फळास आली आहे. गारदी तुमच्या हुकमाप्रमाणें पाहिजे ती गोष्ट करण्यास तयार आहेत. मग आतां कां कूं कां?

दादा० : नारायण माझा शत्रू आहे खरा—

आनंदी० : मग शत्रूला मारण्याचा हुकूम देण्यांत कसलें पाप?

दादा० : शत्रू झाला तरी तो माझा पुतण्या आहे! तुझ्या डोळ्यांत तो जितका सलतो, तितका माझ्या डोळ्यांत सलत नाहीं.

आनंदी० : माझ्या तेवढ्या एकटीच्या डोळ्यांत सलतो असेंच ना? मी खुळी म्हणून मला नारायण शत्रूसारखा दिसतो.—तुम्हीं सगळीं एकच आहां. मी तेवढी परकी—इकडच्या अपमानाबद्दल मी माझ्या मनाला इतकें वाईट वाटून घेतें! देवा, मला निर्बुद्ध पशूच्या जन्मास कां घातलें नाहींस!—त्या रमेचीं, त्या माधवाचीं, ह्या नारायणाचीं व ह्या गंगेचीं बोलणीं—मेल्यांना वडील कोण, लहान कोण, ह्याचादेखील विचार नव्हता आणि नाहीं—तुमच्या तोंडावर कोणी तितकें बोलत नाहींत—मी एकटी काय ती वाईट! —घालून, पाडून, टाकून कसा पाणउतारा पावलोपावलीं करतात! महाराज, आपण जर तीं बोलणीं ऐकलीं असतीं, तर माझ्याप्रमाणेंच आपल्याही अंतःकरणाला घरें पडलीं असतीं, आणि हृदयाची प्रत्येक जखम ह्या वेळीं 'नुसते धरूं नका तर ठार मारा' असें ओरडत राहिली असती. (पडद्यांत "काका, काका, माझे प्राण वांचवा. काका काका") महाराज, मी दुरुस्त केलेला हुकूम जर गारद्यांना आपण ह्या वेळीं देणार नसलां; तर ही कट्यार घेऊन प्रथम माझा प्राण घ्या आणि नंतर नारायणाचा प्राण वांचवा महाराज—

दादा० : तूं जर माझी आवडती अर्धांगी नसतीस तर नारायणाचा प्राण वांचविण्याकरितां स्त्रीहत्या करण्यासही मागें पुढें पाहिलें नसतें.

आनंदी० : (गुडघे टेकून) महाराज, आपल्या भोळेपणानें नारायणाचे प्राण वांचून, आपण पेशवाईला मुकलेले पाहण्यापेक्षां मला ह्या वेळी मरण बरें वाटतें. महाराज, अंगावर पेशवाईचीं वस्त्रें घालून आपण माझ्या पोटीं जन्मलेल्या बाजीरावाचें चुंबन लडिवाळपणानें घेत असतांना, आपणाकडे प्रेमानें पाहण्याचा स्वर्गसुखाचा दिवस उगवावा म्हणून आपल्या ह्या अर्धांगीची सर्व खटपट चालली आहे. आमच्या ह्या सुखाच्या आड येणाऱ्या ह्या नारायणाचा निःपात इकडच्या मरणाशिवाय कशानेंही होणार नाहीं असें परमेश्वरानें जर मला सांगितले, तर या पोरट्याला जगांतून निदान नाहींसा करण्याकरितां काळाच्या तडाख्यानें माझें कुंकू असें पुसलें जाऊन सती जाण्याचा प्रसंग नारायणाच्या कैदेंत राहण्यापेक्षां मजवर येऊं दे, अशी परमेश्वराची करुणा भाकण्यास मी चुकणार नाहीं—मी आपली आवडती अर्धांगी, ह्या मोहानें जर आपला हात ही कट्यार उचलीत नसेल, तर जिच्या कपाळीं कुंकू नाहीं, अशी एक पापी विधवा नारायणाचे प्राणाचे आड येत आहे असें समजून माझा प्राण प्रथम घ्या आणि नंतर नारायणाचा प्राण वांचवा.

("काका, माझे प्राण वांचवा" असें म्हणत प्रवेश करून नारायणराव राघोबाच्या दुसऱ्या बाजूला गुडघे टेकून राहतो. सुमेरसिंग, खरकसिंग, तुळोजी पवार नंग्या तलवारीनिशीं प्रवेश करितात.)

सुमेर० : महाराजांच्या ह्या शत्रूला कैद करून आणलें आहे.

खरक० : सरकारचा जसा हुकूम होईल तशी त्याची व्यवस्था लावून टाकू !

नारा० : काका—काका, मला ही पेशव्यांची गादी नको, राज्य नको, कांहीं नको. मला सिंहगडावर, पुरंदरावर, शिवनेरीवर, काका तुम्हांला वाटेल त्या किल्ल्यावर अंधारकोठडींत कोंडून ठेवा! कोंड्याच्या भाकरीच्या तुकड्या-शिवाय मी आपणाशीं कांहीं मागणार नाहीं. काका, कसेंही करून माझे प्राण वांचवा. काका, मला मारण्याकरितां ह्या गारद्यांना हुकूम करूं नका.

आनंदी० : मी किंवा हा पोरटा, ह्यांपैकीं कोणातरी एकाचा प्राण आपण ह्या वेळीं घेतला पाहिजे. माझ्या शरीरांत खेळणारा जीव हा माझा प्राण नसून आपल्या हातांतील तो लेखी हुकूम माझा खरा प्राण आहे. मी जिवंत राहावें अशी आपली इच्छा असेल तर तो तेवढा माझा प्राण मला परत द्या.

नारा० : काका—काका, कसेंहि करून माझे प्राण वांचवा. काका—काका—

सुमेर० : सरकार, लवकर काय तो हुकूम व्हावा.

तुळो० : सांपडलेल्या सापाला ह्यहाणे जिवंत सोडीत नसतात.

राघोबा : विषारी दांत पाडल्यावर साप गारोड्याचें खेळणें होतो.

आनंदी० : मानवी सापाचे विषारी दांत आणि प्राण भिन्न नसतात. दांत पाडूं पहाणाराला त्याचा प्राणच घ्यावा लागतो. तुम्हांला जर त्या सापाला जिवंत ठेवायचें असेल, तर तुमच्या हातांनीं—नाहीं माझ्या हातांनीं ह्या कट्यारीनें नी माझा प्राण—

राघोबा० : हा तुझा प्राण मी तुला परत देतों. (आनंदीबाईच्या हातांत चिठ्ठी देतो.) नारायण, तुला जर तुझे प्राण पाहिजे असतील, तर तिच्यापासून ते मागून घे.

नारा० : काका, माझ्याशीं असे कठोर होऊं नका. माझे बाबा माझ्या लहानपणीं पानिपतच्या स्वारीला गेले आणि तेथून त्यांच्या मृत्यूची बातमी आली; त्यावेळीं आईनें मला आणि रावसाहेबांना आपल्या पदरांत टाकलें; त्या गोष्टीची आठवण करा. रावसाहेबांनीं मरण जवळ आलेलें पाहून थेऊरास गजाननाचे समोर माझा हात आपल्या हातांत दिला; आणि हा आपला मुलगा आहे, असें आपणांस बजाविलें; आणि काका,—बाबा, मला आपल्याजवळ ओढून घेऊन पित्याच्या नेत्रांतून निघणाऱ्या प्रेमाश्रूंनीं मला न्हाऊं घातलेंत. त्या वेळचे ते प्रेमाश्रु बाबा, ते पुन्हां पुन्हां तुमच्या डोळ्यांत दिसूं—नका, असे तोंड फिरवूं नका. मी गारद्यांच्या तलवारीनें कापलाच जाणार असलों तर बाबा, तुमच्या त्या प्रेमाश्रूनें माझें शरीर पुन्हां भिजूं दे. त्यामुळें ह्या तलवारी माझे तुकडे करीत असतांना शरीराचे हाल कमी होतील व शरीरांतून बाहेर पडणाऱ्या माझ्या प्राणांना प्रेमसिंचनानें थंडोसा मिळेल.—काकू, आई, बाबांना ह्या लेंकरापासून असे दूर लोटूं नका. आई, थेऊरास रमाकाकूनें सती जातांना तुझें लेकरूं म्हणून मला तुझ्या ओटींत घातलें, आणि रमाकाकूनें सतीचा प्रसाद म्हणून तुला दिलेली ही हिऱ्याची आंगठी, आई, तुझा प्रसाद म्हणुन मीं पेशवाईचीं वस्त्रें अंगावर घातलीं त्यावेळीं तूं ह्या बोटांत घातलीस. माझ्या आईचा हा प्रसाद—माझ्या रक्तानें भिजला जावा असें तुला वाटतें काय?

(आनंदीबाई राघोबाला बाहेर लोटून टाकते.)

आनंदी० : सुमेरसिंग, त्या पोराला जिवंत ठेवतां कामा नये.

सुमेर० : आम्हांला सरकारचा लेखी हुकूम पाहिजे.

आनंदी० : हा घ्या लेखी हुकूम.—तुम्हाला पांच लाख रुपये बक्षीस दिलें असून

याला मारावें असा स्पष्ट हुकूम आहे.

(सुमेरसिंग चिठी वाचतो.)

खरक० : बाईसाहेब, आपल्या हुकूमाप्रमाणें वागण्यास आम्ही तयार आहों पण नुसते पांच लाख रुपये इनाम पुरेसें नाहीं. मला पुरंदरचा किल्ला व सुमेरसिंगांना नगरचा किल्ला बक्षीस मिळाला पाहिजे सरकार.

आनंदी : पुरंदर व नगर दोन किल्ले तुम्हांला बक्षीस दिले आहेत.

सुमेर० : तसा आमच्याजवळ सरकारच्या सहीशिक्क्याचा लेख पाहिजे.

आनंदी० : ह्या साध्याही गोष्टी तुम्हांला समजूं नयेत ? किल्ले बक्षीस देण्याचा अखत्यार पेशव्यांना मात्र आहे. हा पोरटा जिवंत असेतों पेशव्यांचीं वस्त्रें तिकडे मिळणार नाहींत आणि पेशव्यांच्या गादीवर तिकडून बसणें झाल्याशिवाय पेशव्यांच्या सहीशिक्क्यानिशीं तुम्हांला किल्ले कसे मिळणार ? आमचें वचन ह्यावेळीं तुम्हाला पुरेसें आहे. पुरंदर व नगर हे दोन किल्ले तुम्हांला बक्षीस दिले आहेत.

नारा० : सुमेरसिंग, खरकसिंग, पांच लाख रुपये व दोन किल्ले एवढेंच जर आपल्याला पाहिजे असेल तर तसा माझ्या सहीशिक्क्याचा हुकूम मी आतां तुम्हांला देतों. तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्हीं काकांना पेशव्यांचे गादीवर बसवा. मला जिवंत ठेवल्याबद्दल काका तुमच्यावर खात्रीनें रागावणार नाहींत. उलट पेशव्यांच्या रक्ताशीं तुम्ही बेइमानानें वागलां नाहीं म्हणून मी लिहून देत असलेल्या दोन किल्ल्यांचे ऐवजीं तीन किल्ले बक्षीस देतील. मला मारून जर तुम्ही पेशव्यांच्या रक्ताशीं निमकहराम झाला, तर बाजीरावसाहेबांच्या कुळांतील कोणचा पुरुष तुम्हांवर विश्वास ठेवील ?

आनंदी० : तुळोजी, ह्या पोरट्याला त्या माडींत पाय धरून ओढून ने. सुमेरसिंग, खरकसिंग तुम्ही बेलभंडारा उचलून दिला आहे. तुमच्या बेलभंडाऱ्याशीं जर तुम्हीं निमकहराम होणार असलां तर आमच्या व तुमच्या ह्या शत्रूला जिवंत ठेवाल.

सुमेर० : सरकारला आम्हीं बेलभंडारा उचलून दिला आहे. आम्हीं बेइमान होणार नाहीं.

आनंदी० : तुळोजी ह्याला ओढून ने. (तुळोजी ओढून नेतो. सु० ख० त्याचे मागें जातात. "काका, काका, मला वांचवा" म्हणून नारायणराव ओरडत राहतो.) चालवा, आणखी एकदां तरवारी चालवा म्हणजे पुरें काम होईल.

स्वारी आली वाटतें—हें प्रथम पाहिलें पाहिजे, त्या पोरट्याचें काम पुरतें झालें कीं नाही.

(आनंदीबाई जाते व राघोबा येतो.)

राघोबा० : (स्वगत, पाहून) बरें झालें. त्यांनीं त्या दिवाणखान्याचें दार बंद करून टाकलें. नारायणाच्या पोटांत ती सुमेरसिंगाची तरवार शिरलेली पाहिल्याबरोबर माझ्या डोळ्यांनीं माझ्यासमोर माझे सर्व पूर्वज उभे केले! डोळे पापी असतात आणि पाप भित्रें असतें; म्हणून माझ्या मनानें जरी तिच्या म्हणण्याला रुकार दिला तरी, ह्या माझ्या डोळ्यांनीं ती हत्या पाहवली नाहीं. तें दार बंद झालें, दृष्टिआड गारदी मारेकऱ्यांची सृष्टी गेली, लगेच माझें मन खंबीर झालें! दृष्टिआड तो मेला असला पाहिजे. मग 'काका, काका' असे शब्द अजून कोठचे कानीं येतात!—माझें हृदय कठोर झालें आहे; माझ्या डोळ्यांतील दयेच्या पाझराचा शेवटचा बिंदू आटून गेला आहे—'काका, काका'—अरे ह्या बाजूलाही तेच शब्द ऐकूं येतात—माझ्या मागेही 'काका, काका' म्हणून ओरडतो आहे काय? माझ्या पुढून कसा तो आवाज ऐकू आला? काय, वरच्या सर्व देवता नारायणस्वरूपी होऊन 'काका, काका' म्हणून मला हांका मारीत आहेत?—ह्या पृथ्वीच्या पोटांतूनही तोच आवाज कसा येतो? अहो, कोणीतरी मी राघो भरारी पेशवा झालो म्हणून माझ्या नांवाची द्वाही फिरवा; माझ्या नांवानें कर्णे फुंका; माझ्या नांवानें ताशे बडवा, डंके, नौबत सर्व रणवाद्यें खूप जोरानें पिटा; तुमच्या ह्या नव्या पेशव्याच्या नांवाचा जयजयकार ह्या वाड्याभर, सर्व पुणें शहरभर, सर्व महाराष्ट्रभर एवढ्या मोठ्यानें करा कीं, माझ्या या फितुर कानाच्या किंठाळ्या बसून 'काका, काका' हे शब्द मला ऐकविण्याची त्यांना शक्तीच राहूं देऊं नका.

(आनंदीबाई रक्तानें भरलेला खंजीर घेऊन प्रवेश करिते.)

आनंदी० : महाराज, आमचा शत्रू नाहींसा झाला. आपण पेशवाईचे मालक झाला (पड्यात नौबद) ही आनंदाची बातमी सर्व पुणें शहराला समजावी म्हणून ह्या नौबदी झडत आहेत.

राघोबा० : तो खरोखर मेला ना?

आनंदी० : तो खरोखर मेला.

राघोबा० : मग 'काका', 'काका' असे शब्द अजून कसे मला ऐकूं येतात? मरणापूर्वी तो कण्हत आहे काय?

आनंदी० : खरोखर मेला. आपली खात्री करण्याकरितां त्याच्या रक्तांत भिजलेली कट्यार आणिली आहे—महाराज, मधाशीं आमचा शत्रू जगतो कीं, काय, अशी भीति वाटून मला अत्यंत वाईट वाटलें. त्या उद्वेगाच्या भरांत मीं माझ्या हातानें माझ्या कपाळाचें कुंकू पुसून टाकिलें. आमच्या शत्रूचें रक्त महाराष्ट्र भूमीच्या भालप्रदेशावर—ह्या पुणें शहरावर—शिंपडलें जाऊन आपण पेशवे झाल्यामुळें ही भूमि सनाथ झाली आहे; त्याप्रमाणें ह्या कट्यारी-वरील कुंकवाचा टिळा माझ्या कपाळीं आपल्या हातानें लावून 'मी अनाथ नाहीं' असें मला आश्वासन द्यावें.

राघोबा० : (हातात कट्यार घेऊन) मंतरलेला ताईत हातांत घेतला म्हणजे पिशाचानें जसें पळून जावें, त्याप्रमाणें ही तांबडी कट्यार हातीं घेण्याबरोबर माझ्या कानांची बेंडाळीं नाहींशी झाली. (आनंदीबाईच्या कपाळाला टिळा लावून) आजपर्यंत नाना प्रकारच्या दागिन्यांनीं आपल्या आवडत्या बायकांना नवऱ्यांनीं सजविलें आहे; पण आनंदी, असला राजवैभवाचा अलंकार तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाही सुंदरीच्या कपाळीं विधात्यानें यापूर्वी लिहिला असेल किंवा ह्यापुढें लिहील, असें मला वाटत नाहीं.

आनंदी० : (कट्यार घेऊन) माझ्या कुंकवाच्या करंड्यांत हा प्रसाद मी निसळून ठेवितें; म्हणजे माझ्या कुंकवाचा तजेला कधींही कमी न होतां, तो अक्षयी टिकेल,

(सुमेरसिंग, खरकसिंग रक्तानें भरलेल्या तलवारींसह प्रवेश करितात.)

सर्वजण मिळून :—सरकार, आपला शत्रू जगांतून नाहींसा झाला आहे.

सुमेर० : सरकारस्वारी ह्या वेळेपासून पेशवाईची मालक झाली, म्हणून हा मालकीचा टिळा सरकारचे कपाळीं लावण्याची परवानगी या बंद्यांना असावी. (तरवार पुढें ठेवतो व रक्ताचा टिळा राघोबाच्या कपाळीं लावतो. इतरही तसेंच करितात.)

(प्रतिनिधी; सखाराम हरि, व्यंकटराव, लक्ष्मणराव, प्रवेश करितात.)

स० व्यं० व ल० : सरकारस्वारी श्रीमंत पेशव्यांच्या गादीचे मालक झाल्या-मुळें सरकारच्या एकनिष्ठ सेवकांना आनंद होत आहे.

राघोबा० : या दोस्त, या; (उठून) या, प्रतिनिधी या.

प्रति० : आपल्या पक्षाच्या मुख्याला व खऱ्याखुऱ्या मित्राला पेशव्याची गादी मिळालेली पाहून कोणाला आनंद होणार नाही? ह्या आनंदाच्या वेळचा व

एकनिष्ठेचा नमस्कार-सरकारांस अशौच नसतें तर—

आनंदी० : शत्रूचें सुतक का घरीत असतात !

राघोबा० : आम्हांला तुरुंगांत ठेवणाऱ्या नारायणाचें कसलें आम्हांला सुतक ! या दोस्त या, असे जवळ बसा.

प्रति० : मग सन्मानाच्या माझ्या या नमस्काराचा सरकारांनीं स्वीकार करावा.

राघोबा० : (नमस्कार घेऊन) या दोस्त या; असे जवळ बसा. (प्रतिनिधी जवळ बसतात.) आपण सर्वांनीं मिळून जी जबाबदारी आज माझ्या शिरीं ठेविली आहे, तिचा भार आमच्याप्रमाणेंच आमच्या मित्रानींही उचलला पाहिजे.

आनंदी० : प्रतिनिधीसाहेब, आजपर्यंत ज्या मित्रत्वाच्या बुद्धीनें आपण आम्हांला साहाय्य केलेंत, तीच मित्रत्वाची बुद्धी सर्व राज्याचा कारभार सुरळीतपणें चालवून ह्यापुढें ठेविली पाहिजे. छत्रपतींचे आपण प्रतिनिधी आहांत. तेव्हां सर्व मुत्सद्यांचे व कारभाऱ्यांचे अग्रणी होण्याचा मान आपणांसच मिळाला पाहिजे. इकडच्यासारखे शूरवीर सेनानायक, अघटित घटना घडवून आणणारे आपल्यासारखे मुत्सद्दी, सुमेरसिंग, सखाराम हरि यांच्यासारखे सरदार असा मेळ बसल्यावर आमचेविरुद्ध कोण ब्र काढणार आहे ?

राघोबा० : प्रतिनिधी, आपण, मी व हे सरदार एक असल्यावर आमचे विरुद्ध जाण्याची कोणाची प्राज्ञा आहे ? लक्षुमणराव, व्यंकटराव, मुधोजीराव भोसल्यांना कळवा, राघो भरारी पेशवा झाला आहे; भवानराव प्रतिनिधींच्या हातीं सर्व राज्याचीं मुत्सद्दीपणाचीं सूत्रें आलीं आहेत; व मुधोजीरावांना नागपूरची गादी देण्यांत आली आहे. भवानराव, तुम्हीं फडक्याला तावडतोब कैद करा, व बापूंचीं आर्जवें करून त्यांना आपल्यांत चांगले मिसळून घ्या. तो म्हातारा अळंटळम् करूं लागला तर—तर—

आनंदी० : मुधोजीरावांची वेसण त्याच्या नाकांत घालून त्याला नीट मार्गावर आणूं.

राघोबा० : बापू म्हणजे मोठें प्रस्थ आहे; सामान्य मुत्सद्दी नव्हे. त्याच्या मनांत नसले, तर त्याच्या नाकांत वेसण घालणें महाकठीण आहे बरें. बाकी माझ्याकरितां त्यानें आजपर्यंतचें सर्व आयुष्य खर्च घातलें आहे; तेव्हां या प्रसंगीं बापू माझ्याविरुद्ध जाणार नाहीं.

आनंदी० : आणि गेला म्हणून काय होणार आहे ? त्या म्हाताऱ्याला, त्या फडणिसाच्या पोराला; व त्या फडक्याला जर आम्ही भिऊं लागलों, तर उद्यां

गांवगन्ना जे लोक नारायणासंबंधानें आम्हांला दूषणें देतील, त्यांचीदेखील भीति बाळगावी लागेल !

राघोबा० : अग, जात-गंगेला व लोक-गंगेला भ्याले पाहिजे. लोक-गंगेला न भिऊन भागायचें नाही. लोक-गंगा जर आम्ही आमच्याविरुद्ध खवळूं दिली, तर उद्यां निजामअलीवर स्वारी करून गेलों असतां, माझ्या वतीनें उत्साहानें व निश्चयानें लोक कसे लढतील व लहानसहान सरदारांच्या पथकांत हिय्या कोठून उत्पन्न होईल ?

आनंदी० : लोक-गंगेची भीति नको कांहीं इतकी बाळगायला. भवानराव, स्वतःचें सैन्य, स्वतःचा खजिना, स्वतःचे सरदार, यांची जय्यत तयारी ठेवावी; तुमच्या सभोंवती जीं आशाळभूतें जमतील, त्यांच्या अंगावर दोन शितें टाकून त्यांना आपल्याच कक्षेंत गरगर फिरायला लावावें; सर्वांच्या अगोदर नारायणा-संबंधानें आपणच आक्रोश करायला प्रारंभ करावा; व इतकेंही करून कोणी आम्हांला नांवे ठेवूं लागलें तर त्यांना निरनिराळे करून एकएकाला खरपूस भाजून काढावें, म्हणजे तुमची सत्ता यावच्चंद्रदिवाकरौ टिकली म्हणून समजा. बापूंच्या नाकांत वेसण घालाच, पण त्यांनीं नाहीं घालू दिली तरी इतकीशी पर्वा करण्याचें कारण नाहीं. (तुळोजी पवार येतो.)

तुळो० : सरकार, बापू वाड्यांत आले; दरवाजावर युसूफखानानें त्यांना अड-विलें, पण मीं त्यांना आंत येऊं दिलें. सरकारास वर्दी देण्यास मी पुढें आलों. हे आलेच; सरकार—(बापू प्रवेश करतात.)

बापू० : श्रीमंत नारायणराव पेशवे मारले गेले, ही गोष्ट खरी एकूण ?— दादासाहेब, हें काय केलेंत ? कोणच्या नरकाचें साधन करून ठेवलेंत ? वडिलांच्या कीर्तीला, दादासाहेब, काळिमा आणिलात. बाजीरावसाहेबांच्या ह्या तलवारी—दादासाहेब, तुमच्या या तलवारी—आजपर्यंत कोणाच्या रक्तानें भिजत आल्या व आज कोणाच्या रक्तानें माखल्या आहेत ? दादासाहेब—

आनंदी० : (रडत) बापू, नारायणाच्या शरीराचे ते तसे त्या माडींत तुकडे होऊन पडले असतां, तुम्हांला तोंड दाखविण्याचें इकडच्या व माझ्या नशिबीं आलें आहे, आणखी आमचें दुर्भाग्य कोणचें ? बापू, पोटच्या मुलाप्रमाणें इकडून नारायणावर प्रेम कसें करण्यांत येत होतें—गारद्यांचा पगार थकल्या-मुळें झालेल्या कटकटींत चुकून घाव लागून, बापू,—आम्हांला असें दुःखांत

लोटून आमचा नारायण निघून गेला ! जाणाराचें काय ? तो सुखानेंच स्वर्गांत जातो; त्याला नेण्याला स्वर्गांतून विमानें आलीं असतील; आम्ही हतभागी येथें राहिलों. लोक आम्हांला काय म्हणतील, ही भीति इकडे मरणाहून अधिक वाटते. लोक स्वभावतः दुर्जन असतात—नारायणावर आम्हीं किती प्रेम करीत होतों, हें तुम्हांला जितकें माहीत तितकें लोकांना काय माहीत —पेशवाईच्या लालुचीनें इकडून खून झाला, बापू, असला लोकापवाद जर चुकून इकडच्या कानीं पडला तर इकडून विष खाऊन तत्क्षणीं प्राण देणें होईल. बापू, तुम्ही वयोवृद्ध आहां; ज्ञानवृद्ध आहां; आम्हांला तुमच्याशिवाय कोणी वडील नाहीं. इकडे दोन विवेकाच्या गोष्टी सांगून इकडचे कामकाजाकडे पुन्हां लक्ष लागेल असें करा.

राघो० : बापू, खरोखर सांगूं! मी कोठून जिवंत राहिलों, असें मला झालें आहे—सर्व कारभाराचा भार तुमचेवर आहे. तुम्हीं तारा नाहीं तर मारा.

बापू० : दादासाहेब, नारायणरावसाहेबांचा खून झाला असें ऐकून व हा देखावा पाहून माझें मन भ्रमिष्टासारखें झालें आहे. कारभार पाहण्याची शक्ति माझ्या ह्या म्हाताऱ्या शरीरांत राहिली आहे; असें मला वाटत नाहीं.

भवा० : नारायणरावसाहेबांचे और्ध्वदेहिक आटपून दादासाहेबांच्या नांवाची द्वाही तर अगोदर फिरवली पाहिजे. कांहीं झालें तरी राज्यकारभाराचा गाडा बंद पाडतां येत नाहीं.

बापू० : दादासाहेब, मामांना हांका मारा, हरिपंतांना जवळ बोलावून घ्या व सैन्याचा बंदोबस्त त्यांचेकडून करून घ्या; नानांना व मोरोबांना कलमदानाचे अधिकारी करा; प्रतिनिधी मुख्य सल्लागार आहेतच. मी आतां पिकलेलें पान झालों आहे. रोजचें दगदगीचें काम माझ्या हातून होणार नाहीं. प्रसंग विशेषीं हांक माराल तेव्हां सेवेला हजर राहीन,

राघो० : जसें तुम्ही सांगाल, तसें आम्हीं अक्षरशः ऐकतों. पण तुमचा आश्रय कायमचा असूं द्या.

अंक पहिला समाप्त

## अंक दुसरा
### प्रवेश पहिला

[दोन दासी येतात.]

पहिली दासी : काय ग, एक नवीन बातमी ऐकलीस का तूं ?

दुसरी दासी : तुला ग कोठची नवीन बातमी माहीत असणार! मोठी आली आहे नवीन बातमी सांगायला! बाईसाहेबांच्या जवळ मी रात्रंदिवस असतें, आणि ही म्हणे मला नवी बातमी सांगणार! आपला तुळ्या हुजऱ्या तुळोजीराव कोतवाल झाले, सुमेरसिंग यांना सरदारकी मिळून ते अबदागिरांखालीं पालखींतून मिरवूं लागले, याच ना शिळ्या बातम्या तूं मला सांगणार?

पहिली दासी : शिळी बातमी नाहीं, नवी आहे. बाईसाहेबांच्या जवळ तूं रात्रंदिवस असलीस म्हणून मेलेल्या माणसासंबंधाच्या का बातम्या तुला समजावयाच्या आहेत ?

दुसरी दासी : मग आपली स्वारी मेलेल्या माणसांच्या वस्तीत गेली होती वाटतें!

पहिली दासी : मी कांहीं मेलेल्यांच्या वस्तींत नाहीं गेलें, पण मेलेलीं माणसें मात्र जिवंतांच्या वस्तींत आलीं आहेत!

दुसरी दासी : म्हणजे? तूं म्हणतेस तरी काय ?

पहिली दासी : आणखी दुसरें काय म्हणतें; मेलेलीं माणसें आमच्या वस्तींत आलीं आहेत, हीच काय ती माझी बातमी!

दुसरी दासी : मला गडे तुझें कोडें कांहीं उकलत नाहीं. नीट तरी समजावून सांग. तूं अशी कोणची नवी बातमी आणली आहेस ?

पहिली दासी : अग तूं बाईसाहेबांच्या जवळ रात्रंदिवस असतेस ना? आणि तुला ही बातमी माहीत नाहीं ? पंचाक्षरी, मांत्रिक वगैरेंचें लष्करच्या लष्कर

बाईसाहेबांनीं सभोंवतीं कां जमवलें आहे ? चमकशास्त्री, नमकशास्त्री यांचें दोंद इतकें कां वाढलें आहे ? तुला कांहींच माहीत नाहीं ?

दुसरी दासी : खरेंच मला कांहीं माहीत नाहीं. तूं सांग गडे काय तें.

पहिली दासी : अग, नारायणरावसाहेब भूत झाले आहेत !

दुसरी दासी : काय झाले भूत ?

पहिली दासी : हो भूत झाले. आणि भुताचा बंदोबस्त करण्याकरितां तर हा मांत्रिकांचा मेळा जमला आहे.

दुसरी दासी : तूं पाहिलेंस का तें भूत ?

पहिली दासी : मीं नाहीं पाहिलें !

दुसरी दासी : मग कोणाला दिसलें ?

पहिली दासी : प्रथम तुळोजीराव कोतवाळांना दिसले.

दुसरी दासी : कशासारखे दिसले ग !

पहिली दासी : ते पहा तुळोजीराव येताहेत, त्यांनाच विचार म्हणजे भूत कसलें आहे तें समजेल.

(तुळोजी येतो.)

तुळो० : काय ग, बाईसाहेब काय करीत आहेत ?

दुसरी दासी : नमकशास्त्र्यांच्या बरोबर बोलत बसल्या आहेत.

तुळो : ते प्रसिद्ध मांत्रिक तेच ना नमकशास्त्री ? त्यांची गांठ घ्यावी म्हणून मी कालपासून एकसारखा हिंडत आहें. बरें झालें, ते वाड्यांत आले आहेत.

दुसरी दासी : आतां जरी तुम्ही कोतवाल झालां, तरी या वेळीं ते कांहीं तुमच्यापाशीं बोलायचे नाहींत; काल प्रतिनिधीसाहेबांकडचा एक सरदार असाच या इथे त्यांच्या भेटीला आला होता. पण बाईसाहेबांना मंतरलेले तीर्थ दिल्यानंतर अनुष्ठान पुरे होईपर्यंत ते कुणाशीं बोलत नसतात असें त्यांच्या चेल्यानें सांगितलें.

पहिली दासी : नमकशास्त्र्यांची गांठ कुठे पडेल तें मी तुम्हांला सांगतें पण तुम्हीं अगोदर एक बातमी आम्हांला सांगितली पाहिजे.

तुळो : कोणची बातमी ?

दुसरी दासी : दुसरं तिसरं कांहीं नाहीं; नारायणरावसाहेबांचें म्हणे भूत दिसायला लागलें आहे. तर तें भूत कुठें, कोणाला आणि कसें दिसतें, तेवढें आम्हांला सांगा म्हणजे झालें.

तुळो० : (घाबरून) ह्याशिवाय मला काय पाहिजे तें विचारा. त्या भुताची आठवण झाली म्हणजे माझ्या प्राणावरच बेतल्यासारखें मला वाटतें. मी इतका निधड्या छातीचा, पण—नका—या गोष्टी माझ्यापाशीं काढूंच नका. तुम्हीं बाईसाहेबांकडे जा आणि नमकशास्त्री निघून गेल्यावरोबर मी आल्याची वर्दी पोंचवा. जा, जा, त्या भुताच्या गोष्टी पुन्हां माझ्यापाशीं काढूं नका. नमकशास्त्र्यांना ओंकारेश्वराच्या वाळवंटावर केव्हां, कसें गाठायचें हें माझें मीच पाहून घेईन. जा तुम्ही. भुताची गोष्टच पुन्हां माझ्यापाशीं बोलूं नका. बाईसाहेबांना वर्दी दिली म्हणजे मला कळवायला या.

(दासी जातात.)

तुळो० : (स्वगत) काय आश्चर्य आहे पहा! हे नारायणरावाचें भूत माझ्याच मागें तेवढें कां लागावें? मला कोतवाली मिळाली तर दादासाहेबांना पेशवाई मिळाली! मग या भुतानें त्यांच्या उरावर कां बसूं नये? हो! पण त्यांच्याही उरावर तें बसत नसेल कशावरून? हीं भुतें म्हणे एकाच वेळीं दोघांदोघांच्या तिघांतिघांच्याही उरावर बसतात! नाहीं, पण माझ्यावर त्याचा विशेष दांत दिसतो. असें कां बरें मला वाटतें? आतां रात्रही नाहीं.—मी शनवारवाड्यात आहें—नाहीं, पण मला हा ताईत माझ्या मुठींत घट्ट दाबून धरूं दे. त्या दुष्ट दासींनीं भुताची गोष्ट काढली आणि हा ताईत कोणीं ओढून नेत आहे असें मला वाटलें.—नारायणरावाच्या भुतानें पक्कें लक्षांत ठेवावें, तूं पाहिजे तितका उरावर बैस, मी कांहीं भ्यायचा नाहीं. भूत हो, समंध हो, किंवा वेताळ हो, दादासाहेबांनीं गार्द्यांना दिलेला हुकूम या ताइतांतून बाहेर काढण्याची शक्ति—मी कांहीं भ्यायचा नाहीं. तो हुकूम मीं गार्द्यांचा डोळा चुकवून या ताइतांत कोंडून ठेवला आहे; म्हणून आज नाहीं उद्यां मी एकाद्या पथकाचा सरदार झाल्यावांचून—व्हायचा काय सरदार म्हणा—नारायणरावाला मारावें असा स्पष्ट हुकूम जोपर्यंत माझ्या मुठींत आहे, तोंपर्यंत मी म्हणेन त्या वेळेला, पाहिजे त्या पदावर चढून—नाहीं, मी भिणार नाहीं—नारायणरावाच्या भुताची वाट लावली म्हणजे मी सरदार झालोंच. भुतें म्हणे खुनाचा पुरावा बाहेर उकरून काढीत असतात. हं, बरोबर आहे. माझ्यावर नारायणाच्या भुताचा इतका दांत नाहीं, तर या ताइतांत मीं कोंडून ठेवलेल्या गार्द्यांजवळच्या हुकुमावर त्या भुताचें सर्व लक्ष आहे. रुद्राभिषेकानें हा ताईत एकदां भारून टाकला म्हणजे आमची सरदारकी

पुढें मागें डळमळण्याची मुळींच भीती नाहीं. आज कसेंही करून त्या नमकशास्त्र्यांना गांठून त्यांच्याकडून रोज ताइतावर रुद्राभिषेक करवला पाहिजे. (जातो.)

## प्रवेश दुसरा

[स्थळ : नदीचें वाळवंट. नमकशास्त्री भांग तयार करून ओततो आहे. इतक्यांत चमकशास्त्री प्रवेश करितो.]

चमक० : नमस्कार गुरु.

नमक० : यावें गुरु, नमस्कार.

चमक० : आज छानेल कीं नाहीं ?—तुला या पुण्याच्या वाळवंटावर भांग छानत बसलेला पाहिला म्हणजे मला अन्नपूर्णा नगरींतील आमच्या लहानपणची आठवण होते.

नमक० : गंगाकिनारीं ह्या लुंढियानें छानलेल्या विश्वेश्वराच्या प्रसादाची लज्जत औरच आहे. पण चमकशास्त्री, आतां मुठा नदी प्रत्यक्ष गंगाच समजली पाहिजे.

चमक० : हें कसें काय नमकशास्त्री ?

नमक० : अरे, तूं आणि मी गुरुबंधु; मी देशस्थ आणि तूं कोकणस्थ; तरी प्रत्यक्ष जुळे भाऊच; हें अगोदर कबूल कर. मग मुठा नदी गंगा कशी तें सांगतों.

चमक० : मी कोंकणस्थ आणि तूं देशस्थ ! मग कसे भाऊ ?

नमक० : अरे, प्रत्यक्ष जुळे भाऊच; कारण तूं कोंकणस्थ पण तुझी बायको देशस्थाची, आणि मी देशस्थ पण माझी बायको कोंकणस्थाची. नानासाहेब पेशव्यांचें लग्न देशस्थ वधूशीं ज्या लग्नमंडपांत झालें, त्याच लग्नमंडपांत आम्हां भांडखोर व कज्जेदलाल शास्त्र्यांचीं अशीं लग्नें लावण्यांत आल्यामुळें नानासाहेबांच्या वारसांप्रमाणें आम्हांलाही भाऊबंदकी साधण्याचा हक्क सांप्रत प्राप्त झाला आहे. म्हणून तूं आणि मी जुळे भाऊच.

चमक० : शिवाय नमकशास्त्री, मारुतीचे वांटणीबद्दल तुझा व माझा दावा

शनवारवाड्यांत आपण दोघेजण लढतच आहों. मूळच्या एकीची बेकी करण्याला भाऊबंदकी म्हणतात. धंदा पहावा तर दोघांचा एकच; रामशास्त्र्यापुढें कज्जेदलाली करावयाची व फावल्या वेळेंत थोरांमोठ्यांचीं धर्मकृत्यें करून दक्षणा मिळवावयाची. धंद्यांत एकी व मारुतीचे वर्षासनांत बेकी; तेव्हां अगदी सख्खे जुळे भाऊ असायला आणखी काय शिंगें असावीं लागतात ?

नमक० : म्हणून तुला अगदीं गुप्त बातमी सांगतों. ही मुठानदी विश्वेश्वराचे पायाजवळून वहाणारी प्रत्यक्ष मंदाकिनीच समज; कारण भोलाशंकर दादासाहेब ह्या नगरीचे तख्तावर विराजमान झाला आहे; आणि अन्नपूर्णाबाईचें काम कोणाकडे आलें आहे म्हणून समजलास ?

चमक० : कोणाकडे !

नमक० : चमकशास्त्री, आतां ह्या नमकशास्त्र्याशीं तूं नमून वागलें पाहिजेस. मारुतीच्या दाव्यांतील फैसला आतां माझ्यासारखा झाला म्हणून समजा आनंदीबाईसाहेब धर्माधिकारी झाल्या आहेत. प्रत्यक्ष अन्नपूर्णामाई !— आमचीचा वशिला बाईसाहेबांकडे आहेच ! शिवाय बाईसाहेबांची एकादसणी नेहमींच माझ्याकडे असते; तुला ठाऊकच आहे.—प्रत्यक्ष अन्नपूर्णामाई ! आणि तुझें रक्षण करण्याकरितां काळभैरवाचा सोटा कोणाच्या हातीं आला आहे, सांग पाहूं !—अरे दरबारी इकडेच येत आहे. प्रसाद घेऊन टाक लवकर (भांग पितात.) तुला विचारीत होतों, काळभैरवाचा कोतवाली सोटा कोणाच्या हातीं आला आहे, माहीत आहे ?—हे येत आहेत, हेच नवीन कोतवाल. ह्यांना तुळोजीराव पवार म्हणतात.

चमक० : नारायणरावसाहेबांजवळचा हा तुळ्या हुजऱ्या नव्हे ?

नमक० : शांतं पापं ! शांतं पापं !—भलतें बडबडूं नको—हे आज कोतवाल आहेत; म्हणून तुळोजीराव आहेत—आम्हीं कज्जेदलाल शास्त्र्यांनी राजसत्तेचें मूळ व कोतवालाचें कूळ ह्याची चौकशी कधींही करूं नये.

(तुळोजी येतो.)

चमक० : शतायुषी भव, चिरंजीव भव.

तुळो० : रामराम शास्त्रीबुवा.

नमक० : जिते रहो, फत्ते रहो,—हूं ? ह्या वेळीं गंगाकिनारीं कां येणें केलें ? आपण दरबारचीं माणसें, श्रीमंतांजवळ कानगोष्टी चालायची ही वेळ, आणि मग गंगेच्या दर्शनाची इच्छा कां झाली ?

तुळो० : गंगेच्या नाहीं आपल्याच दर्शनाला आलों.

नमक० : हं ! हं ! महदुपकार आहेत. महदुपकार आहेत. फार उत्तम ! फार उत्तम ! येथें थोडी विश्रांती घेऊन गंगाकिनाऱ्याला सनाथ करावयाचें होतें, (तुळोजी बसतो.) मजसारख्या गरिबाचें स्मरण कां झालें ?—काय आज्ञा आहे !

तुळो० : थोडें तसें महत्त्वाचें काम आहे—हे कोण आपल्यापैकींच !

नमक० : हे आमचे धाकटे बंधु, चमकशास्त्री. लघुरुद्र, महारुद्र, अतिरुद्र, बलाढ्यरुद्र सर्वांत अत्यंत पारंगत आहेत. प्रत्यक्ष रुद्राचाच अवतार ! ह्या वाळवंटांत ह्यांनीं रुद्राचें आवर्तन सुरू केलें—आम्हां दोघांच्या तोंडांतून रुद्राच्या मंत्राचा गंगेप्रमाणें महाप्रवाह बाहेर पडूं लागला, चमकशास्त्रींनीं ‘चमे, चमे, चमे,’ एकसारखा झोत सुरू केला,—अहाहा ! वक्तृत्व काय, वाणी काय—अहाहा !—‘नमे, नमे, नमे,’ असा माझा नमकशास्त्र्याचा मारा चालू झाला म्हणजे ह्या स्मशानातील सगळीं भुतें भीतीनें कांपल्यासारखीं प्रत्यक्ष दिसतात प्रत्यक्ष ! हो प्रत्यक्ष !

तुळो० : म्हणूनच आपणांसारख्या विद्वान मांत्रिकाकडे मुद्दाम म्हणून आलों आहे ! अलिकडेच दोन चार दिवस, केव्हांपासून आलें का ध्यानांत ?

नमक० : आलें ध्यानांत, नारायणाला भडाग्नि—

तुळो० : बरोबर, त्यावेळीं मी ओंकारेश्वराच्या बाजूला आलों होतों. तेव्हांपासून स्मशानांत, एखादा नवीन चमत्कार दिसतो का ?

चमक० : हो ! एक महापुरुष दिसूं लागला आहे. त्याच्या अंगावर पेशव्यांची वस्त्रें असून—

तुळो० : तो काय बोलतो काय ?

चमक० : माझें आवर्तन झालें म्हणजे इतर भुतेंखेतें पळून जातात; पण हें नवीन भूत असेच उभें राहतें.

नमक० : अगदीं, जसेंच्या तसें !

तुळो० : बरें, तें असो—नमकशास्त्री, सरकारी महारुद्र चालूच आहे; पण बाईसाहेबांनीं तुम्हांला म्हणून खाजगी रीतीनें सांगितलें आहे कीं, खास त्यांच्याकरितां रोज लघुरुद्र सुरू करा.

नमक० : जय अन्नपूर्णामाई ! गोरगरिबांचा योगक्षेम कसा चालवावा, हें एक आनंदीबाईसाहेब माऊलीलाच माहीत ! आई मातोश्री, ह्या लेकरावर असाच लोभ असावा.

तुळो० : आणि माझें एक स्वतःचें काम आहे. असें झालें, मला आईसाहेबांनीं कोतवालीचें काम सांगितलें. ह्या अधिकार कायम टिकावा म्हणून महाबलीच्या मंत्राचा कागद तयार करून ह्या ताईतांत घालून तो मी दंडाला बांधला; पण तेव्हांपासून रोज स्वप्नांत एक भूत माझ्या उरावर बसतें व हा ताईत हिसकावून घेऊं लागतें !

नमक० : काय म्हणतां, भूत तुमच्या उरावर बसतें ? छे ! छे ! तसें नसेल हो. तुम्हीं भुताचे उरावर बसत असाल. असेंच, असेंच, ऐकलें चमकशास्त्री, हे भुताचे उरावर बसतात—

तुळो० : तसें नव्हे; भूत माझ्या उरावर बसतें.

नमक० : संशय असेल; खरें तसें नसावें, आपण कोतवाल; आपणच भुताचे उरावर बसत असाल.—भुताचे उरावर कोतवाल—असेंच—असेंच—

तुळो० : अहो, तसें नाहीं. मी सांगतों ना ?—त्या दिवसापासून रोज स्वप्नांत एक भूत माझ्या उरावर बसतें व ताईत हिसकावून घेऊं लागतें. तेव्हां मला एका स्नेह्यानें सांगितलें कीं, चांगल्या शुचिर्भूत ब्राह्मणाकडून अकरा दिवस रोज रुद्राचा अभिषेक ताईतावर करावा, म्हणजे भुतांखेतांचा बंदोबस्त होईल.

नमक० : हो ! अलबत ! तो बंदोबस्त मी करून देतों. कोणत्या भुताची माय व्याली आहे ह्याला अभिषेकानंतर शिवण्याची ! हें काम चमकशास्त्र्यांकडून करविलें पाहिजे. दुसरा तिसरा लेच्यापेच्या—एक चवन्नीच दक्षणा घेऊन एकादसणी करणारा ब्राह्मण सांगितला, तर तें भूत उलट त्या ब्राह्मणाच्याच उरावर बसून आवर्तनाचा एक शब्दही त्याच्या तोंडून निघायचा नाहीं.

तुळो० : मग चमकशास्त्र्यांनाच सांगा. त्याला कोणची हरकत आहे !

नमक० : हरकत—विशेष कांहीं नाहीं ! पण प्रथम आपण खरें खरें सांगा; भूत तुमच्या उरावर बसतें कीं तुम्हीं भुताच्या उरावर बसतां ? ही मुद्याची गोष्ट आहे. भूत जर तुमच्या उरावर बसत असेल तर रुद्राचे स्वर निराळे, मंत्रपठणाचा कायदा निराळा; हें शास्त्राभ्यासाशिवाय नुसत्या भटांभिक्षुकांना नसतें समजत.—तुमच्या उरावर जर भूत, तर तें सगळेंच निराळें; आणि तुम्हीं जर भुताच्या उरावर बसत असलां तर स्वर निराळे, मंत्र निराळे, व कायदा निराळा. तेव्हां पहिला मुद्दा ठाम ठरवूं या—तुम्ही भुताचे उरावर बसतां का भूत तुमच्या उरावर बसतें ?

तुळो० : अहो मीं सांगितलें ना, भूत माझ्या उरावर बसतें म्हणून.

नमक० : झालें, ह्या मुद्याचा निकाल लागला. चमकशास्त्री, ध्यानांत धरा; भुताच्या उरावर कोतवाल—तसें नव्हे—कोतवाल आणि भूत—कोण कोणाच्या उरावर बसतो, ह्याचा शहानिशा झाला पाहिजे. एरवी दुसऱ्या मुद्याकडे वळतां येत नाहीं. चमकशास्त्री, ह्या पहिल्या मुद्याचा निकाल करून घ्या; एरवीं दक्षणेच्या मुद्याकडे मला वळतांच येत नाहीं. त्यांतलें खरें असें आहे कोतवाल-साहेब, भूत जर तुमच्या उरावर बसलें तर दक्षणा जास्त द्यावी लागेल आणि तुम्ही जर भुताच्या उरावर बसत असलां तर कमी दक्षणेवर भागेल. उगीच फाजील खर्चांत तुम्ही पडणें चांगलें नाहीं; तेव्हां नीट आठवून सांगा, कोण कोणाच्या उरावर बसतो तें—हें खर्चाचें काम आहे. आतां सांगा पाहूं, भूत तुमच्या उरावर बसतें का तुम्ही भुताच्या उरावर बसतां ?

तुळो० : अहो, भूत माझ्या उरावर बसतें; भूत माझ्या उरावर बसतें; भूत माझ्या उरावर बसतें.

नमक० : मग चमकशास्त्री, हें ठरलें तर मग; हे कांहीं भूताच्या उरावर बसत नाहींत,—नाहीं ना ?—नाहीं ?—पक्का निकाल लागूं द्या.—नाहीं ?

तुळो० : नाहीं, नाहीं, नाहीं.

नमक० : हें कलम 'नाही' ठरलें. आतां असें—सर्व सशास्त्र झालें पाहिजे—भूत तुमच्या उरावर हें खरें ना ? आतां यांत शंका नको—भूत तुमच्या उरावर. खरें ना ?

तुळो० : खरें, खरें, खरें.

नमक० : चमकशास्त्री, हा शेवटचा निकाल झाला. पण कोणाच्या उरावर कोण बसतें—भुताच्या उरावर तुम्ही, का तुमच्या उरावर भूत—भूत तुमच्या उरावर, हें ठरलें; एकुण हा निकाल तुमच्याविरुद्ध झाला. अजून फिरवून घ्या. बसतां तुम्हीं भुताच्या उरावर ? बसा—बसा—खर्च कमी लागेल. नाही ?—नाहीं ?—मग तुमच्या कामाला मोठी हरकत येणार.

तुळो० : आतां कोणची हरकत ?

नमक० : हरकत म्हणजे अशी—चमकशास्त्र्यांना फुरसत कोठें आहे ? त्याचें असें आहे, सरकारचे लघुरुद्र, महारुद्र, अतिरुद्र सुरूच आहेत. समाप्तीच्या होमाच्या वेळीं चमकशास्त्र्यांना सहज हजार-पांचशें प्राप्ती होऊन जाईल. शिवाय आजकाल असें झालें आहे कीं, पिशाच्च्यांचे मंत्र व कायदे माहीत असलेल्या नांवाजलेल्या विद्वानानें पिशाच्च्यांचे बाजूला जाऊं नये म्हणून

त्याला घरीं स्वस्थ अडकवून पाडण्याकरितां दक्षणेच्या राशीच्या राशी त्याजपुढें ओतण्यांत येतात.—कज्जेदलाल मांत्रिकासंबंधाने पडली आहे रीत ती सांगितली.—मात्र त्याला पिशाच्च्याचे कायदे पुरे माहीत पाहिजेत—आणि चमकशास्त्र्यांना हे कायदे—पिशाच्च-कोतवाल, वेताळ, आग्यावेताळ, ह्यांच्या गाळीव कायद्यांची ही प्रत्यक्ष मूर्तीच समजा. तेव्हां मोठी दक्षणा बुडवून—म्हणून म्हणतों—हरकत म्हणजे—हरकत आपण सहज ती काढून टाकाल—भूत तसेंच मोठें जबरदस्त असलें तर दक्षणाही मोठी जबरदस्तच पाहिजे. बाकी तुम्हीं जर तुमच्या भुताच्या उरावर बसत असलां—बसतां का ?—बसा भुताच्या उरावर—बसा, बसा, मी सांगतों—खर्च कमी येईल, दक्षणा फार नको—बसतां ?—नाहीं ?—नाहींच ? नाहीं—मग दक्षणा मोठी पडेल, स्पष्ट सांगतों–मोठी दक्षणा पाहिजे.

तुळो० : दक्षणेची काळजी करूं नका. मी चमकशास्त्र्यांना खूष करीन. रोज ह्या ताईतावर रुद्राभिषेक करून तीर्थ मला आणून द्यावें व अकरा मोहरा दक्षणा घेऊन जावी. अकरावे दिवशीं समाप्तीची मोठी दक्षणा देईन.

नमक० : मग काय, ह्या ताईताला—भुताची गोष्ट तर राहूं द्याच पण—माणसांच्या हातूनही स्पर्श करवणार नाहीं.

तुळो० : मी येतों तर, माझें हें काम बिनबोभाट झालें पाहिजे. रामराम.

(जातो.)

(दुर्गा व म्हाळसा गंगापूजेचें सामान घेऊन प्रवेश करितात.)

नमक० : चमकशास्त्री, असें बोलून बोलून घाबरें करून मोठी दक्षणा काढावी लागते. बाईसाहेबांच्या रोजच्या लघुरुद्राची व ह्या ताईतावरील अभिषेकाची व्यवस्था तूं कर. दक्षणा मात्र मला निम्मी दिली पाहिजे.

म्हाळ० : (पूजेचें सामान, भांडी वगैरे आपटून) कां म्हणून निम्मी दक्षणा ? पिशाच्च्याच्या मंत्रामुळें झालेली प्राप्ति कांहीं वडिलोपार्जित मिळकत नव्हे. निम्मी वांटणी पाहिजे म्हणे ! दादासाहेबांप्रमाणें इकडचा देखील भोळा अवतार; रुद्र म्हणायचा आपण आणि निम्मी दक्षणा म्हणे भाऊजींना !—दादासाहेबांनीं लढाई करायची आणि लूट जमवायची बापूंनीं.—बरें झालें; आपणाला मी देशस्थ बायको मिळालें, नाहीं तर मारुतीचें मिळकतींत भाऊजींनीं जसें फसविलें, तसेंच आतांच्या दक्षणेंत भाऊजींनीं तुम्हांला लुबाडलें असतें. मी देशावरची देशी आहें. मला हा देशस्थी कावा समजतो

हो. राबायचे वेळेला 'भाऊभाऊ' म्हणून गळ्यांत गळा घालायचा आणि पैसे मिळवायच्या वेळीं अशी भाऊबंदकी साधायची! मी नाही ग बाई दक्षणेची अशी वांटणी होऊ द्यावयाची.

दुर्गा० : (हातांतील भांडी आपटून) मेला मारुतीबद्दलचा तंटा चालला आहे, तेवढा पुरा नाहीं झाला वाटतें?—मी कधींपासून तुम्हांला सांगतें आहे, चमकभाऊजी कोंकणस्थ आहेत आणि हीं कोंकणचीं भुतें भांडण कधीं मिटवायची नाहींत. कज्जा, तंटा, भाऊबंदकी ह्यांच्या षष्ठीला पुजलेली!

म्हाळ० : गप्प बैस कोंकणदेवी, देशी नवरा मिळाला म्हणून कोंकणच्या भुतांना इतकी कांहीं नको नांवें ठेवायला?

दुर्गा० : कोंकणच्या भुकेकंगाल्यांना वठणीला आणावयाचा मीं आपणाला उपाय केव्हांच सांगितला आहे—

नमक० : आहे, ठाऊक आहे.

दुर्गा० : त्याप्रमाणें आपण चाललां असतां म्हणजे मारुतीचा तंटा दरबारापर्यंत गेलाही नसता—ह्या कोंकण्यांना जसेंच्या तसें उपाशी ठेवलें—

म्हाळ० : ऐकलें का—

चमक० : अग हो, पण तुझें तोंड बंद असू दे.

दुर्गा० : उपाशीं ठेवलें म्हणजे हे रेशमासारखे मऊ असतात. ह्यांना लांबून शितें दाखवावींत म्हणजे हपापलेल्या भुताप्रमाणें साता समुद्रापलिकडून हीं मागें लागून येतात; पण एक का शित त्यांच्या पोटांत गेलें म्हणजे बसलीं हीं भुतें मानगुटीवर, टाक निम्मी वांटणी म्हणून.—मी घाटाखालची कोंकणस्थ आहें हो! मला ह्यांच्या भाऊबंदकीचे डावपेंच सगळे समजतात.

म्हाळ० : बरें, बरें! समजूं देत—अभिषेकाचा हा ताईत आमच्या हातांत आहे. "ज्याच्या हातांत मुलाचा ताबा, त्याला म्हणतात बाबा बाबा." —ताईत आमच्या हातांत, तेव्हां सर्व दक्षणेचे मालक आम्हीच. दक्षणेची अर्धी वांटणी तरी मागायला या, कोतवालाच्या दाराशीं मी जाऊन ओरडीन, नमकभाऊजी दक्षणा निम्मी मागतात, पण रुद्रांतल्या चमकाच्या नांवानें आंवळ्याएवढें पूज्य.

दुर्गा० : आणि चमकभाऊजींना नमकाच्या नांवानें भोपळ्याएवढें पूज्य.

नमक० : ह्या घरभेद्या अवदसा भांडूं लागल्या म्हणजे अमक्याला अमकें येत नाहीं, तमक्याला तमकें येत नाहीं, सगळीं मर्में बाहेर काढतात. ह्या घरच्या

भांडणांमुळें बाहेरची कमाई बंद पडते.

चमक० : चला आतां घराकडे; आणि मग अंगणांत उभ्या राहून एकमेकींच्या झिंज्या धरून आमचीं आवर्तनें होईतों एकमेकींना शिव्यांची लाखोली वहात भाऊबंदकी साधा.

नमक० : येथें वाळवंटावर नको आमचा तमाशा जगाच्या दृष्टीला पडायला. उचला पाय लवकर; ते पहा नाना, बापू ह्याच बाजूनें येत आहेत; त्यांच्या देखत आमची अब्रू नका आणूं चव्हाठ्यावर. आम्हां कज्जेदलालांना जरी देवाची भीती वाटली नाहीं, जनलज्जेला जरी आम्हीं कज्जेदलाल जुमानीत नसलों, तरी अधिकारी काय म्हणतील इकडे कज्जेदलाल शास्त्र्यांनीं लक्ष पुरविलेंच पाहिजे. (बायका भांडी वगैरे लाथाडून तशींच टाकून जातात.) बायकांनीं भांडावें, आणि नवऱ्यांनीं निस्तरावें. उचला भांडीं; चमकशास्त्री, चला.

(शास्त्री सर्व सामान गोळा करून उचलून घेऊन जातात. दुसऱ्या बाजूनें नाना व बापू येतात.)

नाना० : बापू, आपणासारख्या वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व कर्त्या मुत्सद्यानें ही गोष्ट मनांत आणल्यावर यश आल्याखेरीज कसें राहील ?

बापू० : अखेर यश येईल हें खरें; पण आज आरंभ कोठून व कसा करावा, हेंच मला समजत नाहीं. नाना, खरोखर सांगू, माझ्या आयुष्याचा शेवट गोड होईलसें वाटत नाहीं. दादासाहेबांना पेशवा समजून त्यांच्या यशापयशाची काळजी वाहण्यांत धन्यता मानावी, तर दादासाहेबांनी अत्यंत भयंकर पाप केलें आहेसें मला वाटतें. लोकांची समजूतही तशीच आहे.

नाना० : दादासाहेबांनीं श्रीमंतांचा खून केला असें म्हणण्याला आम्हांजवळ पुरावा नसला तरी, दादासाहेबांच्या हुकूमाशिवाय नुसत्या घासाघाशींत श्रीमंत चुकून मारले गेले, हें मला खरें वाटत नाहीं. म्हणून म्हणतों, आपण जर या गोष्टीचा पुढाकार घेत असला तर नानासाहेबांशिवाय इतरांच्या वंशाला पेशवाईची गादी पचूं द्यावयाची नाहीं अशा शपथा घेण्यास राव-साहेबांच्या वेळचे सर्व सरदार तयार होतील. मातोश्री गंगाबाईसाहेबांना कांहीं दिवस गेले आहेत; पुत्ररत्न झालें तर उत्तमच; तसें नच झाल्यास त्यांच्या मांडीवर दत्तक देऊन राज्यकारभार चालविण्यास मात्र आपण तयार झालें पाहिजे.

बापू० :— नाना, पुढें काय करावयाचें, कसें करावयाचें, हा आतांचा प्रश्न नाहीं, पुढें—

नाना० : आम्हीं सर्व आपणांस वडिलकी देऊं—नारायणरावसाहेबांचा खून दादासाहेबांनीं केला—

बापू० : असें चारचौघांत उघड म्हणायला आम्हीं तयार आहों काय? नाना, प्रारंभ करायला अडचण पडते ती येथेंच. मनुष्याच्या अंगांत कितीही घाण असली, आंतून रक्त कितीही बिघडलें असलें, तरी त्या दुर्गंधीला तोंड पडून करटाच्या रूपानें म्हणा, तें पाप लोकांना दिसूं लागल्याशिवाय, पापी म्हणून बोट दाखवितां येत नाहीं. म्हणून म्हणतों, दादासाहेबांच्या दुष्कृत्याला तोंड पडून आंतील घाण आपोआप बाहेर पडूं लागेपर्यंत आपण स्वस्थ बसावें.

नाना० : आपण ज्या मसलतींत नाहीं त्या मसलतींत यश नाहीं; तेव्हां मी आपणांबाहेर केव्हांही जाणार नाहीं. पण तोंड पडेल आणि मग त्या व्रणांत चोंच खुपसून शत्रूस जेरीस आणूं, हा बेत कावळ्यांना साजतो; आणि आपणाला सर्व लोक कर्तुमकर्तुम समर्थ समजतात. अनुकूल कालाची वाट पहात बसणें दुबळ्यांना योग्य आहे; पण कर्ते पुरुष जर इतरांप्रमाणेंच वागूं लागले तर त्यांच्या पदरांत नामर्दपणा येतो. नानासाहेब मरण पावल्यावर आपणच माधवरावसाहेबांना दादासाहेबांची वडिलकी कबूल करावयास भाग पाडलें; राक्षसभुवनचे लढाईनंतर आपणच रावसाहेबांना दादासाहेबांच्या कैदेंतून मुक्त केलें; हैदरचे मोहिमेंत रावसाहेबांच्या पदरीं यश टाकणारे आपण; रावसाहेब जिवंत असतांना दादासाहेबांना कैदेंत टाकण्यास व पुन्हा सोडविण्यास कारण आपण; नागपूरच्या भोसल्यांचे डाव खेळणारे आपण; रावसाहेबांची दिगंत कीर्ति व्हावी म्हणून निरपेक्ष बुद्धीनें कारभार सोडण्यास तयार होणारे आपण; रावसाहेबांनीं मरतांना पेशवाईचा कारभार व नारायणसाहेबांचा हात; हीं दोन्हीं हातांत दिलीं आपल्याच. ते आपण जर आज आनंदीबाईच्या ओंजळीनें पाणी पिऊं लागलां—ते मुख्य कारभारी जर रायरीकर व भवानराव यांची अख्त्यारी व वडिलकी कबूल करूं लागले—तर अस्वलानें दरवेशाच्या नाकांत वेसण घालून दरवेशाला दारोदार फिरविल्यासारखें होईल व लोक असें म्हणतील कीं, नारायणरावसाहेबांचा खून बापूंनीच करविला असल्याशिवाय आनंदीबाईची वेसण बापूंच्या नाकांत बसलेली नाहीं. बापू, लोकांची एकदां अशी समजूत झाली, म्हणजे तुमची

इतक्या वर्षांची अब्रू एका क्षणांत भंग पावून कांचेच्या भांड्याप्रमाणें पुन्हा सांधतां येणार नाहीं, व तुमचे अनुयायी चोहोंकडे पांगून जाऊन दादासाहेबांच्या दुष्कृत्याला आपोआप तोंड पडावयाच्या वेळी तुम्हीं निःशक्त व निर्बल होऊन बसाल. म्हणून म्हणतों, तुमच्या हातांत शक्ती आहे, तोंच तुम्हींच दादासाहेबांच्या पापाला तोंड पाडलें पाहिजे.

बापू० : नाना, खरोखर सांगूं, नारायणरावसाहेबांचा खून झाल्यापासून माझे मन गोंधळून गेले आहे; भटकत कोठे तरी फिरावें; कोणाशीं कांहीं तरी बोलावें, आणि रावसाहेब माझ्या हातांत नारायणरावसाहेबांचा हात देत आहेत, असा एकदम भास होऊन वेडगळ मुद्रेनें व नजरेनें शेजाऱ्याकडे पहावें, अशी माझी स्थिति झाली आहे. रावसाहेबांनीं जेव्हां पेशवाईचीं वस्त्रें अंगावर घेतलीं, त्या वेळीं दादासाहेबांकडे कितपत वडीलकी राज्यकारभारांत ठेवायची ह्यासंबंधानें मातोश्री गोपिकाबाईनीं तटा उपस्थित केला. दादासाहेबांच्या अन्नावर मी वाढलों असल्यामुळें त्यावेळच्या गृहकलहांत दादासाहेबांची बाजू मला उचलून धरावी लागली; व गोपिकाबाईसाहेबांनीं आणि आगलावे गोपाळराव पटवर्धन यांनीं, ह्या देशस्थाचे डोळ्यांत कोंकणस्थ सलतात, पेशवाई अजिबात बुडवून मोंगलाई पुण्यास स्थापण्याचा ह्यांचा हेतु आहे असें नाना प्रकारचे खोटे आरोप मजवर आणले. पण रावसाहेबांसारखे गुणग्राही व कर्ते आम्हां सर्वांस लाभल्यामुळे त्यावेळच्या गृहकलहांतून निष्कलंक बाहेर पडलों. मजवरचे आरोप खोटे आहेत, हें दाखविण्याकरितां रावसाहेबांनीं सर्व राज्यकारभाराचा बोजा मजवर टाकला. रावसाहेबांच्या नांवलौकिकास कमीपणा येऊं नये व रावसाहेबांची खरी किंमत दुनियेस प्रत्यक्ष समजावी म्हणून मीही मुद्दाम म्हणून कांहीं दिवस कारभारांतून प्रत्यक्ष अंग काढून घेतलें. रावसाहेबांचा पूर्ण विश्वास अखेरपर्यंत मजवर होता व शेवटीं सर्व राज्यकारभार मजवर सोपवून व नारायणरावसाहेबांना माझ्या पदरांत टाकल्यासारखें करून त्यांनीं संसारयात्रा संपविली. (रामशास्त्री प्रवेश करतो.) रावसाहेब मरून दोनचार महिने झाले न झाले तोच श्रीमंतांचा खून झालेला ऐकून सर्व दुनिया मला काय म्हणेल? शिंदे, पटवर्धन, मामा वगैरे रावसाहेबांचे इष्टमित्र मला काय म्हणतील? गोपिकाबाईसाहेब मला कोणत्या शिव्याशाप देत असतील?

रामशास्त्री० : आणखी कोणच्या शिव्याशाप देणार? बापूंच्या संमतीशिवाय हा

खून झालेला नाहीं, असें सर्व दुनिया म्हणत आहे; गोपिकाबाई तेंच बोलणार; शिंदे हाच दोष देणार; पटवर्धन हाच आरोप ठेवणार; आणि मी रामशास्त्री—इहलोकच्या पापांची झडती घेण्याकरितां माधवरावसाहेबांनीं नेमलेला न्यायाधीश—मी रामशास्त्री, बापू, तुमच्या तोंडावर असें म्हणणार, कीं तुमचें अंग असल्याशिवाय श्रीमंतांचा खून झालेला नाहीं.

बापू० : गोपिकाबाईसाहेब, पटवर्धन किंवा फडके यांनीं मला खुनी म्हटलें तर इतकें वाईट वाटायचें नाहीं, पण नाना, निस्पृहपणा, न्याय व विद्वत्ता ह्यांच्या ह्या प्रत्यक्ष अवतारानें मला मालकाचा 'कपटानें घात करणारा' असें म्हटल्यानंतर जगांत तोंड दाखवायलाच जागा राहिली नाहीं म्हणावयाची.

राम० : बापू, खुनाला तुमची संमति असली पाहिजे, असें कां म्हणूं नये? गारद्यांनीं तनख्याच्या घासाघाशींत श्रीमंतांचा चुकून खून केला, असें दादासाहेब स्वतः कबूल करतात. श्रीमंतांशीं पगाराच्या बाकीकरितां भांडा व त्या भांडणांत मला कैदेंतून सोडवा, एवढें तरी दादासाहेबांनीं गारद्यांना सांगितलें होतें ना? ज्या गारद्यांनीं मालकाशीं अशी निमकहरामी केली, त्याच गारद्यांच्या मुख्यांना—सुमेरसिंगाला, खरकसिंगाला—सरदारकी कां देण्यात आली? तुम्हां कारभाऱ्यांच्याबरोबर, तुम्हां मुत्सद्यांबरोबर, तो खून करणारा सुमेरसिंग पालखीपदस्थ होऊन अबदागिराखालीं चाललेला पाहून बापूंच्या मनांत कोठे तरी अन्याय होत आहे, असें वाटावयास नको काय? त्या सरदाराच्या वांटणीला एक रुपया अधिक गेला, ह्याला मानाचें एक पान अधिक मिळालें, असें पाहून दरबारांत आकाश-पाताळ एक करणारे बापू, सुमेरसिंगाच्या पदरांत पांच लाख रुपये ओतण्यास व खरकसिंगाच्या डोक्यांत शिरपेच खोवण्यास तयार होतात, तेव्हां निमकहरामांनीं मालकाचा केलेला खून बापूंना प्रिय आहे, असें मीं कां म्हणूं नये? प्रत्यक्ष खुनाचा हुकूम दादासाहेबांनीं दिला नसेल, तरी ज्यांनीं खून केला त्यांना उच्च पदावर दादासाहेबांनीं बसविलें आहे ना?

नाना० : आम्ही सर्व गादीचे नोकर आहों. श्रीमंतांचे हुकूम पाळीत असलों तरी आम्हांला वाईट वाटत नाहीं असें नाहीं.

राम० : बापू, मी आतां ओंकारेश्वराच्या मंदिरांत सरकारी महारुद्र चाललेला पहावयास गेलों होतों, त्यावेळीं तेथें जमलेल्या ब्राह्मणांना मीं जें सांगितलें, तेंच मी तुम्हांला सांगत आहें. नारायणरावसाहेबांच्या खुनामुळें कोपलेल्या परमेश्व-

राला संतुष्ट करण्याचा खरा मार्ग म्हणजे ह्या खुनाबद्दल दादासाहेबांच्या मनाला वाईट वाटून पश्चात्ताप झाला पाहिजे; दादासाहेबांना जोपर्यंत ह्याबद्दल वाईट वाटत नाहीं, उलट ह्या खुनाच्या आनंदोत्सवांत जोपर्यंत ते मग्न आहेत, तोपर्यंत रात्रंदिवस कित्येक वर्षे जरी तुम्ही महारुद्र करीत बसलां, तरी त्यांच्यावरील परमेश्वरी कोप एक रतिभरही कमी होणार नाहीं. खून, अन्याय व पाप ह्यांच्या पायावर उभारलेल्या सत्तेचा वरून परमेश्वर व खालून लोक धिःक्कार करीत असतात. पश्चात्तापाशिवाय महारुद्राच्या अभिषेकांनीं परमेश्वर फसणार नाहीं, आणि पेशवाई मिळाल्यामुळें करण्यांत येत असलेला आनंदोत्सव व सुमेरसिंगासारख्या मारेकऱ्यांवर वर्षाव होत असलेले मान-मरातब बंद पाडल्याशिवाय, दादासाहेबांचें व बापूंचें प्रत्यक्ष अंग ह्या खुनांत नव्हतें असें कितीही निक्षून सांगितलें, तरी लोकांना तें खरें वाटणार नाहीं.

बापू० : नारायणरावसाहेबांचा खून झाला ह्याबद्दल श्रीमंतांना वाईट वाटतें व मलाही खेद होतो.

राम० : बापू, नारायणरावसाहेबांचा खून झाला ही गोष्ट फार वाईट झाली, असें जर दादासाहेबांना व तुम्हांला वाटत असेल, आणि ह्या खुनामध्यें खरोखर तुम्हां दोघांचें अंग नसेल, तर सांप्रतचे आनंदोत्सव थांबवून दादासाहेबांनीं प्रायश्चित्त घेतलें पाहिजे; व श्रीमंतांच्या गादीशीं गादी, हत्तीशीं हत्ती, पालखीशीं पालखी, अबदागिरीशीं अबदागिरी, अशी जी मारेकरी सुमेरसिंगाची दरबारांत मिजास चालली आहे ती बंद पाडून दादासाहेबांची व मारेकऱ्यांची ताटातुट तुम्हीं केली पाहिजे—अभिषेकाचें काम संपल्यानंतर सर्व ब्रह्मवृंदाला मीं माझ्या घरीं बोलाविलें आहे व दादासाहेबांनीं प्रायश्चित्त घेतल्याशिवाय कोणीही हिंदूनें त्यांची नोकरी करूं नये, व कोणीही ब्राह्मणानें त्यांचीं धर्मकृत्यें करूं नयेत असें आम्हीं ठरविणार आहों—तुम्हां मुत्सद्यांचे मार्ग निराळे, आम्हां शास्त्र्यांचे मार्ग निराळे—चालू देत तुमची खलबतें. —शास्त्री मंडळी जमूं लागली असेल, मला तेथें हजर राहिलें पाहिजे. (रामशास्त्री जातात.)

नाना० : बापू, दादासाहेबांच्या पापाला रामशास्त्री तोंड पाडणार बरें! निःस्पृह व विद्वान ब्राह्मणाचा हाच मोठा उपयोग असतो. मुत्सद्दी, कारभारी, सरदार इनामदार, तैनातदार, वगैरे दरबारी लोकांना अनुकूल कालाची वाट पाहात मनांतले मनांत चडफडत जिभेला लगाम घालून नेमस्त व मृदु शब्दांनीं

दरबारांत बोलावें लागतें; पण श्रीमंतीच्या व वतनवाढीच्या आडकाठ्या निःस्पृह विद्वानाच्या आड येत नसल्यामुळें त्याची शक्ती अमर्याद असते; त्यामुळें नवीन राजे, नवीन मुत्सद्दी, नवीन कारभारी, नवीन सरदार, नवीन इनामदार, नवीन तैनातदार, ह्यांना प्रसवणाऱ्या काळाचा तो प्रवर्तक होतो.

बापू० : नाना, माझ्या मनांतली अडचण रामशास्त्र्यांनीं दूर केली. प्रायश्चित्ताच्या प्रश्नानें सर्व लोकसमूहाला त्यांनीं हालवून सोडल्यावर सुमेरसिंगाला दूर करण्याविषयीचें पिल्लू आपण हलकेंच दरबारांत सोडून द्यावें. सर्व पुणें शहरभर किंबहुना सर्व महाराष्ट्रभर रामशास्त्र्यांनीं उत्पन्न केलेलें प्रायश्चित्ताचें वादळ भयंकर उग्र स्वरूप धारण करीत असतांना सुमेरसिंगाऐवजीं तुम्हालाच दूर करण्याची छाती राघोबाची होणार नाहीं व ह्या नवीन पिल्लाच्या स्वरुपाच्या वाटाघाटीच्या मिषाने दरबाऱ्यांच्या मनांत खरें काय आहे, हें नीट समजून घेण्यास व आपले बेत त्यांना कळविण्यास ठीक पडेल—नाना, ठरला माझा विचार—तुम्हीं आपला हात माझ्या हातांत द्या; रावसाहेबांच्या कारकीर्दीत राघोबाच्या पक्षाचे व श्रीमंतांच्या पक्षाचे म्हणून नांवाजलेले सर्व सरदार, सर्व मुत्सद्दी, सर्व कारभारी, सर्व देशस्थ, सर्व कोंकणस्थ एक होऊन बारभाईचें कारस्थान रचून ह्या खुनी मारेकऱ्यांना पुण्यांतून पिटाळून लावून रावसाहेबांच्या ऋणांतून मुक्त होऊं या. नवीन काळाची उत्पत्ति रामशास्त्र्यांसारख्या विद्वान निःस्पृहांकडे असूं द्या; ह्या काळाची स्थिति देशस्थ व कोकणस्थ ह्यांच्या आताच्या ह्या पूर्ण एकीकडे राहूं द्या; व आमच्या ह्या बारभाईच्या नवीन सुरू होणाऱ्या सत्तेचा—लोकगंगेच्या आता होणाऱ्या विजयाचा लय आपआपसांतील दुहीनें पुनः होऊं नये म्हणून तीनही स्वरूपांचा शास्ता जो ओंकारेश्वर त्याचें कृपाछत्र बारभाईवर सदैव असूं द्या.

(जातात)

क्र. २२६५

[स्थळ : शनवारवाड्यांतील पटांगण. सुमेरसिंग, खरकसिंग अबदागिऱ्यांसहित प्रवेश करतात.]

सुमेर० : सरदारसाहेब, दादासाहेबांकरितां साताऱ्याहून वस्त्रें येऊन दोन दिवस झाले, अद्याप वस्त्रें देण्याचा दरबार कां भरविण्यांत येत नाहीं ?

खरक० : मला देखील हें गूढच होतें व म्हणून त्याच तलासांत मी आजचा दिवस होतों. सरदारसाहेब, तुम्हांला ह्या दरबाराची रीत ठाऊकच आहे, कीं पेशवाईचीं वस्त्रें परिधान करून नवे पेशवे गादीवर विराजमान झाल्यावर गांवांतील व देशांतील विद्वान वैदिकांचा व शास्त्र्यांचा प्रथम आशीर्वाद व्हावयाचा असतो आणि नंतर सरदार, मुत्सद्दी, कारभारी, मानकरी ह्यांचे मुजरे व्हावयाचे असतात. रामशास्त्र्यांनीं सर्व विद्वानांचा व धर्माधिकाऱ्यांचा कट करून दादासाहेबांना आशीर्वाद देण्याचें नाकारल्यामुळें कट मोडेपर्यंत दोन दिवस दरबार भरविण्याचें काम लांबणीवर टाकण्यांत आलें आहे.

सुमेर० : कट मोडायची वाट कसली पाहताहेत कोण जाणे ! कोठे तरी अरण्यांत रामशास्त्र्यांना तपश्चर्येला पाठवून द्यावें व तेथील जंगल्यांना त्यांच्या कंदमुळांची व्यवस्था ठेवायला ताकीद द्यावी, म्हणजे कटही मोडतो व आपणावरही शब्द येत नाहीं—हे कोतवालसाहेब व नमकशास्त्री आले, ह्यांना विचारलें म्हणजे अधिक बातमी समजेल.

(तुळोजी व नमकशास्त्री येतात.)

सुमेर० : या, कोतवालसाहेब, या; रामराम. स्वारी गादीवर बसावयाचा समारंभ कधीं होणार ?

खरक० : रामराम, शास्त्रीबोवा, तुम्हीं शास्त्र्यांनीं श्रीमंतांच्या विरुद्ध कट केला आहे म्हणून बातमी आहे !

नमक० : छत् ! कसला कट आणि कसलें काय घेऊन बसलां आहां !—दरबारांत ज्यानें त्यानें मला हाच प्रश्न विचारला. श्रीमंतांनीं मला जवळ बोलावून घेतलें, एकीकडे नेलें,—आणि काय सांगू—काय लीनता, काय धर्मपरायणता —काय शास्त्रनिष्ठा—मूर्तिमंत धर्मावतारच—एकीकडे दादासाहेब मला अत्यंत

विनयानें विनंति करितात, शास्त्रीबोवा, तुमचा आशीर्वाद माझ्या शिरीं पाहिजे. मीं लगेच आशीर्वाद दिला. "अनंतकोटी ब्रह्मांडाचे जेते श्रीमंत झाल्यावांचून राहणार"—

सुमेर० : आम्हांला प्रथम रामशास्त्र्यांनीं जें बंड उभारलें आहे, त्याची हकीकत सांगा—आम्हां दोघांविरुद्ध तर त्यानें फारच तोंड सोडलें आहे म्हणून ऐकतों.

नमक० : अहो, बंड करण्याची रामशास्त्र्यांची काय माय व्याली आहे! बंड करतो म्हणे बंड! आम्हीं दरबारच्या शास्त्र्यांनीं काय हातांत कांकणें भरलीं आहेत?—बंड करतो म्हणे बंड!—आम्हां सर्व शास्त्र्यांच्या तोंडाला हा रगड काळें फांसील, पण आम्ही ऐकून घेतलें पाहिजे ना?—बंड करतो म्हणे बंड!

तुळो० : मग काय, गांवांतील इतर शास्त्री रामशास्त्र्यांच्या नादीं नाहींत ना?

नमक० : कोतवालसाहेब, तुम्ही आपली ही गांठ घालून ठेवा, मजसारखा कोणीही विद्वान, संभावित व वजनदार शास्त्री रामशास्त्र्याच्या बाजूला नाहीं—आणिक मी स्पष्ट सांगू? तुम्हींच रामशास्त्र्याला डोईजड करून ठेवलें!—विद्वान्, निःस्पृह,—विद्वान्, निःस्पृह—विद्वान्, निःस्पृह—अरे विद्वान् काय आणि निःस्पृह काय?

सुमेर० : विद्वान् नाहींत असें कसें म्हणावें?

तुळो० : निःस्पृह नाहींत असें कसें म्हणावें?

नमक० : कसला निःस्पृह—निःस्पृह; निःस्पृह—लोकांच्या संपत्तीकडे हा वाईट नजरेनें पाहणारा आहे बरें! वाईट नजरेनें—फार वाईट नजरेनें बरें—फारच वाईट नजरेनें—लहानपणीं हा पाणक्या होता पाणक्या!

सुमेर० : काय पाणक्या?

खरक० : काय पाणक्या? आम्हांला हें माहीतच नव्हतें.

नमक० : हो, हो, पाणक्या—पाणक्या—पाणक्या—पा-ण-क्या—स्वच्छ—पुन्हा म्हणतों पाणक्या—पाणक्या, आणखी काय? खरें बोलायला भीती कसली? मोठ्यानें म्हणतों, पाणक्या—पाणक्या—पाणक्या. खरें म्हटलें असतां आम्हीं ही पूर्वकथा सांगू नये. कांहीं झालें तरी आम्हां शास्त्र्यांपैकींच तो एक शास्त्री आहे. कज्जेदलालींत फार हुशार म्हणून चोहींकडे टिमकी वाजल्यामुळें—सरदारसाहेब, आपणाला माहीतच आहे, आमच्यासारखीं

घरंदाज, वजनदार, संभावित व खरी विद्वान माणसें आपल्या अंगाच्या गुणाची टिमकी वाजवीत नसतात. आमचें विद्वत्तेचें व परोपकाराचें काम गुपचूप चालूं असतें. आम्ही आमची विद्वत्ता मुद्दाम म्हणून झांकून ठेवतों. आमच्या डोक्यांत आलेल्या विचारांचा ध्वनि उजव्या कानांत आला तर डाव्या कानाला त्याचा पत्ता लागत नाही—उठल्या बसल्या जिभेची वटवट करणारे आम्ही नव्हेत. डाव्या डोळयाची खूण उजव्या डोळयाला कळत नाहीं असें गुप्त काम आहे. जिभेनें उच्चारलेल्या शब्दांची दाद ओठाच्या बाहेरच्या बाजूला लागत नाहीं. डाव्या हाताचें कर्म उजव्या हाताला माहीत नाहीं; आणि उजव्या पायाची चाल डाव्या पायाला ठाऊक नाहीं. ह्यामुळें लोकदृष्टीनें जरा वांकडे पाऊल पडल्यासारखें वाटतें खरें, पण कजेदलाल शास्त्र्यांनीं आमच्या नांवाचा गोंगाट केलेला आम्हाला खपत नाहीं. त्यामुळें रामशास्त्र्यांचें नांव झालें आणि न्यायाधीशाची जागा त्याला मिळाली. बाकी हा मूळचा पाणक्या आणि यजमानाच्या मोत्यांवर ह्याची वाईट दृष्टी गेली म्हणून यजमानाच्या पायावर ह्याच्या हातून पाणी देखील पडेना. अहो, असा हा संपत्तीचा नादिष्ट आहे बरें, नादिष्ट ! आणि तुम्ही म्हणतां निःस्पृह !

तुळो० : मग त्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण श्रीमंतांना सांगितलें आणि थोडी लालूच दाखवली—टाकला कुत्र्याच्या तोंडावर एक तुकडा—भोंकणें अजिबात बंद पडेल.

सुमेर० : हाच विचार करून मी श्रीमंतांच्या दर्शनाला चाललों आहें—नमकशास्त्र्यांनी पूर्वपीठिका सांगितली हें बरें झालें.—खरकसिंगजी, चला श्रीमंतांकडे जाऊं आणि घशांत अडकेल एवढा दीड लाखाचा घास चारून रामशास्त्र्याचें तोंड बंद करूं.

(खरकसिंग व सुमेरसिंग जातात.)

नमक० : कोतवालसाहेब, म्हटलें रामशास्त्र्यांना द्रव्याची लालूच दाखवून काय फायदा ? आम्ही सरकारच्या वतीने बोलतों तें कांहीं द्रव्याच्या किंवा मानमरातबाच्या लालुचीनें नव्हें; पण वरच्या लोकांना उपाशी ठेवून—आम्ही आपल्यासारख्याच्या पदरचे आश्रित—घरच्यांसारखे—आम्ही उपाशी रहावयाचे —आमच्या मारुतीरायाची देवळें टेंगणीं राहावयाचीं—आणि रामशास्त्र्यांना दीड लाखाचा मलिदा ! मी असें विचारितों—भुताखेतांचा बंदोबस्त, रोज आपणाकडून चमकशास्त्र्यांना—आपणाला आता गाढ झोंप लागत

असेल—ओंकारेश्वरापाशीं आमचें एवढें मागणें आहे—आपणां सर्वांना गाढ झोप लागावी आणि पिशाच्चें दूर पळून जावींत—आतां भूतबीत उरावर नाहीं ना बसत? आता तुम्हींच भुताच्या उरावर, तुम्हींच बसायचें, तुम्हींच बसायचें हां हां! मग मी विचारतों, लाख दीड लाखाचा घांस जो रामशास्त्र्याला चारायचा तो फोडून हजार पांचशेचे लहान लहान घांस केले तर अरुंद नरडीच्या किती शास्त्र्यांचीं तोंडें बंद पडतील, विचार केला आहेत का?

तुळो० : आईसाहेबांच्या इथें ही वाटाघाट झालीच. आईसाहेबांचें मत असें पडलें कीं पन्नास हजार दरबारच्या ह्या मुख्य धेंडाला द्यावेत, बाकीच्या एक लाखाचे शंभर घास करून—

नमक० : आम्हांसारख्या गोरगरिबांचींही पोटें भरावीत. माझ्या वांटणीला चमकशास्त्र्यांच्या वांटणीला, ह्या शंभर घासांपैकी प्रत्येकीं बरेच घास येतीलच. पोट पाहून घास चारण्यात येणारच; पण आपली विनंति करून ठेवितो. आम्हां दोघां भावांना मिळून एकाएकाला सबंध दहा घांस पाहिजेत—आनंदीबाईसाहेबांच्या कानावर ही गोष्ट घालतोंच, पण आपणालाही विनंति करून ठेवतों. दहा पांच लघुरुद्र झाले तर मेलेल्यांच्या भुतांचा बंदोबस्त होतो पण—

तुळो० : पण रामशास्त्र्यांसारखीं जिवंत भुतें उरावर बसूं पहात आहेत ना?

नमक० : आता तोच बंदोबस्त. चला, आईसाहेबांकडे जाऊन सर्व शास्त्र्यांना कशी दक्षणा द्यावयाची तें कायम करून घेऊं, म्हणजे रामशास्त्र्यांचें जिवंत भूत तेव्हांच गाडलें जाईल.

## प्रवेश चौथा

[स्थळ : शनवारवाड्यांतील एक महाल. पेशवाईचा पोशाख केलेला राघोबा हातांत आरसा घेऊन प्रवेश करतो.]

राघोबा० : (स्वगत) प्रायश्चित्ताची भानगड मिटून पेशवाईचा दरबार केव्हां भरेल तो भरो! ह्या महालांत गुपचुपपणानें मीं तर हा पेशवाईचा पोशाख

स्वतः अंगावर घातला! हा पोशाख अंगावर घालून गणेश महालांत पेशव्यांच्या गादीवर बसल्यावर मजकडे थोड्या भीतीनें, बऱ्याच कौतुकानें, किंचित् लोलूप नजरेनें दरबारी पहात असतां धन्यता वाटून मी वर पहावें, आनंदीची व माझी दृष्टादृष्ट व्हावी, अशी आनंदाची वेळ एक दोन दिवसांत देवा येईल ना? त्यावेळीं मी आनंदीला कसा दिसेन, हें पहाण्याकरितां मीं हा पोशाख गुपचूप आजच अंगावर घातला, आणि माझी पेशवाईच्या श्रीमंतीची छबी आरशांत पहाण्याकरितां हा आरसाही हातांत घेऊन इथें आलों— राजेलोकांना एकांत नसतो. लोकांच्या नजरेच्या प्रखर उजेडांतून पळून जाऊन काळोखांत एकीकडे थोडा वेळही काढण्याची राजांना पंचाईत पडते, म्हणून म्हणतात, तें खोटें नाहीं. पेशवाईचीं वस्त्रें अंगावर घालून एकांतांत आरशांत तोंड बघण्याकरितां मला किती हा अट्टाहास करावा लागला!—पण हे हात आरसा माझ्या चेहऱ्यापुढें कां धरीत नाहींत? ह्या पोशाखानें खुललेला माझा चेहरा किती उमदा दिसेल, ह्या सुखमय कल्पनेचा आस्वाद घेण्यांत माझें मन गुंतलें आहे; त्याच कल्पनेंत—प्रत्यक्षापेक्षां कल्पना अधिक गोड असते म्हणून— आणखी कांहीं वेळ माझें मन गुरफटून ठेवण्याचा, बा हातांनों, तुमचा हेतु आहे काय? त्रिभुवनांत न मानवणाऱ्या ह्या माझ्या आनंदाचे वेळीं तुम्हांला कष्ट होत आहेत काय?—तुमच्या यातना वाचाव्यात म्हणून मी माझ्या सुखसोहळ्यांत रतीभर कमी करून घेणार नाहीं; उचला आरसा वर. (आरसा वर करून चेहरा पाहून दचकतो व आरसा एकदम खालीं होतो.) काय मीं ह्या आरशांत पाहिलें हें?—माझा स्वतःचा चेहरा ह्या आरशांत मला न दिसतां माझे आजोबा मला कसे दिसले?—हां! बरोबर आहे!—माझे ओंठ व माझ्या आजोबांचे ओंठ सारखेच आहेत; आणि प्रथम माझी नजर आनंदीच्या चुंबनाकरितां सदोदित स्फुरणाऱ्या माझ्या ह्या ओंठांवर पडल्यामुळें सादृश्यानें आजोबांचाच चेहरा त्रिकालदर्शी मनाच्या आरशापुढें उभा केला. पण आनंदीच्या सहवासांत रंगेल दिसणाऱ्या ह्या त्यांच्या नातवाप्रमाणें माझे आजोबा सुखी कां दिसले नाहींत? मनुष्याच्या ओंठांवरून त्याच्या आयुष्यांतील सुखदुःखांचा अंदाज ज्योतिषी काढीत असतात; बाबांनीं मला नेहमीं म्हणावें, तुझे व आजोबांचे ओंठ सारखे आहेत; आजोबांच्या आयुष्यांत पहिला भाग अत्यंत दुःखात गेला, तेव्हा तुझ्या आयुष्याचा कोणता भाग दुःखांत जाणार? बाबा, आजोबांचीं दुःखें यापुढें माझ्या वांटणीला यावयाचीं

आहेत काय?—असल्या ह्या आनंदाच्या वेळीं हे काय भलतेच विचार माझ्या मनांत येतात!—आतां ओठांच्याकडे पाहावयाचेंच नाहीं.

(आरशांत पुन्हा पाहून दचकतो, आरसा खालीं पडतो व भीतीनें कांपत उभा रहातो. आनंदी एका हातांत तलवार व दुसऱ्या हातांत दागिन्यांचें तबक घेऊन येते.)

आनंदी० : असें काय उभें रहावयाचें? काय होतें आहे तरी काय?

राघोबा० : त्या आरशांत पहा म्हणजे समजेल.

आनंदी० : (आनंदी आरसा उचलून पाहते.) ह्या आरशांत माझा चेहरा दिसतो. मला पाहून का इतकें दचकावयाचें झालें?

राघोबा० : काय बाबांचा—बाजीरावसाहेबांचा—चेहरा तुला त्या आरशांत दिसत नाहीं?

आनंदी० : आपणास कांहीं तरी भास झाला हो.

राघोबा० : भास कसा होईल?—आरशांत पाहिलें त्या वेळीं मीं माझ्या नाकावर नजर ठेवली होती.—बाबांच्या नाकासारखेंच माझें नाक आहे. नाकावरून मनुष्याचा पराक्रम दिसून येतो;—व ज्या वेळीं माझे नाक मीं आरशांत पाहिलें त्यावेळीं मजप्रमाणेंच शूर असलेल्या माझ्या बाबांचा पराक्रम मला आठवला. असल्या कल्पनेनें बाबांचा चेहरा कदाचित मला आरशांत दिसेल ह्या भीतीनें मी माझी नजर नाकावरून डोळ्यांकडे एकदम नेली!—पहा, अजून त्या आरशांत पहा—इंगळासारखे लाल झालेले बाबांचे डोळे मजकडे रागानें पहात आहेत.—पहा अजून पहा,—आनंदी, रणांगणावर एकट्या मजवर चालून आलेल्या हजारों पठाणांच्या तलवारी म्यानांतून बाहेर झळकलेल्या पाहिल्यावर, भीतीचा लवलेशही माझ्या मनाला कधीं शिवलेला नाहीं; पण लहानपणीं बाबांना रागावलेले पाहिल्यावर जसा मी भित्र्या मुली-प्रमाणें कांपत असे, तसा आताही—ते आरशांतले त्यांचे—ते पहा—ते गुंजेसारखे लाल डोळे पाहून मी गर्भगळित झालों आहें.

आनंदी० : महाराज, ह्या आरशांत माझा चेहरा दिसतो, दुसरें कांहीं दिसत नाहीं.—आपणाला कांहीं तरी भास झाला इतकेंच.—आपण मजकडे एकदां प्रेमानें पहा, म्हणजे आपल्या मनांतील सर्व कुतर्क पार नाहींसे होतील.—गडे, पहावयाचें होतें मजकडे.

राघोबा० : (पाहून) तो आरसा कांहीं तरी जादूनें भारलेला असला पाहिजे. पण

तुझ्या चेहऱ्यांतही त्याहून अधिक जादू असली पाहिजे.—त्या आरशानें माझे सर्व पूर्वज मला दाखविले.—

आनंदी० : आणि माझ्या ह्या चेहऱ्यांत आपली स्वतःची मूर्ति महाराजांना दिसेल. हा पेशवाईचा पोशाख करून स्वतःचें रूप जर सरकारला पहावयाचें होतें तर त्या आरशांत कशाला पाहिलें ? माझ्या डोळ्यांत साठविलेलें हें ह्या पोशाखांतील आपलें रूप आपण माझ्या डोळ्यांत टक लावून पाहून घ्यावें— आपण हा पोशाख आतां अंगावर घातला, पण ह्यापूर्वींच माझ्या डोळ्यांतील सिंहासनावर विराजमान झालेली सरकारस्वारी पेशवाईच्या पोशाखानें नटलेली होती ! महाराज, मी आपलें मन प्रसन्न करण्याकरितां कांहीं तरी बोलत आहें असें आपण समजूं नका. माझ्या डोळ्यांतील आपल्या प्रतिमेकडे पहा, आणि हा हिऱ्या-मोत्यांचा पेशव्यांचा शिरपेच, हा पेशव्यांचा रत्नजडित कंठा, ही पेशवाईची तलवार, आपल्या अंगावर ह्यावेळीं असलेल्या पेशव्यांच्या ह्या अलंकारांनीं माझ्या डोळ्यांतील पेशव्यांची मूर्ति सजविलेली आहे कीं नाहीं, तें नीट तपासून घ्या.

राघोबा० : तुझें हें मोहक रूप मला केव्हांच मोहून टाकतें, आणि तूं आतांच्या-प्रमाणें बोलूं लागलीस म्हणजे भान नाहींसें होण्याला अवकाश लागत नाहीं. बाबांच्या किंवा आजोबांच्या संबंधाची एखादी गोष्ट आठवली म्हणजे बाबांची किंवा आजोबांची मूर्ति मघाशीं आपोआप मनापुढें उभी रहात असे; पण आनंदी, तुझ्या गोड शब्दांनीं मला इतकें गुंगून टाकलें आहे कीं, माझी पूर्वजांविषयींची स्मृतीच आतां नाहींशी झाली आहे.—मला ह्या वेळेला आजोबांचें नांव आठवत नाहीं; बाबांचें नांव आठवत नाहीं. माझ्या ह्या लाडक्या आनंदीचा मी पति, ह्या एका आनंदांत सर्व वस्तूंचा, सर्व विचारांचा, सर्व कल्पनांचा, सर्व स्मृतींचा लय होऊन मी स्वतः कोण, माझें नांव काय, हें ह्या वेळीं आनंदी, तूं मला विचारलेंस तर तेंही मला सांगतां यावयाचें नाहीं—पेशवाईचीं वस्त्रें अंगावर घालून मी कसा दिसतो, हें त्या आरशानें मला दाखविलें नाहीं, तर ह्या सौंदर्याच्या आरशांत—पाहूं दे मला ती तुझ्या डोळ्यांतील पेशव्यांची मूर्ति—किंवा अशीच खालीं मान घालून लाजत उभी रहा. तुझ्या डोळ्यांतील जादूगिरी तेजांत बुडालेल्या पेशव्यास हुडकून काढण्याची ताकद माझ्या अंगीं नाहीं—तुझ्या गालांच्या ह्या निर्मल लावण्याच्या आरशांत मला माझें प्रतिबिंब पाहूं दे.—आनंदी, अशीच अधिक अधिक

लाज.—तुझ्या गालांवर नाचणारें माझें प्रतिबिंब लाजेच्या प्रत्येक लाल छटे-बरोबर अधिक अधिक कोंवळें दिसूं लागलें आहे!—आनंदी, तो आरसा वर घे आणि तुझ्या गालांवर दिसणारें माझें कोमल व नाजूक चित्र पहा. असा कोमल व नाजूक राघो भरारी पुन्हां पहावयास तुला मिळणार नाहीं.

आनंदी० : माझी एक विनंती ऐकल्याशिवाय आरशांत माझा चेहरा मी नाहींच पहावयाची.

राघोबा० : काय हुकूम करावयाचा असेल तो खुशाल कर. अनमान कां?

आनंदी० : महाराज, पेशवाईचीं वस्त्रें अंगावर घालून आपण इकडे आलेले पाहून, आपलें रूप पहाण्याकरितां मीही लगबगीनें इकडे यावयास निघालें. गणेश दरबारांत वरच्या खिडक्यांतून दुरून आपणांस पहाण्यापेक्षां अगदीं जवळून ह्या पोशाखांत पाहण्याचा योग मला स्वर्गसुखाचा वाटत आहे. आपण येथें बसायचें होतें; डोळे भरून आपणांला ह्या पोशाखांत पाहूं द्या—बसायचें ना!—मनाची तृप्ती होईतों हें रूप पाहण्याची मला परवानगी असावी—हें काय बरें गडे, बसायचें म्हणतें ना!

(दादासा० बसतात.)

राघोबा० : तूं तो आरसा घेऊन मजजवळ बैस आणि तुझ्या गालांच्या आरशांत स्वतःचा चेहरा पाहात असलेल्या पेशव्याला तूं मनमुराद हातांतील आरशांत पहा.—ये, अशी आरसा घेऊन मजजवळ बैस.

आनंदी० : पण अगोदर हा शिरपेंच आपल्या मंदिलांत खोचण्याची मला परवानगी असावी. (तसें करते.) महाराज, हा शिरपेंच सातान्याहून छत्रपतींकडून आलेला नव्हे. आपण म्हणत होतां, सांप्रतचे छत्रपति अपेशी असून त्यांच्या हातून वस्त्रें मिळून जसे दोन पेशवे—तो माधव—तो नारायण—अकालीं मरण पावले, त्याप्रमाणें तिसऱ्याचीही गत होईल. हें छत्रपतींचें अपेश आपणाला बाधूं नये म्हणून मीं स्वतःच्या दागिन्यांतील मोतीं व हिरे वेंचून काढून हा शिरपेंच बनविला आहे.

राघोबा० : खरे पाहूं गेलें असतां 'ध'चा 'मा' करून तूंच मला पेशवाईची गादी दिलीस; तेव्हां पेशवाईचीं वस्त्रें छत्रपतींपाशीं मागण्याऐवजीं आपणांपाशींच आम्हीं मागावयास पाहिजे होतीं.—शिरपेंचानें ती आमची चूक आतां दुरुस्त झाली आहे.

आनंदी० : हा कंठाही सातान्याहून आलेला नव्हे.—आपण मध्यंतरीं दत्तक

मुलगा घेतला होता; दिल्लीहून थोरले मामंजींनीं आणलेला हा कंठा त्यावेळीं त्या दत्तकाला देणार होतां; पण त्यावेळीं तो मीं आपणांपासून रागानें मला होणाऱ्या मुलाकरितां भांडून घेतला. त्या पुढच्या पेशव्याचे गळ्यांत—सवाई बाजीरावाचे गळ्यांत–लटकणारा हा कंठा तीन पिढ्या पेशव्यांच्या गळ्यांत लोळलेला असावा म्हणून आज मी आपल्या गळ्यांत घालीत आहें (कंठा घालते.) खरेंच गडे, बायकांप्रमाणें पुरुष अंगाखांद्यावर दागिने कां घालीत नाहींत कोण जाणे बाई !—हा पोशाख अंगावर आणि हा कंठा गळ्यांत—सर्व जन्मभर हें असले रूप मनांत सांठवून ठेवावेंसें वाटतें !—आपण कधींही हा कंठा गळ्यांतून काढूंच नये—पुरुष स्वतःच्या डोळ्यांच्या सुखाची जितकी काळजी घेतात तितकीच काळजी बायकांच्या डोळ्यांच्या सुखाची त्यांनीं घेतली, तर पुरुषांचें नाक नाही तरी कान, गळा, हात ओकेबुके कधींच रहावयाचे नाहींत.

राघोबा० : आतां दागिने आम्हीं आपल्या अंगावर नेहमी घालतों आणि तलवार तुमच्याच हातांत नेहमी असूं दे—माझ्या पाठीमागें लोक मला म्हणे स्त्रैण म्हणतात, आणि आपण म्हणतां तसें मी करूं लागलों तर तोंडावरच स्त्रीलंपट—

आनंदी० : नको, आपणांवर तसा आरोप यायलाच नको.—ही तलवार हातांत घ्यावयाची होती. आतां आपण मजजवळील ह्या आरशांत रूप पाहिलें म्हणजे हा शिरपेंच, हा कंठा, ही तलवार ह्या दागिन्यांमुळें किती तरी सुंदर—

राघोबा० : तुझ्या ह्या स्मित हास्याच्या आरशांत माझ्या अंगावर हे दागिने पूर्वींच दिसत होते ! नाकांतील नथेच्या मोत्यांचें मंद हास्यांतील प्रतिबिंब तुझ्या गालावरील माझ्या चित्रांत शिरपेंचाचे जागीं बसलें होतें; ह्या तांबड्या म्यानाच्या तलवारीची उणीव तुझ्या लाल अधरोष्ठानें भरून काढली होती !—आनंदी, ये आरसा घेऊन जवळ बैस. (बसते.) एक हात माझ्या गळ्यांत घाल आणि दुसरा ह्या कंठाजवळ ठेव. तूं अशी जवळ असल्यावर माझी शक्ति पुन्हा माझ्या अंगांत येते.—दे माझ्या हातांत तो आरसा. (हातांत आरसा घेतो.) आतां मी पुन्हा माझा चेहरा ह्या आरशांत बघणार; आणि आनंदी, ह्या वेळी तुझ्या शेजारीं मी व माझ्या शेजारीं तूं, दोघांशिवाय कोणीही ह्या आरशांत दिसतां कामा नये.

आनंदी० : आपण कांहीं मनांत भलतें सलतें आणूं नये. म्हणजे आपणां

दोघांच्या प्रेमाशिवाय मामंजी बिमंजी कोणी आरशांत दिसणार नाहींत.—असा चेहरा कावराबावरा कां करायचा!—धिटाईनें आरसा उचलायचा होता. हें पहा, मनांतदेखील आणूं नका कीं नारायणाचा—करायचा वर आरसा—(आरसा वर करतो.) मनांत नारायणाच्या खुनाची—

राघोबा० : (दचकून उठून) काय मी पहातों आहें! सोड, सोड, माझ्या मानेवरचा हात काढ, माझ्या गळ्यावरचा हात काढ—ते पहा, माझे आजोबा, माझे बाबा, ते नानासाहेब, तो माधव, तो नारायण, आणि शेवटीं तो मी!—आनंदी, प्रत्येकाची मानगुटी एका हातानें पकडून दुसरा हात प्रत्येकाच्या नरडीवर ठेवून, आंगठा दाबून, सर्व पेशव्यांचे प्राण तूं घेत आहेस, असें मला ह्या आरशांत दिसतें! (आनंदी दूर होते) पांचांच्या शेजारीं पांच आनंदी दिसताहेत!—आनंदी, आजोबांचें नरडे दाबलेंस, बाबांचा प्राण दुसरीनें घेतला, नानासाहेबांना त्या तिसरीनें मारलें, चवथीनें माधवाचा जीव घेतला, पांचवी आनंदी नारायणाचा खून करीत आहे हो खून—धांवा धांवा, नारायणाचा खून आनंदी—'ध' चा 'मा' करून (एक दासी येते) माझ्या हुकुमांत 'धरावें' असें असतां 'मारावें' असें लिहून—'ध' चा 'मा' करून ही आनंदी नारायणाचा खून करीत आहे. धांवा धांवा—

आनंदी० : हें काय तें भलतेंसलतें बडबडायचें!—तुला कोणी येथें यायला सांगितलें ग?

दासी० : 'धांवा' 'धांवा' हे शब्द ऐकून मी आलें.

आनंदी० : (आरसा घेऊन) जा, हा नेऊन माझ्या महालांत ठेव. (दासी आरसा घेऊन जाते.) आपण माझ्या महालांत चलावयाचें होतें; तेथें आपणाला बरें वाटेल; आणि असा भलताच भास व्हावयाचा नाहीं. (त्याला घेऊन जाते).

(पडदा).

अंक दुसरा समाप्त
२२६८५

## अंक तिसरा
### प्रवेश पहिला

[स्थळ : शनवारवाड्यांतील एक दालन. दोन दासी प्रवेश करतात.]

प० दासी : बाईसाहेब म्हणत होत्या, सुवासिनींना वाटावयाचे दागिने आतां संपले.

दु० दासी : वा ग वा ! मोठें प्रायश्चित्त घ्यावयाचें ठरलें आहे, तेव्हां श्रीमंत व बाईसाहेब दोघांची मिळून सोन्याची तुळा व्हावयाची आहे.

प० दासी : सोन्याची तुळा काय म्हणून ?

दु० दासी : काय म्हणून काय विचारतेस ? पुतण्याचा खून करून श्रीमंत गादीवर बसले ना ?

प० दासी : मग काय दादासाहेबांच्या भारंभार सोन्याइतकीच धाकट्या श्रीमंतांची किंमत होती होय ?—हा हिशेबच जमत नाहीं—प्रायश्चित्त म्हणजे ब्राह्मणांचा पैसा उकळण्याचा धंदा आहे झालें—मीं जर माझ्या पुतण्याचा खून केला असता, तर मला कोणतें प्रायश्चित्त दिलें असतें ?

(म्हाळसा व दुर्गा येतात.)

दु० दासी : कोणतें म्हणजे काय विचारतेस ? मिरच्याकोथिंबिरीची किंवा कांद्यावांग्यांची तुळा करायला सांगितली असती; फार झालें तर अळूच्या पेंड्यांची तुळा—

प० दासी : बरें झालें बाई ! ह्या शास्त्रीणबाई आल्या; ह्यांनाच विचारूं या, पुतण्याच्या खुनाला कोणत्या पदार्थाची तुळा शास्त्रांत सांगितली आहे ?

दु० दासी : म्हटलें, शास्त्रीणबाई, थोडासा शास्त्रार्थ प्रश्न विचारावयाचा आहे.

प० दासी : म्हटलें, रामशास्त्र्यांपुढें आपले यजमान नेहमी कोणच्या ना

कोणच्या कज्जांत—

दुर्गा० : म्हाळसाबाईचे यजमान—भाऊजी चमकशास्त्री कज्जांत भांडायला जातात! व्यवहारशास्त्र भाऊजींना कळेल तर कज्जांत भांडायला कोणी बोलावणार!—अग, चमकभाऊजी पोथ्यापुस्तकांतले किडे असतील; पण व्यवहार समजून तोंडांतून शब्द उमटला पाहिजे ना?

म्हाळ० : आणि नमकभाऊजींना काय येतें? रुद्रही येत नाहीं आणि कोणची स्मृतीही पाहिलेली नाहीं.—घरीं येऊन आमच्याशीं सर्व पोथ्यांतले आधार विचारावयाचे आणि राजवाड्यांत येऊन ज्याला त्याला नमस्कार करून मोठमोठ्या दक्षणा उपटावयाच्या!

प० दासी : खुनाला प्रायश्चित्त कोणचें, हें अगोदर सांगाल की नाहीं?

दुर्गा० : म्हाळसाबाईला काय विचारतेस? चमकभाऊजी रामशास्त्र्यांच्या सभेंत कधीं बोललेले ऐकलें आहेस काय? सभा म्हटली कीं बसली खिळी भाऊजींच्या तोंडाला!

दु० दासी : मग दुर्गाबाई, तुम्हींच सांगा, पुतण्याचा खून केला तर शास्त्रांत कोणचें प्रायश्चित्त सांगितलें आहे तें?

म्हाळसा० : ह्या दुर्गाबाईंना काय विचारतेस? नमकभाऊजी राजवाड्यांतले भाट आहेत, त्यांना शास्त्रार्थ कोठचा माहीत असणार?

दुर्गा० : मोठी आली आहे शास्त्रीणबाई! तू तेवढी शास्त्र्याची बायको आणि मी भाटाची बायको, नाहीं का? नवऱ्याच्या नांवावर विकणारी ही दुर्गा नव्हे, समजलांत का शास्त्रीणबाई?—बाईसाहेबांना माणसांची खरी पारख आहे. मीं नेसलेला हा शालू पहा, माझ्या ओटींत परवां हा शालू घातला. माझ्या शालूवर पाहिली का कशी चमकणारी बुट्टी आहे ती! नाहींतर तुम्हांला दिलेला पहा, त्याला कांठाशिवाय कोठें तरी जर आहे का?

प० दासी : चमकशास्त्र्यांच्या बायकोला चमकणाऱ्या शालूची जरुरी नाहीं म्हणून बाईसाहेबांनीं साधा शालू म्हाळसाबाईंना दिला.

म्हाळ० : भाटाची बायको म्हणून म्हटलें तीं उगीच नाहीं—भपकेदार पोषाख दिला म्हणजे भाट खूष!—बाईसाहेबांनीं टिकल्यांचा शालू तुम्हांला दिला खरा, पण दागिने वांटले यांत साध्या चौकड्यांची नथ दुर्गाबाईला आणि—

प० दासी : हिऱ्याच्या टिकलीच्या गरक्याची नथ खऱ्या शास्त्रीणबाईला!

म्हाळ० : बाई, आतां नथ नका लपवूं. तीं उतरलेलीं, वेजीं पटलेलीं मोतीं

दिसूं देत सर्वांना. कशी पण एखाद्या म्हातारीला साजेशी नथ चांगली आहे—नका, नका तोंड लपवूं आतां.

दुर्गा० : ह्या मेल्यांनों, मी कशाला तोंड लपवीन?—नवऱ्यांत चमक नाहीं, देशस्थी चेहेऱ्यांत चमक नाहीं, तेव्हां बाईसाहेबांनीं नथेंत टिकलीची तरी चमक आणली, बरें झालें!

दु० दासी : चल ग, आपण कामाला जाऊं. ह्या शास्त्रीणबाईंचीं भांडणें कधीं संपायची नाहींत (जाऊं लागतात.)—भांडखोर शास्त्र्यांपेक्षां शास्त्रीणबाईंचीं भांडणें फार भयंकर. रामशास्त्र्यांपुढें खटला चालला असतांना कज्जेदलालीच्या पैशासाठीं तरी शास्त्री एकमेकांशीं भांडतात, आणि—

प० दासी० : ह्या कज्जेदलालांच्या बायका आणि मुली वाऱ्याशीं फुकट भांडणाऱ्या असतात!

म्हाळसा : ए दासींनों, जरा थांबा, तुम्हांला या दुर्गाबाईच्या नथेची दुसरी एक गंमत सांगतें—सगळ्या राजवाड्याभर हें सांगून टाकतें, पुन्हा म्हणून बाईंनी घरीं कीं दारीं तोंडच काढू नये—या अशा—दुर्गाबाईची नथ गरक्याची नाहीं आणि टिकली नाहीं इतकेंच नव्हे पण—पहा, ती पहा—तिच्या चौकड्यांचीं व जोडीचीं मोत्यें माझ्या झुळमुळ्याएवढींही नाहींत!—आतां नको कांहीं लपवायला! कोंकणदेवीच्या चेहेऱ्यावर काय तेज—अहाहा! झुळमुळ्यांचें सुंकलेंच असल्या सतेज चेहऱ्याला योग्य!—बाईसाहेबांनीं नाकांत सुंकलें अडकविलें आहे, आणि म्हणे बाईसाहेबांची ह्यांच्यावर मर्जी!

दु० दासी० : दुर्गाबाईच्या नाकांतल्या नथेवर टिकली नाहीं—मी सांगू का खरें त्याचें कारण?

प० दासी० : मी सांगतें. कोंकणदेवीच्या नाकांत कायमचा अनुस्वार आहे म्हणून हो!

म्हाळसा, प० दासी, दु० दासी : (सर्व मिळून)—मग नथेवर आणखी हिरकणीचा अनुस्वार कशाला पाहिजे?

दुर्गा : कोंकणदेवी, कोंकणदेवी,—कोणाची ग थट्टा करतां? हा पेशव्यांचा—कोंकणस्थांचा वाडा आहे हो.—कोंकणदेवी, कोंकणदेवी!—मी बाईसाहेबांच्या पुढें जाऊन सगळें सांगतें,—हीं वेंजीं उतरलेलीं मोतीं—हें झुळमुळ्यांचें सुंकलें—सुंकलें ना हें?—अस्सें फेकून देतें. (नथ म्हाळसेपुढें फेकतें.) कोंकणदेवी, कोंकणदेवी म्हणून दासींनींही थट्टा करायची म्हणजे काय!

(नथ म्हाळसा उचलते व दुर्गा जाते.)

प० दासी : बरें शास्त्रीणबाई, बरें केलेंत; तुम्ही देशस्थ असून बरी नथ उचलून घेतलीत. दुसऱ्याचें द्रव्य टिपून उचलण्याची संवय देशस्थांना बरी लागली आहे!

दु० दासी : अग, देशस्थ-कोंकणस्थांचा बेटीव्यवहार पेशव्यांनीं सुरूं केल्यापासून देशस्थांनाही कोंकणस्थांचे गुण लागले आहेत. आजकालचे देशस्थ कोठें का दिडकी पडलेली असू द्या, उचलून घ्यायचेंच.—कोंकणस्थ नवरा असल्याचा फायदा शास्त्रीणबाईंना चांगला झाला!

म्हाळ० : अहो दुर्गाबाई,—बाई—बाई—जरा थांबा. ह्या दासी फारच मस्त-वाल झाल्या बरें का!—बाईसाहेबांना कळविलेच पाहिजे. ही तुमची नथ घ्या. मीही बाईसाहेबांच्याकडे येते—या अशा परत. (दुर्गा येते.)

दुर्गा० : बरें झालें. ह्या दासींनीं देशस्थांवरही जेव्हां हत्यार धरलें, तेव्हां मला परत बोलावूं लागली. दासींनों करा, अशीच देशस्थांची थट्टा करा.

म्हाळसा : ही नथ घ्या तुमची. बाईसाहेबांजवळ तुम्ही नथ परत केलीत, म्हणजे मीही माझा हा बिनबुट्ट्याचा शालू मला नको म्हणून सांगणार आहे.

दुर्गा० : तुम्ही बाईसाहेबांना म्हणा, म्हाळसाबाईंना बुट्टेदार शालू द्या.

म्हाळसा० : पण प्रथम मी ह्या दासींची खोड मोडणार—

दु० दासी० : आम्ही चिडविल्यामुळें ह्या दोघी एक झाल्या.—काय ग, आम्ही दासी आणि थोरामोठ्यांच्या बायकांची थट्टा करतों, म्हणून बाईसाहेबांच्या मनांत ह्यांनीं भलतेंसलतें भरविलें आणि बाईसाहेबांनीं आपणांस हांकून दिलें—

प० दासी० : ह्या शास्त्रीणबाईंना इतके कांहीं नको भ्यायला! ह्यांच्या हातांत आहे काय?

म्हाळसा : चला हो दुर्गाबाई, बाईसाहेबांच्या कानावर ह्या गोष्टी घातल्याच पाहिजेत.—

प० दासी : खुशाल घाला, आम्ही बिलकूल भीत नाहीं.—इतकेंच नव्हे, तर तुमच्याहून अधिक किंमतीचा शालू व मोठ्या घेराची नथ बाईसाहेबांकडून घेतल्याशिवाय मी रहावयाचीच नाहीं.

दुर्गा० व म्हाळसा : आमचेहून का तुझी योग्यता जास्ती?

प० दासी : कां नसावी? जमादार सुमेरसिंग मोठा सरदार झाला, त्याच्या डोक्यावर अबदागीर चढली; कालचा तुळ्या हुजऱ्या आज तुळोजीराव कोतवाल

झाले. मग आजच्या ह्या दासीनें उद्यां मोठा शालू नेसून गरक्याची नथ घालून शास्त्रीणबाईवर ताण कां करू नये ?

दुर्गा० : सुमेरसिंग, तुळोजीराव, नारायणरावसाहेबांच्या दंगलीच्या वेळेला हजर होते. पण तूं—

प० दा० : मी—मी—मीही हजर होतें. केव्हां ठाऊक आहे का ?—मी हजर होते त्या वेळेला श्रीमंत बाईसाहेबांना म्हणत होते ?—

तिघी मिळून : काय म्हणत होते ?

प० दा० : "आनंदी, तूं 'ध'चा 'मा' करून नारायणाचा खून केलास" असें श्रीमंत म्हणतात, तों मी आंत गेलें.—पुनःपुन्हा श्रीमंत म्हणाले—"आनंदी, तूं 'ध' चा 'मा' करून नारायणाचा खून केलास—आनंदी तूं 'ध' चा—

(रामशास्त्री, दादासाहेब व आनंदीबाई येतात.)

राम० : दादासाहेब, हा संशय मलाच येतो असें नाहीं, तर लहानथोर सर्व लोक हाच संशय कुजबुजत असतात. आपण आतां ह्या दासीच्या तोंडचे शब्द ऐकलेच आहांत; ह्या शब्दांवरून आपलेंही मन आपणांस खात असावेसें मला वाटतें.

आनंदी० : काय मेल्या ह्या मस्तवाल दासी तरी !—लोकांना पडलेलीं स्वप्नें सगळया शहराला जाहीर करणाऱ्या ह्या गजघंटा मेल्या ! शास्त्रीबाईंना माझ्या महालांत नेऊन बसवा, जा, मीही आलेंच.

(दासी व शास्त्रीणबाई जातात.)

दादा० : शास्त्रीबोवा, माझें मन खरें म्हणाल तर उदास झालें आहे. आजकालचे छत्रपति मला फार अपशकुनी दिसतात; आणि माझें मन मला असें सांगतें कीं, इजा, बिजा, तिजा होऊन चौथ्या पेशव्याला वस्त्रें देण्याचा प्रसंग ह्या छत्रपतींवर लवकरच येईल; म्हणून म्हणत होतों, ह्या पेशव्यांच्या गादीची मला कटकटच नको, पण हिचा हट्ट पुरविण्याकरितां पेशवाईचीं वस्त्रें धारण करण्याचें मी कबूल करीत आहें. अशा प्रसंगी दरबारांत कोणच्याही प्रकारचा बखेडा नसावा, म्हणून आपण सांगाल तें प्रायश्चित्त घेऊन, माझें मन शुद्ध आहे, हें दुनियेला जाहीर करण्यास मी तयार आहें.—नारायण मारला गेला, ही गोष्ट वाईट झाली; आणि नारायणाच्या जागीं मी मारला गेलों असतों, तरी मला परकरलें असतें; तेव्हां आमच्या कुळाला झालेल्या ह्या

अपशकुनाकरितां कांहींतरी शांत करणें जरूर आहे.

आनंदी० : शांत करायला कोण नको म्हणतें आहे?—मोठा दानधर्म करावा, जुन्या देवळांचा जीर्णोद्धार करावा, नव्या देवळांना वर्षासनें द्यावीत आणि साधुसंतांना भंडारा करावा, पण प्रायश्चित्त काय म्हणून?—शास्त्रीबोवा, आपणच सांगा, दोषावांचून प्रायश्चित्त घेणें, हें पाप नाहीं का? आणि ह्या पापाबद्दल पुन्हा प्रायश्चित्त घ्यायला नको का?—गारद्यांच्या बोलाचालींत नारायण चुकून मारला गेला, ही भयंकर चूक झालेली पाहून गारदी प्रथम भीतीनें गांगरून गेले; पण मग असेंही मरणार, तसेंही मरणार असें वाटून शनवारवाड्याची व सर्व शहराची लुटालूट करून येथून पळून जाण्याचा त्यांनीं बेत केला; अशा वेळीं इकडून जिवावर उदार होऊन सुमेरसिंग, खरकसिंग ह्यांची समजूत घालण्याचें झालें; गारद्यांना शांत करून पुणें व पेशवाईची अब्रू वांचविणें झालें; ह्याबद्दल का प्रायश्चित्त घ्यावयाला आम्हांला सांगतां? हेंच का तुम्हां शास्त्र्यांच्या पोथ्यांत सांगितलें आहे?—नाहीं ग बाई, हे शास्त्री नसेल तेथें तंटा उपस्थित करतील.—शास्त्रीबोवा, आपण मुख्य न्यायाधीश, इतर कज्जेदलाल शास्त्र्यांप्रमाणें आपण जर वागूं लागलां तर पृथ्वीतलावर न्यायच उरला नाहीं म्हणावयाचा!

दादा० : शास्त्रीबोवा, ह्या अपशकुनाबद्दल शांत करावी, प्रायश्चित्त काय म्हणून घ्यावयाचें? नारायणाच्या कैदेंतून मीं स्वतःची सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला, हा अपराध होतो काय? ही गोष्ट मीं कबूल करतों कीं, आवेशात गारद्यांच्या हातून भलतेंच कृत्य झालें. पण कैदेंत पडलेल्या ह्या राघोबाच्या हातून गारद्यांना कसेंबसें शांत करण्यापलिकडे दुसरें काय होण्यासारखें होतें?

आनंदी० : इकडच्याऐवजीं आपणांवर जर शास्त्रीबोवा, तो प्रसंग गुदरला असता, तर आपण काय केलें असतें?—शास्त्रीबोवा, तुम्ही पेशव्यांचे कुळांत जन्माला आलां असतां, भाऊबंदकीमुळें तुम्हांला दोनतीन वेळां कैदेंत पडण्याचा प्रसंग आला असता, शेवटीं निराश होऊन देवाचें नांव घेऊन कैदेंत दिवस कंठीत असतांना तुमच्याबद्दल हळहळणाऱ्या तुमच्या मित्रांनीं जर कैदेंतून तुम्हांला सोडविण्याचा प्रयत्न केला असता, आणि ह्या प्रयत्नांत त्यांच्या हातून चुकून जर तुमच्या भाऊबंदांपैकीं एखादा मारला गेला असता, तर काय तुम्ही आपल्या मित्रांना दूर लोटून दिलें असतें आणि प्रायश्चित्त घेतलें असतें?

राम० : दादासाहेब, हें मी कबूल करतों कीं, तुम्हीं निर्दोषी असण्याचा संभव आहे. हा आपआपसांतील भांडणाचा काळ आहे; आणि ह्या भांडखोर काळाबद्दल तुम्हांला एकट्याला तरी दोष कां द्यावा? परंतु भाऊबंदकीचा घातुक प्रघात पेशव्यांच्या घराण्यांत ज्या कारणामुळें पडला, त्या कारणांत तुमची स्वतःची जर प्रामुख्यत्वेंकरून गणना झाली नसती, आणि जी दुष्ट भाऊबंदकी तुम्ही माजविलींत, तिचा शेवट जर वारसदार पेशव्यांचे खुनांत झाला नसता, तर तंट्याबखेड्याच्या ह्या काळांत तुमचा एखादा नातेवाईक तुमच्या पक्षपाती मित्रांकडून चुकून मारला गेल्याबद्दल मीं आपणांस प्रायश्चित्त घेण्यास सांगितलें नसतें.

आनंदी० : आम्ही अखेरीस पेशव्यांचे गादीवर बसलों, एवढ्याचकरितां प्रायश्चित्त घ्यावयाचें, असेंच ना आपलें म्हणणें!—श्रीमंतांची श्रीमंती शेजाऱ्यापाजाऱ्यांचा विश्वासघात केल्याशिवाय प्राप्त झालेली नसते, आणि अधिकाऱ्यांची सत्ता दोस्तांच्या माना मुरगळल्याशिवाय वाढलेली नसते, असल्या शाब्दिक सिद्धांतांवर भार ठेवून एखाद्यास पुराव्याशिवाय दोषी ठरविणें हें विद्वान व निःस्पृह म्हणून नांवाजलेल्या रामशास्त्र्यांना तरी ंभत नाहीं. श्रीमंती व सत्ता ही परमेश्वरी शक्ति नसून पापाची जर हुंडी असेल, तर सर्व श्रीमंतांना व सत्ताधाऱ्यांना रोजच्या रोज प्रायश्चित्त घ्यावें लागेल.

राम० : होय! बाईसाहेब, आपण म्हणतां तें खोटें नाहीं. सर्व श्रीमंतांनीं व सत्ताधाऱ्यांनी रोजच्या रोज प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. पापाप्रमाणें पुण्याचेंही रोपांना श्रीमंती व सत्ता हें चांगलें खत आहे, असें नारायणरावसाहेबांचा खून होण्यापूर्वी मला वाटत होतें; आणि म्हणूनच सत्ताधारी श्रीमंतांच्या आश्रयास राहून पुण्यवृक्ष वाढीस लावावा, म्हणून मीं न्यायाधिशाची नोकरी पत्करली; पण बाईसाहेब, मला आतां असें वाटते कीं, पुण्याचा फैलाव गरिबींत जितका निर्दोष व जोराचा असूं शकतो, तितका श्रीमंतींत असत नाहीं. पापाचा विषवृक्ष श्रीमंतींत निरंकुश फोफावत जातो. गरिबींत पाप कितीही मुरदाडपणानें जिवंत राहिलें तरी त्याला वर डोकें करतांच येत नाहीं. म्हणून बाईसाहेब, आपण म्हणतां तेंच खरें, गरिबांपेक्षा श्रीमंतांना रोजच्या प्रायश्चित्ताची जरुरी अधिक आहे.

दादा : शास्त्रीबोवा, आपण म्हणता, ती गोष्ट मला अक्षरशः कबूल आहे.

पेशव्यांची सत्ता मी आपल्या हातांत घेतली आणि ह्या सत्तेचा दुरुपयोग करण्याकडे मनाची प्रवृत्ती होऊं नये, म्हणून परमेश्वरास साक्षी ठेवून रोजचे रोज प्रायश्चित्त घेण्यास मला कांहींच कमीपणा वाटत नाहीं. पण नारायणाच्या खुनासंबंधानें प्रायश्चित—

आनंदी० : आम्ही कां म्हणून घ्यावें! आम्हीं खुनी आहों, असें जर प्रायश्चित्त घेऊन आम्हीं उगीचच्या उगीच कबूल केलें, तर आमचा विश्वास आमच्या मुत्सद्यांना, कारभाऱ्यांना, सरदारांना, जहागिरदारांना, सैनिकांना व लोकांना कसा पटेल?

राम० : आपला विश्वास सर्वांना पटावा, म्हणूनच मी आपणांस प्रायश्चित्त घेण्यास सांगत आहें. दादासाहेब, आपण जर खरोखर खुनी असतां तर पेशव्यांच्या गादीवर आपणांस बसतां आलें नसतें, आणि असल्या नराधमानें पेशव्यांची गादी विटाळली असतां एक क्षणभरही पुणें शहरांत वास करावेसें मला वाटलें नसतें.—बाईसाहेब, प्रत्यक्ष खून केल्याचा आरोप आपणावर नाहीं, तथापि, संशयाला जागा पुष्कळ आहे. हा संशय दूर करण्याकरितां, आणि असला संशय उत्पन्न होण्याइतकें तरी तुमचे वर्तन अस्पष्ट होतें ह्याबद्दल तुम्हांला खरोखर वाईट वाटत आहे, हें सर्वांच्या प्रत्ययाला आणण्याकरितां, दादासाहेब, आपण प्रायश्चित्त घेऊन मोकळें झालें पाहिजे.

आनंदी० : पण आमचा संशय तरी लोकांना कां यावा! आम्ही काय असें लोकांचें घोडें मारलें आहे?

राम० : बाईसाहेब, आपण लोकांचें घोडें मारून लोकांना पायीं चालावयास भाग पाडलें असतेंत, तरी पत्करलें असतें. पण दादासाहेब, तुमच्या फाजील महत्त्वाकांक्षेला लोकांचे हितकर्ते नेते बळी पडल्यामुळें तुम्हीं लोकांना पांगळें केलें आहे. दादासाहेब, आम्हीं तुमच्या नांवानें कां खडे फोडूं नयेत? ज्या दुहीनें पानिपतास अपयश येऊन दख्खनचे सर्व कर्ते पुरुष मारले गेले त्या दुहींपैकी एका पक्षाचे प्रवर्तक तुम्हीं आणि तुमचे बापू होता. पानिपतच्या अपयशानें तुम्हीं शुद्धीवर आलां नाहीं, आणि रावसाहेबांच्या कारकीर्दीचे प्रारंभीं रावसाहेबांचा अधिकार कबूल करण्यापेक्षां निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर याचे घरीं पाणी भरून, धोतरें बडवून शागीर्द होऊन रहाणें बरें असें तुम्हांस व बापूंना वाटलें! दादासाहेब, मीं तुम्हांला विचारतों, स्वतःच्या गुणांचें व लायकीचें चीज करून दाखविण्याकरितां हा उद्योग होता काय?

आनंदी : त्या माधवाला वडील कोण, कर्ते कोण, सेनानायक कोण, हेंच जेव्हां समजेनासें झालें, तेव्हां लहान तोंडीं मोठा घास घेऊं नये, हें माधवाला शिकवण्याकरितां इकडून निजामाचीं आर्जवें करणें झालें; आणि बापूंनीं विठ्ठल सुंदरची मनधरणी केली; ह्यांत काय वावगें झालें?

राम० : बाईसाईब, ह्याच कारणामुळें दादासाहेबांवर आज संशय येत आहे. स्वतःचा खाजगी नफातोटा संभाळण्याकरितां तुमच्या कुळाच्या, तुमच्या लोकांच्या, तुमच्या देशाच्या, तुमच्या राज्याच्या, तुमच्या धर्माच्या शत्रूंनाही मिळण्यास दादासाहेब कमी करणार नाहींत, असा दादासाहेबांचा दुर्लौकिक रावसाहेबांच्या कारकीर्दीत झाला; आणि ह्या दुर्लौकिकामुळेंच रावसाहेबांच्या पक्षास मिळून, आणि रावसाहेबांच्या वेळीं आणि काल रावसाहेब स्वर्गवासी झाल्यावरही तुम्हांस अटकेंत ठेवण्याची संमति देऊन, बापूंना आपली अब्रू संभाळावी लागली. दादासाहेब, हा तुमचा घरबुडवेपणाचा दुर्लौकिक आज पेशव्यांच्या खुनामुळें, नव्या पाण्याचे वेळीं बाहेर पडणाऱ्या कुत्र्याच्या विषाप्रमाणें, पुन्हा चोहोंकडे जोरानें पसरला आहे. आपण कदाचित खून करण्यास हुकूम दिला नसेल, ही गोष्ट मी कबूल करतों. पण तुमचा जर असा दुर्लौकिक नसता, तर नारायणरावांवर तरवार चुकून तरी चालविण्याची गारद्यांची काय छाती होती? पूर्वीच्या व आतांच्या ज्या कृत्यांमुळें तुमचा हा असा दुर्लौकिक झाला, तीं कृत्यें तुम्हांला, तुमच्या कुळाला, तुमच्या जातीला, तुमच्या लोकांना, तुमच्या देशाला व तुमच्या धर्माला नरकांत टाकणारीं आहेत. दादासाहेब, प्रायश्चित्त न घेण्याचा बाईसाहेबांचा हट्ट जर आपण ह्यावेळीं पुरविला तर दुष्कृत्याबद्दल दादासाहेबांना पेशव्यांचे खुनानंतरही पश्चात्ताप झालेला नाहीं, असें पाहून आपल्या हुकमतीखालीं प्रामाणिकपणानें व एकनिष्ठेनें पेशव्यांच्या गादीची सेवा करण्यास कोण तयार होईल?—मला जें वाटलें, तें मी आपल्या, माझ्या व सर्व लोकांच्या कल्याणाकरितां स्पष्टपणानें आपल्या कानांवर घातलें आहे.

दादा० : शास्त्रीबोवा, आपण म्हणतां, त्याप्रमाणें प्रायश्चित्त घ्यावें, असें मलाही वाटतें. एक दोन दिवसांत हिची समजूत घालून आपण सर्व ठरवाल त्याप्रमाणें प्रायश्चित्त घेऊन मोकळें होऊं.—चला, आपण आतां गणेश महालांत जाऊं, आणि बापू, नाना वगैरे मंडळी आली असतील, त्यांचा सल्ला घेऊन पुढील बेत ठरवूं. (दादासाहेब व रामशास्त्री जातात.)

आनंदी० : (स्वगत) भोळे, खरोखर भोळे!—दरडावून जोरानें कोणी बोललें म्हणजे ह्यांना त्याचें म्हणणें खरें वाटतें—ह्या भोळेपणानेंच ह्यांच्या नांवाचा असा दुलौकिक झाला आहे. आज माधवाच्या नादीं, तर उद्यां बापूंच्या चरणीं, काल माझ्या मुठींत, तर उद्यां रामशास्त्र्यांच्या तावडींत, अशी ह्यांची दुर्दशा रोज होत आहे. माझ्या सौंदर्याची छाप ह्यांच्यावर कशी बसवावी हें मला चांगलें कळू लागलें म्हणून पेशव्यांच्या पदाला हे येऊन पोहोंचले; नाहीं तर ह्यांची झळकणारी समशेर भस्माच्या किंवा तिळांच्या राशीत रामशास्त्र्यांसारख्या जडबुद्धींनी व बापूसारख्या अप्पलपोट्यांनी एव्हांना पुरून टाकिली असती!–दुलौकिकाला आळा घालण्याकरितां प्रायश्चित्त म्हणे! धर्मशास्त्रांत रामशास्त्र्यांची बुद्धी तीव्र असेल, पण माझ्या पायाशीं बसून कित्येक वर्षें ह्यांनीं राजकाजाचे पाठ घेतले पाहिजेत—एका खुनाचें पिशाच्च आणखी दहावीस खून करून गाडावें लागतें! राजकारण आणि धर्मशास्त्र हीं अगदी निराळीं आहेत. नारायणाचें पिशाच्च गाडण्याकरितां जर आम्हीं प्रायश्चित्त घेतलें आणि ह्या खुनाच्या कबुलीची बातमी जर सर्व देशभर पसरली, तर झोपड्यांतील, खेडयांतील, शहरांतील, सर्व जिवंत माणसें पिशाच्चें होतील; आणि खवळलेल्या लोकसमुदायाच्या समंधाला गाडतां येणें अशक्य होऊन देहांत प्रायश्चित्ताची पाळी आम्हांवर येईल—नाहींच, मी प्रायश्चित्त घेऊं द्यायची नाहींच!

(पडदा)

## प्रवेश दुसरा

[स्थळ : बाग—नाना आणि बापू प्रवेश करितात.]

नाना० : बापू, आपण पटवर्धनांना आश्वासन देऊन बारभाईत सामील करून घेतल्यापासून आतांपर्यंत सर्व कांहीं सुरळीत चाललें होतें, पण आतां—

बापू० : पण आतां काय नवीन झालें ?—फडक्यांच्या शपथा झाल्या, त्रिंबकराव मामांच्या शपथा झाल्या, पटवर्धनांबरोबर दक्षिणचे दिग्गज मुधोळचे मालोजीराव आम्हांस सामील झाले, प्रतिनिधींच्याकडे मी संधान लावलेंच आहे, भोसले आज जरी दादासाहेबांकडे आहेत तरी उद्यां आम्हांला येऊन मिळतील, शिंद्यांचे व तुमचे संधान आहेच, अशा स्थितीत बारभाईच्या कारभाराच्या आड कोण येणार आहे ?—मातोश्री गंगाबाईच्या प्रसूतीकाळापर्यंत आपण वाट पाहूं; पुत्ररत्न झालें तर उत्तमच झालें; चालू ओघ बदलण्याचें कारणच आम्हांला राहणार नाहीं. बरें, ओघ बदलावा अशीच आज्ञा मातोश्रीचे प्रसूतीकाळीं परमेश्वरानें केली, तरी ओघाच्या मुळाशीं साताऱ्यास जाऊन बारभाईच्या हातूनच नेहमी राज्याचा कारभार हांकला जावा, असा नवा कायदा, पेशव्यांच्या नाहीं तर छत्रपतींच्या शिक्कामोर्तबानें जाहीर करूं. बादशाही अंमल मावळण्याचे वेळीं छत्रपतींचा उदय झाला; छत्रपती निस्तेज झाल्यावर पेशवे चमकूं लागले; पेशव्यांनींच पेशव्यांना आज खाऊन टाकल्यामुळें एका घराण्यांत सत्ता न ठेवतां बारभाईचा कारभार सुरूं करण्याचे दिवस आतां आले आहेत—राजसत्तेची गादी एका घराण्याचे हातीं व कारभार सर्व लोकांच्या हातीं—बारभाईच्या हातीं—ह्या वळणावर आमच्या स्वराज्याचा ओघ आज आला आहे, असें मला वाटतें. काळाचा हा प्रचंड प्रवाह स्वाभाविक गतीनें चालला असतांना ह्याला अडथळा कोण करणार सांगा पाहूं ?

नाना० : मोठा अडथळा म्हणजे मुख्य माया आनंदीबाईसाहेब होय. रामशास्त्र्यांनीं उपस्थित केलेलें हें प्रायश्चित्ताचें वावटळ ह्या मायेनें जागचे जागीं जिरवून टाकलें.—कालपर्यंत प्रायश्चित्ताचा बोभाटा सर्व शहरभर होता; आणि मला वाटत होतें, दादासाहेबांनीं प्रायश्चित्त घेऊन एकदां आपला अपराध कबूल केला, म्हणजे मग पुढें आपल्या बारभाईच्या कारभाराला लोक तेव्हांच राजी होतील. जुन्या घरांत सुखानें नांदतां येणें शक्य नाहीं, अशी खात्री लोकांच्या मनाची झाल्याशिवाय नवें घर बांधण्यास ते कसे तयार होतील ?

बापू० : मला नाहीं वाटत प्रायश्चित्ताचें तुफान शांत झालें. सुमेरसिंग, खरकसिंग, तुळोजी पवार ह्यांनी जरी मारुतीच्या पायावर हात ठेवून निरपराधी असल्याबद्दल शपथा घेतल्या तरी दादासाहेबांनीं गारद्यांना

दिलेला लेखी हुकूम ह्या कज्जांत दाखल होऊन सर्वांची खात्री झाल्याशिवाय रामशास्त्र्यांचा लकडा दादासाहेबांच्या मागचा सुटेल, असें मनांत देखील आणूं नका. पहा; माझें भाकीत खरें होणार.

नाना० : खरें होवो, अशीच माझी परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे. बाकी चमकशास्त्र्यांच्या मारुतीच्या मंदिरांत रामशास्त्र्यांच्या पुढें शपथा व्हावयाच्या असून तेथें तुम्हीही हजर रहा, असा दरबारांत आपल्याला व मला जेव्हां काल हुकूम झाला, तेव्हांच माझ्या पोटांत चर्र झालें, कीं रामशास्त्र्यांच्या जाळ्यांतून आमचें सावज निसटून बाहेर पडणार. नमकशास्त्र्यांच्या बोलण्या-करूनही मला वाटतें, रामशास्त्री बरेच शांत झालेले असावेत !

(नमकशास्त्री प्रवेश करतो.)

बापू० : नमोनमः शास्त्रिणः ।

नमक० : ह्यः ! ह्यः ! मी कसला शास्त्री! उगीच आपला रामशास्त्र्यांकडे जात येत असतों झालें. आपणां सर्वांच्या मेहेरबानीनें काशिविश्वेश्वराच्या सन्निध दोन शब्द कानावरून गेले आहेत इतकेंच. हें प्रायश्चित्ताचें प्रकरण निघालें आणि ह्या मारुतीच्या मंदिरांत शपथा घेण्याचें ठरलें म्हणून आपणां-सारख्यांचे पाय तरी ह्या भूमीला लागले. रामशास्त्री येईतों ह्या शेजारच्या गरिबाच्या झोपडींत जरा विश्रांति घ्यावयाची होती; रामशास्त्री इतक्यांत येतील.

बापू० : येथेंच बागेंत थोडा वेळ उभे राहूं. रामशास्त्र्यांना बोलवायला कोणी गेले आहे ना ?

नमक० : चमकशास्त्री गेले आहेत—मीच जाणार होतों, पण सरदार सुमेरसिंग, खरकसिंग, कोतवाल, तुळोजी पवार वगैरे मंडळी आली. त्यांना मारुतीरायाचें दर्शन करविलें आणि घरांत नेऊन बसविलें–इतक्यांत बागेंत आपल्या स्वाऱ्या आल्या म्हणून समजलें. गरिबावर महत् उपकार आहेत.

नाना० : सुमेरसिंगाच्या शपथा झाल्या म्हणजे रामशास्त्र्यांची खात्री होईल ना ?

नमक० : खात्री म्हणजे काय विचारतां ? हें शपथांचें प्रकरण काल दिवसभर माजून राहिलें होतें—मोठा कडाक्याचा वाद झाला—बाईसाहेब होत्या, श्रीमंत होते, रामशास्त्री होते, आणि मी होतों—मोठा कडाक्याचा वाद झाला.—त्रिभुवन हालून गेलें असेल त्या वादाचे वेळीं—त्या वेळीं मी साफ जोरानें कडाडून बोललों—माझी निःस्पृह वाणी ऐकून रामशास्त्र्यांनींही तोंडांत

बोटें घातलीं—मोठा कडाक्याचा वाद झाला. बाईसाहेब म्हणाल्या, असा कडकडीत ब्राह्मण पाहिला नव्हता.—मोठा कडाक्याचा वाद झाला.—मीं दादासाहेबांच्या तोंडावर साफ सांगितलें, श्रीमंतबीमंत आम्ही नाहीं मोजीत.—आम्ही कायदा जाणतों, अधिकारी नाहीं जाणीत—मोठा कडाक्याचा वाद झाला.—मी श्रीमंतांच्यापुढें साफ बोललोंच, शास्त्रांतलें कांहीं वचन असेल तर काढा.

बापू० : पण वादाचा प्रश्न कोणता होता ?

नमक० : गारद्यांना श्रीमंतानीं दिलेला लेखी हुकूम तरी दाखवावा, नाहीं तर प्रायश्चित्त तरी घ्यावें, असा हट्ट रामशास्त्री घेऊन बसले. मोठा कडाक्याचा वाद झाला—बाईसाहेब म्हणाल्या, लेखी हुकुमाचा चोहोंकडे तलास केला पण कोठें सांपडत नाहीं; मी म्हणालों, चमकशास्त्र्यांच्या जागत्या मारुतीपुढें सुमेरसिंगासारख्या सरदारांनीं हुकुमांत 'धरावे' असें होतें, 'मारावें' असें नव्हतें, अशा शपथा कराव्यात—मोठा कडाक्याचा वाद झाला—शेवटीं श्रीमंत म्हणाले, मीं माझ्या हातानें 'धरावें' असेंच लिहिलें. तेव्हां धरतांना नारायणराव चुकून मारले गेले म्हणून शांत पाहिजे तर करीन. रामशास्त्र्यांना हें मान्य झालें. आणि मोठा कडाक्याचा वाद होऊन अखेरीस बाईसाहेबांनीं हुकूम सोडला. शपथा झाल्यावर सुवर्णतुळा करून प्रत्येक वैदिकाचे, प्रत्येक शास्त्र्याचे, प्रत्येक ब्राम्हणाचे तोंडांत एक एक मासा घालून सर्वांचीं तोंडे बंद करावींत—मला आला राग; प्रायश्चित्ताची सर्व इमारत ढांसळून पडूं लागली; मीं चापून सांगितलें, एक एक माशाला धर्मशास्त्रांत आधार नाहीं; माझा घसा फार मोठा आहे. बारंबारे एकशें चवेचाळीस माशांच्या मलिद्याशिवाय हा घसा बंद होणार नाहीं; आणि हा कडाक्याचा वाद असाच पुढें चालेल. तुम्हीं पाहिजे तर प्रायश्चित्त घ्या किंवा नका घेऊं; शेवटचें उत्तर सांगितलें, कटकट नको.

नाना० : असें स्पष्ट बोलल्याशिवाय गोरगरिबांचें कसें चालणार ? सुमेरसिंग, खरकसिंग, तुळोजी शपथा घेणार आहेत ना ?

नमक० : सुमेरसिंग फारच सज्जन; खरकसिंग फारच चांगला माणूस; तुळोजी पवार लाख माणूस लाख.—पहावयाला मिळावयाचीं नाहींत अशीं माणसें—कां नाहीं शपथा घेणार ? फारच सज्जन—योग्य, योग्य—आता मारुती-रायाचे दर्शनाला गेले होते—योग्य—फारच योग्य—मीं सांगितलें, खोऱ्याला

थप्पड देण्याला मारुतीरायानें हात उगारला आहे.—जागतें दैवत—पायावर एक पुतळी ठेवल्याशिवाय चेहऱ्याकडे पाहवणार नाहीं. सज्जन—प्रत्येकानें दोन पायांवर दोन पुतळ्या ठेवल्या—फारच उत्तम गृहस्थ—योग्य—सज्जन—शिवाय चमत्कार असा झाला—चमकशास्त्री मारुतीच्यापुढें तुळोजीच्या ताईतावर रुद्राभिषेक करीत असतात, आज उद्यां ताईत मंत्रसिद्ध होईल,—त्या अभिषेकाचे दर्शनाला जेव्हां तिघेजण आले, तेव्हां चमत्कार असा झाला—फारच सज्जन—योग्य, चमत्कार असा झाला, प्रत्येकानें पांच पांच मोहरा—मोहरा—पांच पांच मोहरा—अभिषेकापुढें ठेवल्या! (चमकशास्त्री येतो.) अं! रामशास्त्री आले वाटतें?

चमक० : मला म्हणाले तुम्ही पुढें व्हा मी आलोंच—रामशास्त्री येईतों, गरिबाचे घरांत पायधूळ झाडावयाची होती.

बापू : चला, थोडा वेळ यांच्या घरांत बसूं—हुकमांत काय मजकूर होता, ह्यासंबंधानें सुमेरसिंगाचें म्हणणें तरी ऐकून घेऊं.

[जातात.]

## प्रवेश तिसरा

[स्थळ : मारुतीचें देवालय. मध्ये चौरंगावर अभिषेकाचा देखावा. भिकंभट प्रवेश करतो. दर्शन करून प्रदक्षिणा घालून पायावर डोके ठेवून उठल्यावर दचकून मारुतीकडे पहातो व मारुतीच्या पायावरील पुतळ्यांकडे पहातो.]

भिकं० : ह्या पुतळ्या मारुतीच्या पायावर कोणी ठेवल्या? नमकशास्त्र्यांकडे आलेल्या सरदारांनीं तर ह्या ठेवलेल्या नव्हेत ना? कोणी का ठेवलेल्या असेनात! आपण पुजारी आहों, तेव्हां ह्या पुतळ्या आतां माझ्या झाल्या. —विचार करतां कामा नाहीं. चटदिशीं उचलून कडोसीस लावाव्या. हा भिकंभट आज एकदम श्रीमंत होणार.

(पुतळ्या उचलूं लागतो. एका बाजूनें म्हाळसा व एका बाजूनें दुर्गा अशा येतात

दु० व म्हा० : (दोघी मिळून) खबरदार, त्या पुतळ्या उचलशील तर. (भिकंभट पुतळ्या न उचलतां मागें सरतो.)

दुर्गा० : भिकंभट, अरे तूं भिकारी आणि चोरी कशाला करीत होतास ?

म्हाळ० : तरी मी म्हणत होतें, हा भिकंभट पुजारी नको—मेला साता जन्माचा भिकारी ! एवढें एक बरें आहे, मारुतीराय म्हणजे अंगाखांद्यावर कांहीं न घालणारा वनवासी ब्रह्मचारी आहे. हें मारुतीचें देऊळ नसतें आणि एखाद्या देवीचें देऊळ असतें तर ह्यानें तिचे दागिने केव्हांच चोरले असते ! कसा चोरासारखा उभा आहे पहा !

दुर्गा० : बाई, हा सात जन्मांचा कंगाल भिकंभट मोठा लोभी आहे. मेल्याची नजर पहा, त्या पुतळ्यांवर नाहीं तर अभिषेकाच्या मोहरांवर !—दरिद्री आणि लोभी, मग कोणचें पातक हा भिकंभट नाहीं करणार ?—बोल, त्या पुतळ्या कां उचलीत होतास ? बोल.

भिकं० : कां म्हणजे ? मी मारुतीचा पुजारी आहें; आणि देवापुढें ठेवलेला पैसा पुजाऱ्याचा.

म्हाळ० : पैसा पुजाऱ्याचा, पण पुतळ्या नव्हेत पुजाऱ्याच्या.

भिकं० : मला शास्त्रीबोवांनीं सांगितलें आहे. मारुतीपुढचा पैसा तुझा. दोघांनींही त्रिवार सांगितलें आहे, पैसा तुझा, तुझा, तुझा.

दुर्गा० : दरिद्र्यांना अक्कलही नसते, म्हणून म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. मारुतीपुढचें गुरवानें काय घ्यावयाचें, पुजाऱ्यानें काय घ्यावयाचें व मालकांनीं काय घ्यावयाचें, कितीदां तरी हा तंटा झाला आहे, आणि निकालही लागला आहे.—ह्या दरिद्र्याची आठवण कोठें घड आहे !

म्हाळ० : मी पुन्हां आज सांगतें. मारुतीपुढें मूठभर तांदूळ कोणी ठेवले, दहापांच कवड्या टाकल्या, तर तें सर्व गुरवाचें. पैसा सुपारी जर ठेवली तर पैसा पुजाऱ्याचा, सुपारी गुरवाची. नारळ पैसा ठेवला तर, अर्धे भकल गुरवाचें, अर्धें पुजाऱ्याचें, पैसा मालकाचा, आणि नारळांतलें पाणी मारुतीचें !

भिकं : असें नाहीं, हें साफ खोटें आहे—आम्ही गरीब झालों तरी दिडकी-साठीं श्रीमंतासारखे खोटें नाहीं बोलणार. असें ठरलें आहे, पैसा केव्हांही पुजाऱ्याचा, मग बरोबर नारळ असो वा सुपारी असो; ह्या वांटणीसाठीं तर माझी आणि गुरवाची तीनदां मारामारी झाली, आणि मारुतीच्या पायावर गुरवानें मला आदळल्यामुळें माझ्या कपाळावर तीन टेंगळें आलीं, आणि

गुरवाला मीं गदेवर घातल्यामुळें तो जन्माचा लंगडा झाला. मारुतीपुढचा पैसा माझा आणि रुपया असला तर तो मात्र मालकांचा.

म्हाळ० : मग काय पुतळ्या रुपयांपेक्षां कमी होय ?

भिकं० : पुतळयांचा हा वाद नवीन आहे. पुतळ्या ठेवणारा कोण आला दर्शनाला आजपर्यंत ? पैसा माझा, रुपया शास्त्रीबोवांचा हें ठरलें आहे, पण पुतळी कोणाची हें कोठें ठरलें आहे ? पैशासाठीं तीन टेंगळें, तर पुतळीसाठी तीनशे टेंगळें येतील आणि मग वादाचा निकाल लागेल.

दुर्गा० : मी करतें या वादाचा निकाल. पैसा पुजाऱ्याचा, रुपया मालकाचा आणि पुतळी मालकिणीची—हा बरोबर निकाल आहे—पुतळ्या बायकांच्या आहेत, आणि बाई, ह्या पुतळ्या तुम्ही आणि मी मिळून घेऊं या.—मी घेतें त्या सर्व पुतळ्या—

(दुर्गा पुतळ्या उचलते.)

म्हाळ० : पुतळ्या जशा बायकांच्या, तशा मोहराही बायकांच्या.—दुर्गाबाई, तुम्ही पुतळ्या उचला, अभिषेकापुढील मोहरा मी उचलतें. (मोहरा उचलते.)

भिकं० : मी अस्सा जाऊन शास्त्रीबोवांना सांगतों. तुमच्या बायका चोर आहेत म्हणून—दरिद्री चोर पत्करला; पण ह्या श्रीमंतांच्या बायकांचा लोभ फार कठीण. खून करतील ह्या बायका खून. (जातो.)

दुर्गा० : सहा पुतळ्या आहेत. हे सरदार मोठे सज्जन आहेत हो. प्रत्येकाने एकेका पायावर एकेक पुतळी ठेवली !

म्हाळ० : ह्या बारा मोहरा आहेत !—तुळोजीराव कोतवाल मोठे सज्जन आहेत हो.—अभिषेकाच्या रोजच्या दक्षिणेशिवाय आज सहज दर्शनाला आले तर बारा मोहरा ठेवल्या. देवा, तुळोजीरावांना लवकर सरदार कर.

दुर्गा० : बाई, ह्या पुतळ्या आणि मोहरा तुमच्या आणि माझ्या झाल्या. ह्या सहा पुतळयांपैकी तीन पुतळ्या तुम्ही घ्या आणि त्या बारा मोहरांपैकी सहा मोहरा मला द्या—दोघांचीही वाटणी बरोबर नको का व्हावयाला ?

म्हाळ० : ह्या मोहरांत कसली हो बाई तुमची वांटणी ! पुतळ्या निम्म्या तुमच्या व निम्म्या माझ्या, हा हिशेब बरोबर आहे. कारण मारुतीरायांचे देऊळ दोघांचें आहे. पण ह्या अभिषेकाच्या मोहरांत कसली वांटणी !—अभिषेक आमच्या घरांतून होतो—

दुर्गा० : पण खटपट करायची होते आमच्या घरांतून. खटपटीची दक्षणा अर्धी, विद्येची दक्षणा अर्धी. बाई, बऱ्या बोलानें माझी सहा मोहरांची वांटणी तुम्ही मला दिली पाहिजे. नाहीं तर—

म्हाळ० : नाहीं तर ! नाहीं तर काय !

दुर्गा० : नाहीं तर काय ? माझ्या सहा मोहरा मी तुम्हांला एक क्षणभर पचूं द्यावयाची नाहीं,—मी कोंकणांतील आहे बरें; भाऊबंदकी म्हणजे आम्हां कोंकणस्थांच्या हातचा मळ !—मोहरांची गोष्ट तर बाजूलाच राहूं द्या, एक फुटकी कवडी जर तुमच्या वांटणीला अधिक गेली, तर प्रत्येक कवडीगणिक पसाभर डोळ्यांतून टिपें काढावीं लागतील, हें पक्कें ध्यानांत ठेवा.

म्हाळ० : दुर्गाबाई, कोंकणस्थांची तोंडाची वटवट मला चांगली ठाऊक आहे. —देशस्थ असल्या धमकावणीला भीक घालीत नसतात म्हटलें—मी देशस्थांची आहें. तुमच्यासारखी कांहीं चुरुचुरु बोलायची नाहीं.—तुम्ही कोंकणस्थ वांटणी कबूल करून नंतर बुडवितां, आम्ही देशस्थ प्रथम दुसऱ्याची वांटणी कबूल करीत नाहीं—ह्या बारा मोहरांतील एक फुटकी कवडीही तुम्हांला मिळावयाची नाहीं, आणि तुम्ही कितीही वेडेवांकडे बोललां तरी माझ्या डोळ्यांतून अश्रूचें एक टीपही निवणार नाहीं !

दुर्गा० : बाई, तुम्ही अजून मला पुरती ओळखली नाहीं, म्हणून अशी ऐट मिरवतां. माझी पणजी वेगळी सरली, तेव्हा तिनें वरवंटा उभा फोडून घेतला; माझी आजी जेव्हां वेगळी सरली, तेव्हा फुंकणीचें जळकें तोंड दोघांच्याही वांटणीला सारखें यावें म्हणून फुंकणी चिरली; आणि माझी आई वेगळी सरली, तेव्हां तिनें केरसुणीचे हीर कसे वांटावयाचे ह्याबद्दल वाद माजविला. शेवटीं माझ्या आईबापांनीं पुण्यास पेशव्यांपुढें चार खेपा व नंतर साताऱ्यास महाराजांपुढें पांच खेपा घालून फिर्यादी मांडल्या. पेशव्यांनी व महाराजांनीं उपदेश केला, एवढ्या खटपटीनें नवीन राज्य तुम्हीं मिळविलें असतें ! बाबांनीं सांगितलें, आम्हांस राज्य नको–वांटणी पाहिजे. हीरास हीर अशी वांटणी नको; अधिक लांबीचा व अधिक जाडीचा एकही हीर काकांना मिळतां कामा नये. आई म्हणाली, केरसुणीचा प्रत्येक हीर उभा चिरून मिळाला पाहिजे. मरेतों दोघांनीं हा वाद घातला, आणि शेवटी मरतांना भाऊबंद कसे फसवितात हें सर्व मला सांगून वांटणीच्या वेळीं कशी दक्षता ठेवली पाहिजे, हें त्यांनीं मला शिकविलें. म्हटलें म्हाळसाबाई, असल्या पणजीच्या, असल्या आजीच्या

असल्या आईच्या कुळांतली मी मुलगी आहे. मुकाट्यानें माझी वांटणी मला द्या.

म्हाळ० : माझेही आईबाप कांहीं कमी नव्हते—आम्हीं मूळचीं खानदेशचीं. आणि आजोबांना खानानें हद्दपार केलें असतांना माझ्या बाबांचें लहानपणीं लग्न झालें. बाबांना भाऊ त्या वेळीं नव्हता व आजोबा हद्दपार झाल्यानें पुढेंही होणार नाहीं, असें पाहून माझ्या आजोळच्यांनीं मुद्दाम म्हणून आईला असल्या घरीं दिली. मुलीचे सासू-सासरा जिवंत आणि नवऱ्या-मुलाला भाऊ नाहींत व पुढेंही होणार नाहींत, असें स्थळ कोठून मिळणार ? असें चांगलें स्थळ मिळालें खरें, पण आजोबा चोरून वेष पालटून शहरांत राहूं लागले. आईनें लगेच बाबांना सांगितलें, पुढें कदाचित भाऊबंदकीचा प्रसंग येईल; आणि बाबांनी ताबडतोब खानाला वर्दी दिली, आजोबा घरीं आले आहेत म्हणून. पुढें खानानें आजोबांना जन्मभर कैदेंत कोंडून ठेवलें. भाऊ मुळींच नकोत, म्हणून बापाला कैदखाना दाखविणाऱ्या देशस्थ आई-बापांची मी मुलगी आहें म्हटलें, बरें का दुर्गाबाई! ह्या बारा मोहरांपैकीं एका मोहरेचीही आशा करूं नका.

दुर्गा० : कशा मोहरा देत नाहीं तें पहातें ना मी!—नाहीं देत माझी वांटणी, नाहीं देत माझी वांटणी—नाहीं देत माझी वांटणी?—हा ताईतच मी माझ्या ताब्यांत घेतें. (ताईत उचलून घेऊन त्याच्या गोफाचें टोंक हातांत घेऊन म्हाळसेपुढें ताईत नाचवून) तुमच्या हातांत मोहरा, माझ्या हातांत ताईत—तुळोजीराव आले म्हणजे साफ सांगतें, माझ्या दक्षणेची व मोहरांची वांटणी टाका; मग ताईत मिळेल—आतां पायां पडत वांटणी द्यावी लागेल बरें म्हाळसाबाई.

म्हाळ० : (ताइताच्या गोफाचें दुसरें टोंक धरून ओढीत) मिळाली वांटणी बरें, मिळाली वांटणी!

दुर्गा० : (दुसऱ्या टोंकाला ओढीत व ताइताबरोबर म्हाळसेला दोन चार पावलें खेंचीत) कशी नाहीं वांटणी मिळत पहातें—वांटणीच्या वेळीं माझी आई झिंज्या धरून भांडली होती हो—कशी नाही वांटणी मिळत पहातें.

म्हाळ० : (उलट दोन चार पावलें खेंचीत) मिळाली वांटणी बरें—मिळाली वांटणी. बुचडा दुसरीच्या हातांत गेला, पण माझ्या आईनें भांडण मिटविलें नाहीं.—मिळाली वांटणी बरें—मिळाली वांटणी!

दुर्गा० : (दोन चार पावलें खेंचीत) ताईत मोडेल, यंत्र फुटेल, मंत्राचा कागद बाहेर येईल.

म्हाळ० : (हिसका देऊन) ताईत मोडूं दे, यंत्र फुटूं दे, मंत्राचा कागद बाहेर पडूं दे.

('यंत्र-तंत्र-मंत्र-ताईताचे दोन तुकडे झाले' असें एकदम ओरडून ताईताला हिसका देतात; ताईताचीं टोपणें एकांतून एक निघतात; दोघी दोन बाजूला कोलमडून पडतात; आणि मध्यें एक कागद मोडलेल्या ताइतांतून वाहेर पडतो. 'ताईताशीं झोंबाझोंबी' 'मंतरलेला ताईत-ताईत फुटला' असें चमकशास्त्री, नमकशास्त्री पडद्यांत बोलतात. 'बलभीमाच्या मंत्राचे कागदास शिवूं नका, प्राणास मुकाल, बलभीमाचा मंत्राचा कागद हातांत घेऊं नका, प्राणास मुकाल' असें पडद्यांत तुळोजी ओरडतो. नाना, बापू व रामशास्त्री प्रथम घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतात व रामशास्त्री कागद उचलून हातांत घेतो. चमकशास्त्री नमकशास्त्री प्रवेश करितात व प्रवेश केल्याबरोबर पूर्वोक्त बोलतात. म्हाळसा, दुर्गा उठून दोहों बाजूला उभ्या रहातात. सुमेरसिंग, खरकसिंग व तुळोजी प्रवेश करितात.)

तुळो० : बलभीमाच्या मंत्राचा कागद—हातांत घेतला—हातांत घेतला—हातांत घेतला—(रामशास्त्री वाचूं लागतो.) वाचूं—वाचूं—नका—नका—वाचूं वाचूं नका—नका—माझा मंत्र—माझा मंत्र—मंत्र—मंत्र—वाचला—वाचला—वाच-च-ला-ला—

(तुळोजी भोवळ येऊन पडतो. सुमेरसिंह खरकसिंग सावरून धरतात.)

चमक० व नमक० : अरे, घेरी आली—पाणी आणा—पाणी आणा—(दुर्गा म्हाळसा जातात व भिकंभट येतो).

भिकं० : हें बलभीमाचें तीर्थ आहे—अभिषेकाचें तीर्थ आहे. (तीर्थ शिंपडतात).—हां—सावध होऊं लागले—शास्त्रीबोवांना मी किती वेळां सांगितलें, देवळांत बायकांचा कारभार नको. सगळा भ्रष्टाचार होतो, आणि मग असे अनर्थ ओढवतात—बायकांना देवळांत पाऊल टाकूं देतां कामा नये.

चमक० : सावध झाले—हरकत नाहीं—मंत्राचा कागद भलत्याच्या हातांत पडला नाहीं;—आपण काळजी करूं नये.

तुळो० : मंत्राचा कागद माझा मला परत मिळाला तरच—तरच—नाहीं तर जीव कासावीस होतो.

राम० : मी हा मंत्राचा कागद वाचला आहे. त्यांत मंत्र-यंत्र-तंत्र—

तुळो० : प्राण कासावीस होतो—कागद माझा मला परत द्या.

राम० : आपला प्राण कासावीस व्हायला नको. हा परत घ्या. (चमकशास्त्री कागद तुळोजीच्या हातांत देतो.) तो कागद फार महत्त्वाचा आहे. दोघींच्या भांडणामुळें—बलभीमाचे इच्छेनें तो कागद मला पहावयास मिळाला. तो कागद वाचल्यानंतर सुमेरसिंग, खरकसिंग किंवा पवार ह्यांच्या बलभीमासमोर शपथा होण्याचें कांहीं कारण नाहीं. तो कागद म्हणजे गारद्यांना दादासाहेबांनीं दिलेला हुकूम आहेः आणि त्या कागदांत "धरावें" अशी अक्षरें नसून 'मारावें' अशी अक्षरें स्पष्ट आहेत.

तुळो० : गारद्यांना दिलेला हा हुकूम नाहीं. एका सिद्धानें मला दिलेल्या यंत्राचा व मंत्राचा हा कागद आहे.—हा कागद कधींही मी वाचलेला नाहीं; आणि माझ्या गुरूशिवाय जो कोण वाचील, तो तत्काळ स्थानभ्रष्ट होईल असा माझ्या गुरूचा शाप आहे. शिवाय त्या सिद्धाची मला अशी आज्ञा, आहे कीं, भलत्यानें वाचल्यामुळे हा कागद भ्रष्ट होण्याबरोबर फाडूनच टाकला पाहिजे.

(फाडून चोळामोळा करतो.)

राम० : हां—हां—तो पुराव्याचा कागद नाहीसा करा, खुशाल त्याचा चोळामोळा करा. मी तो कागद वाचलेला आहे, आणि त्या कागदांत काय मजकूर होता, तो मी दादासाहेबांच्या तोंडावर सांगण्यास कमी करणार नाहीं.

सुमेर० : गारद्यांना दिलेला हुकूम पवाराच्या हातांत जाईल कसा ? मी खात्रीनें सांगतों, ह्या कागदांत बलभीमाचा मंत्र होता.

नमक० : बलभीमाच्या मंत्राचा ताईत अभिषेकाकरितां मजपाशी कोतवालांनीं दिला होता—असल्या ताइतांतून जर हुकूम बाहेर पडला असेल, तर भुताटकीनेंच पडला असला पाहिजे—मुख्य न्यायाधीशांनीं असल्या भुताटकीवर विश्वास ठेवतां कामा नये.

खरक० : गारद्यांना देण्यांत आलेला हुकूम गारद्यांनींच नाहींसा केलेला आहे. भुताटकीमुळेंच ताईतांत त्याचा भास झाला असला पाहिजे. कोतवालसाहेब, बलभीमाच्या पायावर हात मारून सांगा, फाडलेला कागद हुकूम नव्हता.

चमक० : बलभीमाच्या पायांवर ते फाडलेले तुकडे ठेवा, आणि हा हुकूम नव्हे अशी शपथ वहा ! आपोआप भुताटकी बंद पडेल—जागतें दैवत आहे—

ठेवा मारुतीच्या पायावर हात.

तुळो० : मारुतीच्या पायांवर हात ठेवण्यास मी तयार आहें. (मारुतीजवळ जातो.) मारुतीराया, श्रीमंत नारायणराव पेशवे—(मारुतीच्या जागीं नारायणरावाचें भूत त्याला दिसतें. दचकून मागें सरून भुताकडे पहात उभा राहतो.)

चमक० : ठेवा मारुतीच्या पायांवर हात ठेवा.

तुळो : हुकूम—हुकूम—हा समंध असा—रोज रात्रीं माझ्या उरावर—तूं भूत ऐस—समंध ऐस—किंवा पुन्हा जरी जिवंत पेशवा होऊन आलास—हा समंध असा रोज रात्रीं माझ्या उरावर बसून ताईतांतील हुकूम—

चमक० : पहा भुताटकी आहे.—भिकंभट, रुद्राच्या आवर्तनाचें तीर्थ शिंपा. (भिकंभट तीर्थ शिंपतो;) आतां भीति नाहीं. ठेवा मारुतिरायांच्या पायांवर हात.

तुळो० : नाहीं, तुम्ही अभिषेक बरोबर केला नाहीं, गारद्यांना चकवून मीं हुकुमाचा कागद माझ्या ताब्यांत घेतला; आणि ताईतांत घालून दंडांत—असा हा रोज माझ्या उरावर बसतो—नाहीं, तुम्हीं अभिषेक बरोबर केला नाहीं. (दुसरीकडे वळून डोळ्यांवर हात ठेवतो; भूत जाऊन मारुती दिसूं लागतो.)

सुमेर० : असें काय भित्र्यासारखें करतां! हा मारुती आहे. भूत, समंध कोठून येईल ?

खरक : सुमेरसिंगजी, तुम्ही त्यांचा एक हात धरा व मी एक हात धरतों. (तसें करतात.) ह्याचें मस्तक मारुतीरायाच्या पायांवर ठेवलेंच पाहिजे.—पहा, नीट पहा—आहे मारुती ?

तुळो० : तुम्हीं नको मदतीला—मी भिणारा नव्हें. ह्या मारुतीरायाच्या पायांवर अलबत मस्तक ठेवीन. तुम्ही व्हा दूर, मी एकटा पुढें जातों. (सुमेरसिंग, खरकसिंग दूर होतात. तुळोजी जवळ जातो. पुन्हां नारायणराव दिसतो व मागें सरतो.) नाहीं; मी ह्याच्या पायांवर नाहीं डोकें ठेवणार.—मीं ज्याचे पाय ओढले, ज्याला मी फरफटत ओढले असतांना तुम्हीं—सुमेरसिंग, खरकसिंग,—तुम्हीं आपल्या तलवारी चालविल्या—त्याच्या पायावर—मी कसा हात—

राम० : बलभीमाच्या पायांवर हात ठेवून शपथ घेण्याचा हा समारंभ

पुरे. माझ्या डोळ्यांनीं तो फाडलेला हुकूम आतां वाचलेला आहे; माझ्या कानांनीं हीं आतांचीं भाषणें ऐकिलीं आहेत; बापू, नाना, ह्यांच्यासारखे मुत्सद्दी ह्या शपथेच्या समारंभाचे साक्षी आहेत.—ह्यापुढें मला कोणचाही कागदपत्र वाचण्याची जरुरी नाहीं; कोणचाही पुरावा ऐकण्याची जरुरी नाहीं; व कोणचाही साक्षी बोलावण्याची जरुरी नाहीं. हा शपथेचा समारंभ पुरे करा. वाड्यांत जाऊन ह्या प्रकरणाचा निर्णय दादासाहेबांच्या तोंडावर केव्हां सांगेन असें मला झालें आहे—मी हा वाड्याकडे चाललों. चमकशास्त्री, नमकशास्त्री, सर्वांना घेऊन आपणही लवकर वाड्यांत हजर व्हा.

(पडदा)

तिसरा अंक समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
ग्रा. क्र. २२६८ प्रा. दि.
वि. १-१-२-८५ क्र.

## अंक चवथा
### प्रवेश पहिला

[स्थळ : शनिवारवाडा. दोन दासी प्रवेश करितात.]

प० दासी : काय ग बाई रोज नवी नवीच पीडा उत्पन्न होत आहे. म्हटलें, आनंदीबाईसाहेब पेशवाईच्या मालकीण झाल्या; तेव्हां माझ्या भावाला गांवाहून बोलवावें आणि बाईसाहेबांना विनंती करून हुजूरपथकांत असामी देववावी; इतक्यांत हें नवीनच विघ्न उत्पन्न झालें !

दु० दासी : मी नाहीं का थोड्या दिवसांपूर्वी माझ्या भावाची नेमणूक करून घेतली; तूं त्यावेळीं माझ्यासारखी कां लगट केली नाहींस ?

प० दासी : मी त्यावेळीं विनंती केली; पण बाईसाहेब म्हणाल्या, इतक्यांत घाई करूं नको. माझ्या नांवाचें नवीन 'आनंदी' पथक तयार व्हावयाचें आहे, त्या पथकांत तुझ्या भावाला असामी देईन.

दु० दासी : मग काय आतां 'आनंदी' पथक उभारण्याचा बेत रहीत झाला काय ?

प० दासी : अग, हें नवें विघ्न आलें, त्यामुळें पूर्वीचे बेत सगळेच ढासळले.

दु० दासी : हें कोणचें नवें विघ्न ?

प० दासी : अग, तुला ठाऊक नाहीं काय ? गांवांतल्या सर्व पंडितांनीं व शास्त्र्यांनीं दरबारला यावयाचें टाळलें आहे, आणि मोठमोठ्या ब्राह्मणांनीं तर सरकारी महारुद्र करण्याचेंही बंद केलें आहे. रामशास्त्रीदेखील न्यायाधीशाची नोकरी सोडून कोठें तरी क्षेत्राचे ठिकाणीं स्नानसंध्या करीत स्वस्थ बसणार आहेत म्हणे.

दु० दासी : बरें मग, रामशास्त्री निघून गेले तर न्यायाधीशाची जागा

बाईसाहेबांकडून तुझ्या भावासाठीं माग म्हणजे झालें.

प० दासी : हें ग काय, भलतीच थट्टा!

दु० दासी : अग, लष्करांतील असामीपेक्षां शास्त्र्यांची असामी बरी. शालजोड्या पांघरून लोडाला टेकून बसायचें, तोंड थोडेसें वाजवावयाचें आणि ह्याचें घर काढून त्याला द्यावयाचें, किंवा त्याचें शेत काढून ह्याला द्यावयाचें, इतकेंच काय तें काम! मला जर देव पावला तर मी वर मागून घेईन कीं, पुढील जन्मीं माझे सगळे मुलगे कज्जेदलाल शास्त्री कर. भांडून भांडून जीभ चांगली खंबीर होते, आणि दोन पक्षकारांच्या भांडणांत ह्या कज्जेदलालांच्या खंबीर जिभेला यथेच्छ खायला सांपडतें. जीभ जोरकस करणारा धंदा आणि खायला फुकटचें, आणखी भाग्य तें कोणचें?

प० दासी : इडापिडा टळो, आणि ह्या कज्जेदलालांची सांवलीही माझ्या घरावर न पडो. हे कज्जेदलाल कोणाच्या घरांत शिरले आणि त्या घराची राखरांगोळी झाली नाहीं, असें एक तरी उदाहरण आहे काय? मी जर कोणाला शाप द्यायला लागलें, तर असा शाप देईन कीं तुझ्या भाऊबंदकींत एखादा कज्जेदलाल पडो. भाऊबंदकींत कज्जेदलाल पडला म्हणजे सगळ्या कुळाचें व भाऊबंदांचें निःसंतान व्हायला कितीसा वेळ लागणार! बाईसाहेब म्हणत होत्या, पेशवाईच्या भांडणांत सरदार व मुत्सद्दी आजपर्यंत पडत होते. इतके दिवस ठीक चाललें. पण आतां ह्या कज्जेदलालांनीं आपलें सोवळेंओवळें मध्येंच टाकल्यापासून सर्वांचें नुकसान व्हावयाची वेळ आली आहे. तेव्हां ह्या कज्जेदलालांना टाळण्याकरितां निजामवरच्या स्वारीचा बहाणा करून श्रीमंत लवकरच पुणें सोडून बाहेर पडणार आहेत म्हणे.

दु० दासी : मग स्वारींत असतांना एखाद्या पथकांत तुझ्या भावाला असामी मिळाली तर त्यांत काय वाईट झालें?

प० दासी : बाईसाहेबांना स्वारींत बरोबर नेण्यांत आल्यावरच्या ह्या गोष्टी. 'स्त्रैण' म्हणून श्रीमंतांना जो तो नांवें ठेवितों, म्हणून कदाचित बाई-साहेबांना ह्या स्वारींत नेणार नाहींत.

दु० दासी : बाईसाहेबांना येथे ठेवून श्रीमंत बाहेर जाणार! असें कधीं व्हायचें नाहीं.

प० दासी : बाईसाहेब स्वारींत श्रीमंतांच्या बरोबर जाणार कीं नाहीं, तें आतां ठरवावयाचें आहे. श्रीमंत ह्या महालांत आले म्हणजे मला ताबडतोब वर्दी

दे, असें बाईसाहेबांनीं सांगितलें आहे.

दु० दासी : अग ते पहा, श्रीमंत इकडेच येत आहेत. चल, आपण बाई-साहेबांना वर्दी देऊं.

(जातात. दादासाहेब येतात.)

दादा० : (स्वगत) कोणी कांहींही म्हणोत; मला तर आनंदीसारख्या सुंदर तरुणीचा सहवास म्हणजे इहलोकींचा प्रत्यक्ष स्वर्गच वाटतो. काल ते ब्राह्मण काय कुजबुजले, 'हा स्त्रैण राघोबा पाहिजे तें पातक करील'—त्या गरीब ब्राह्मणांनीं आनंदीचें सौंदर्य कधीं पाहिलेलें दिसत नाहीं. एरवीं 'स्त्रैण' व 'बाईलवेडा' अशीं दूषणें त्यांनीं मला दिलीं नसतीं. स्वतःच्या शहाणपणाचा टेंभा मिरवून कोणच्या सुखाची जोड हे करणार? तपश्चर्येंत हाडांचीं काडें करून तरी हे काय मिळविणार? घरदार सोडून विरक्त होऊन तरी कोणचा पुरुषार्थ साधणार? स्वर्गांतील अप्सरांचा सहवास हेंच ह्या सर्व काबाडकष्टांचें फळ ना? जें मिळवावयाचें तेंच मला मिळालेलें आहे. आनंदीसारख्या अप्सरेला झिडकारून स्वर्गांतल्या एखाद्या अप्सरेला कवटाळण्याकरितां खांका वर करून उभा रहा म्हणून उपदेश करणारा रामशास्त्री माझ्याहून अधिक वेडा नाहीं काय? रामशास्त्र्यांच्या जर मी नादीं लागलों आणि खरोखर स्वर्गांत गेलों, तर सगळे देव 'आनंदीला झिडकारणारा' म्हणून माझ्याकडे बोटें दाखवितील आणि म्हणतील, 'अप्सरांचा हिरमोड करणाऱ्या ह्या जरठाला रंगेल देवांत घेऊं नका, अप्सरांच्या वाऱ्यालाही ह्याला उभा राहूं देऊं नका, स्वर्गांत आलाच आहे तर गतकालाची कहाणी बडबडणाऱ्या म्हाताऱ्या ब्रम्हयाच्या हाताखालीं ह्याला लुडबुडूं द्या.'—रामशास्त्र्यांसारख्या वेदाभ्यास-जड जठरांची दुर्गती मला प्रत्यक्ष दिसत आहे. इहलोकीं फाटक्या पोथ्या ह्यांच्या हातीं असावयाच्या आणि ज्ञानाच्या जोरावर कैलासाचें उंच शिखर ह्यांनीं गांठलेंच तर कैलासनाथाच्या भस्माची पिशवी ह्यांच्या हातीं पडावयाची!—मला 'स्त्रैण' म्हणून नांवें ठेवणारांना मी हट्टानें विचारतों, कीं पोथीचीं पानें किंवा भस्माचा गोळा ह्यांहून आनंदीच्या सुकुमार गालांवर पसरलेलें सौंदर्यशास्त्राचें ज्ञान किंवा लाल ओंठांच्या कुलुपांत ठेवलेला अमृताचा ठेवा हीं अधिक सुखाचीं नाहींत काय? (आनंदी येते) (उघड)—देवा, बरें केलेंस, मला एखाद्या शास्त्र्याच्या जन्मास नाहीं घातलेंस! मी जर शास्त्री झालों असतों, तर घटपटाच्या काथ्याकुटींत किंवा शास्त्राधारांच्या कुजे-

दलालींत मग्न होऊन असल्या सुंदर अप्सरेची खरी किंमत ओळखली नसती. आनंदी, ये अशी बैस; मला तुझा विचार पसंत पडला. निजामावरच्या स्वारीचा बेत मी पक्का ठरविला हें तुला सांगण्याकरितां तुझ्या महालांत मी आलों आहे.

आनंदी० : मला बरोबर स्वारींत नेलें पाहिजे.

दादा० : तुलाही बरोबर नेण्याचें मीं ठरविलें आहे. प्रथम वाटलें होतें कीं तुला पुण्यास मागें बंदोबस्ताकरितां ठेवावी पण—

आनंदी० : मागें कोण काय करणार आहे ? सर्व सरदार बरोबरच स्वारींत नेले म्हणजे झालें.

दादा० : तें सगळें खरें, पण बापूंनीं सांगितलें, वार्धक्यामुळें स्वारीची दगदग कांहीं मला सोसायची नाहीं. तेव्हां मी मागें राहतों.

आनंदी० : बरें झालें मागें राहिले तर, त्या म्हाताऱ्याला कधीं स्वारींत कोणीही नेऊ नये,—

दादा० : कां बरें, असें कां ?

आनंदी० : आपणाला माहीत नाहीं काय ? त्याची ज्याच्यावर नजर पडली त्याचें कांहीं कधीं बरें झालें नाहीं. विषारी नजर आहे हो त्याची ! माधवाच्या वेळीं त्याच्या स्वतःच्या मुलाबद्दल तो म्हणाला, बाबू आतां चांगला घट्टाकट्टा दिसतो; तेव्हांपासून बाई तो मुलगा रोडूं लागला. आणि माधवानें सासवडला निराळा वाडा बाबूला बांधून दिला, तेव्हा बाबूची प्रकृति सुधारली म्हणे !

दादा० : माझ्या मनांत पहिल्यांदा आलें, बापूंची व ह्या कज्जेदलाल शास्त्र्यांची घावी गांठ घालून, म्हणजे आपोआप त्यांच्या विषारी नजरेनें जातील कज्जेदलालांची हीं रोपटीं करपून; पण मागाहून संशय आला बापूच त्यांना मिळाले तर; म्हणून एकदां वाटलें तुला मागें ठेवावी; म्हणजे नमक-शास्त्र्यांसारख्या कज्जेदलालाला हाताशीं धरून तू हें भटाभिक्षुकांचें व शास्त्र्यांचें बंड मोडून टाकशील. पण मनानें पक्कें घेतलें, असलें रत्न स्वारींत बरोबर पाहिजेच. आतां भटांभिक्षुकांचे व कज्जेदलालांचे हें बंड कसें मोडावयाचें एवढीच काय ती काळजी उरली आहे.

आनंदी : तुळोजीनें फाडलेल्या चिठ्ठीसंबंधानें येथें तणतणून गेल्यानंतर रामशास्त्रीबुवांची स्वारी म्हणे ओंकारेश्वराचे मंदिरांत गेली; आणि—

दादा० : होय ! त्यावेळी शिवरात्रीमुळें गांवांतील कांहीं शेटसावकार, मानकरी व सरदारही दर्शनास गेले होते. नाना आणि बापू हेही हजर होते.

भर गर्दीत—बापूंनींच मला ही सर्व हकीकत सांगितली—भर गर्दीत रामशास्त्र्यांनीं ओंकारेश्वरावर हात ठेवून सांगितलें कीं, नारायणाचा खून करण्याचा हुकूम मी डोळ्यांनीं पाहिला. रामशास्त्र्यांनीं असें सांगितल्यावर नमकशास्त्री मारुतीच्या देवळांतील हकीगत सांगूं लागले; पण सर्वांनीं एकच गिल्ला केला. आणि 'राघोबाला प्रायश्चित्त कोणचें द्यावयाचें तें सांगा' असें प्रत्येकजण रामशास्त्र्यांना विचारूं लागला. रामशास्त्री अमकें प्रायश्चित्त म्हणून पुकारणार, तों नाना आणि बापू पुढें झाले, आणि बापूंनीं सर्वांना बजावून सांगितलें कीं, पेशव्यांच्या गादीसंबंधाचा हा प्रश्न आहे; भर बाजारांत अशा रीतीनें असल्या राजकाजाचा खल करणें चांगलें नव्हे; बापूंची ही ताकीद ऐकून रामशास्त्री रागारागानें देवळांतून निघून गेले. नंतर सर्वजण आपापसांत कुजबुजत चोहोकडे पांगले. नाना आणि बापू दोघांचाही सल्ला मी घेतला. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, निजामावरच्या स्वारींत मोठें यश संपादिल्याशिवाय पुण्याच्या लोकांची तोंडें बंद होणार नाहींत.

आनंदी० : हे पुण्यांतले लोकच मोठे विक्षिप्त; नसत्या गोष्टींची उठाठेव त्यांना करायला पाहिजे. नारायण काय ह्यांचा मुलगा, का भाऊ, का चुलता, मावसा, मामा, कोण यांचा ? आम्हीं त्याला मारलें तर त्याच्या शवाला कवटाळून रडत बसणारे हे कोण ?

दादा० : तें सगळें खरें, पण आतां जो तो आमच्याकडे 'खुनी' म्हणून बोटें दाखविणार ना ?

आनंदी० : मीं सांगितलें तसें करावें, म्हणजे ह्या सर्वांचीं तोंडें बंद होतील. निजामाशीं लढण्यापूर्वीं पंढरपुरास बरेच दिवस तळ द्यावा. जाण्याबरोबर तेथील सर्व भटाभिक्षुकांना व शास्त्र्यांना मोठमोठ्या दक्षणा देऊन आपलेंसें करून घ्यावें. पुण्यांतील देवळांच्या जमिनीच जप्त कर, कोणाचें इनामच काढून घे, कोणाचीं वर्षासनें बुडीव, कोणाचा वृत्तिछेद कर, अशा रीतीनें सर्वांच्या पोटोबाला चिमटे बसले, म्हणजे आपोआप विठोबाचे दर्शनाला पंढरपुरीं येतील व तोंड उघडण्याचें प्रायश्चित्त आमच्यापुढें नाकें घासून सर्वजण घेतील. अशीं नाकें घांसल्यावर सर्वांचीं उत्पन्नें सोडून द्यावींत, मग आपला बोलबाला चोहोंकडे व्हावयास कितीसा उशीर ?

दादा० : तुझ्या विचाराप्रमाणें वागण्याचाच मीं निश्चय केला आहे. हा सर्व बेत नीट पार पडावा म्हणून निजामावरचे स्वारींत श्रीक्षेत्र पंढरपुरापर्यंत

मी तुला नेणार आहे. पण ह्या सर्व बेतांत मला एक मोठी अडचण दिसते.—ही रामशास्त्र्यांची धोंड जेथें तेथें आमच्या आड येत आहे.—'माधवाला कैद कसा करूं' म्हणून शंका माझ्या मनाला शिवली नाहीं व नारायणाच्या हुकुमांत 'ध' चा 'मा' करण्यास संमति देतांनाही माझ्या जिवाला इतकी दिक्कत वाटली नाहीं. पण रामशास्त्र्याला कसा दूर करावा, ह्याचा मीं विचार करूं लागलों, म्हणजे माझीं सर्व गात्रें गळून जातात!—राजसत्तेला निर्माल्य-वत् करण्याची शक्ति एखाद्या बुद्धिवान तपस्व्याच्या अंगीं असावी अं!—मला केव्हां केव्हां वाटतें, ही पेशव्याची गादी सोडून गंगाकिनारीं तपश्चर्या करून रामशास्त्र्यांप्रमाणें विद्वान योगी व्हावें!

आनंदी० : (जवळ जाऊन) काय वाटतें आपणाला? योगी व्हावयाचें जर मनांत असलें—

दादा० : (जवळ बसवून घेऊन) आतां तसें कांहीं नाहीं वाटत.—तूं लांब उभी असलीस म्हणजे भलतेसलते विचार मनांत येतात.—तुझा हात असा हातांत धरला म्हणजे ज्याच्या नांवाचा दरारा आबालवृद्धांना वाटत आहे असा प्रखर प्रतापी पेशवा व्हावेंसें मला वाटतें.

आनंदी० : असें जर आपणाला वाटत असेल तर रामशास्त्र्यांना बोलावून आणून त्यांचीं पाहिजे तशीं आर्जवें करून त्यांना पंढरपुरास आपल्याबरोबर घेऊन चला. पुण्यांतील भटाभिक्षुकांची व त्यांची ताटातूट झाली म्हणजे पुणेकरांचा नक्षा उतरलाच म्हणून समजा. पंढरपुरास गेल्यावर माधवाला आणि राम-शास्त्र्यांना दोघांनाही शिव्याशाप देणारे रामशास्त्र्यांसारखेच खवीस उपाध्ये आहेत तेथें. त्यांना बगलेत मारून देऊं रामशास्त्र्यांच्या विरुद्ध चिथवून. काट्यानेंच कांटा काढला पाहिजे.—अशा रीतीनें पुण्यास रामशास्त्री मावळले व पंढरपुरास निस्तेज पडले म्हणजे झालें त्यांचें प्रस्थ कमी.

दादा० : पण श्रीक्षेत्रीं जाऊन प्रायश्चित्त घेण्याचें आतां कबूल केलें तर मात्र रामशास्त्री येतील पंढरपुरास.

आनंदी० : कबूल करावें प्रायश्चित्त घेण्याचें.—आपणास काय? कार्यभाग साधला म्हणजे झालें. आतां रामशास्त्री आले म्हणजे मी देखील हट्ट धरून बसेन, प्रायश्चित्त घेतलेंच पाहिजे म्हणून.

दादा० : हो, ही युक्ती बरी. करावें कबूल, सांगाल तें प्रायश्चित्त घेतो म्हणून. रामशास्त्र्यांना मीं केव्हांचें बोलावणें पाठविलें आहे. अजून कां बरें

आले नाहींत ?

(दासी येते.)

दासी० : सरकार, रामशास्त्री, सुमेरसिंग, खरकसिंग व कोतवाल आले आहेत. सरकारच्या आज्ञेची वाट पहात आहेत.

दादा० : रामशास्त्र्यांना आंत पाठवून दे; आणि शेजारच्या दिवाणखान्यांत थोडा वेळ बसायला सरदारांना सांग.

(दासी जाते.)

आनंदी० : (उठून दादासाहेबांच्या मागे उभी रहाते.) आज मात्र रामशास्त्र्यांना जाळ्यांत पुरें पकडलें पाहिजे हो! मुळामुठेच्या संगमांत आतां जें जाळें टाकायचें, ते पाण्याच्या ओघानें वहात वहात नेऊन पंढरपुरच्या वाळवंटावर बाहेर काढायचें; म्हणजे जाळ्यांतील माशाच्या, आपण फशी पडलों आहे, हें ऐन वेळेपर्यंत ध्यानांत यावयाचें नाहीं.

(रामशास्त्री येतो.)

दादा० : (उठून) या शास्त्रीबोवा, या; असें बसायचें होतें.

राम० : श्रीमंतांबरोबर अर्ध्यासनावर बसण्याची आम्हां गरिबांची योग्यता नाहीं.

दादा० : शास्त्रीबुवा, आपणांस माहीत आहे की धनी व नोकर हें नातें आपणांसारख्या गुरुवर्यांशीं ठेवण्याची पेशव्यांची रीत नाहीं.

राम० : रावसाहेबांबरोबर जुन्या चालीरीति लयास गेल्या. आतां नव्या चाली पडल्या. पुतण्याचा खून करण्याची पद्धत तुमच्या घराण्यांत पूर्वी होती काय ?

दादा० : (बसत) माझ्या माथीं हा अपराध नाहक आपण मारतां आहां!

आनंदी० : शास्त्रीबुवा, गारद्यांच्या हातून गाय चुकून मारली गेली, तर तुम्ही ह्या असल्या बोलण्यानें वासरू जाणूनबुजून मारीत आहां.

राम० : बाईसाहेब, मला दोष देण्यापेक्षां आपल्या कर्माला दोष कां देत नाहीं ? कैलासनाथाची इच्छाच तशी आहे; मी खोटें कसें बोलूं ?—दादासाहेबांवर हा खुनाचा आरोप ठेवून गांवांत सर्व लोक जेव्हां कुजबुजायला लागले, तेव्हां 'देवा, हें खोटें ठरूं दे', म्हणून कैलासनाथाची मीं किती वेळा तरी करुणा भाकली; पण कैलासनाथाचे मनास आलें नाहीं. मी तरी काय करूं बाईसाहेब ? नारायणरावांना मारण्याचा हुकूम मीं माझ्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिल्यावर दादासाहेबांना मी खुनी समजूं नको तर काय करूं ?

आनंदी० : अहो, त्या हुकुमांत 'धरावें' असें होतें हें मी माझ्या डोळ्यांनीं

प्रत्यक्ष पाहिलें आहे. गारद्यांना चुकवून तुळोजीनें तो हुकूम आपल्या हातीं घेतला, आणि त्यानें ताईतांत घालून दंडांत बांधला. गारद्यानें किंवा तुळोजीनें 'ध' चा 'मा' मागाहून केला नसेल कशावरून?

राम० : हुकुमांत जर 'धरावें' असेंच असतें, तर ज्यांनीं हुकूम लिहिला ते हजर असतांना,—दादासाहेब हजर असतांना—आपण हजर असतांना —गारद्यांचे सरदार हजर असतांना,—नारायणराव मारले गेले नसते.

दादा० : पण ह्या गोष्टींची वाटाघाट करण्याचा काय उपयोग? खऱ्या गोष्टी काय झाल्या, हें एक परमेश्वराला माहीत. तथापि नारायण मारला गेला, ह्याबद्दल मला अंतःकरणपूर्वक वाईट वाटत आहे आणि प्रायश्चित्त न घेण्याचा सर्व हट्ट मीं सोडून दिला आहे. श्रीक्षेत्रीं पंढरपुरास जाऊन तेथें आपल्या हस्तें आपण सांगाल तें प्रायश्चित्त घेण्याचें मीं ठरविलें आहे. आपण जें आज प्रायश्चित्त सांगाल, तें मी आपल्या देखत श्रीक्षेत्रीं घेईन. पूर्वींच्या सर्व गोष्टी विसरा आणि ह्या अपराध्याला प्रायश्चित्ताची शिक्षा सांगा.

राम० : दादासाहेब, मी पंढरपुरास कसचा येतों, आणि तुम्हांला प्रायश्चित्त देऊन कसला शुद्ध करून घेतों!

आनंदी० : आपण न्यायाधीश आहां; प्रायश्चित्त द्यावयाचें आपलें काम आहे. आपण पंढरपुरीं आलें पाहिजे व आम्हांला प्रायश्चित्त देऊन पवित्र करून घेतलें पाहिजे.

राम० : माझ्या डोळ्यांनीं मीं तो हुकूम पहाण्यापूर्वी प्रायश्चित्तानें मी आपणांस शुद्ध करून घेतलें असतें; पण आतां काय?

आनंदी : आतां कोणती हरकत?

राम० : त्या वेळीं खुनाचा संशय होता; आतां प्रत्यक्ष खुनी ठरलां. दादासाहेब, पुतण्याचा खून करून गादी बळकावण्याचा भयंकर अपराध आपण केला आहे. त्या अपराधाबद्दल शास्त्रांत देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं.

दादा० : काय? देहांत प्रायश्चित्त?

राम० : होय! देहांत प्रायश्चित्त!

दादा० : (उठून) देहांत प्रायश्चित्त?

राम० : होय, देहांत प्रायश्चित्त!

आनंदी० : (पुढें होऊन) देहांत-प्रायश्चित्त!—नाहीं; आपण चुकून बोलला

असाल.—शास्त्रीबोवा, नीट विचार करून सांगा, कोणतें प्रायश्चित्त तें.

राम० : बाईसाहेब, नीट विचार करून सांगतों, देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं.

दादा० : (बसत दुःखानें) देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं.

आनंदी० : शास्त्रीबुवा, दुसरें प्रायश्चित्त असलें पाहिजे.

राम० : नाहीं, बाईसाहेब नाहीं; दुसरें प्रायश्चित्त नाहीं—आपणांसारख्या महापातकी खुन्यांची सोय लावण्याकरितां ऋषींनीं शास्त्रें लिहिलीं नाहींत.

आनंदी० : (रागानें) काय शास्त्रीबुवा, दुसरें प्रायश्चित्त नाहीं? आमची सोय पहाण्याची ऋषींना जरुरी नसली तरी तुम्हांला जरुरी आहे. नीट विचार करून उत्तर द्या.

राम० : दुसरें प्रायश्चित्त नाहीं; देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं; मी पुन्हा सांगतों, देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं.

आनंदी० : कोणापुढे, कोठें व काय बोलतां आहां, ह्याची शुद्धी शास्त्रीबुवा, तुम्हांला नसावीसें दिसतें.—श्रीमंतांना देहांत प्रायश्चित्त सांगणाऱ्यांची जीभ येथच्या येथें कापली जाईल, हें ध्यानांत ठेवून नीट शुद्धीवर येऊन बोला तुम्ही आमचे नोकर आहां, हें विसरलांत वाटतें?

राम० : बाईसाहेब, आतां वाड्यांत येण्यापूर्वी मी श्रीमंतांचा नोकर होतों; पण वाड्यांत आलों आहें तो नोकरी सोडून दिली, हें कळविण्याकरितांच आलों आहें. बाईसाहेब, ह्या जिभेनें ह्या वेळीं सत्य भाषण केलें आहे; पुढें कदाचित् खोटें बोलण्याचा मोह तिला उत्पन्न होईल; तेव्हां ह्याच वेळीं तिला काढून टाकून सत्य बोलण्यांत ह्या जिभेची समाप्ति आपण केली तर त्यांत मला समाधानच आहे. राघोबा, पेशव्यांच्या गादीचा नोकर नसलेला हा रामशास्त्री तुला देहांत प्रायश्चित्त सांगत आहे. राजाज्ञेनें तुझें डोकें उडविलें जाण्याचा जर संभव नसेल, तर देहाला झिजवून अखेरीस देहाच्या पतनानें पापक्षालन कसें करावें, ह्या तपश्चर्येचा धडा शिकण्याचे उद्योगास लवकर त्वां लागावें, हें बरें. मजबरोबर गंगाकिनारीं येत असशील, तर हा धडा शिकविण्यास मी तयार आहें—खुनी पेशवा गादीवर असेतोंपर्यंत पुण्याचे हद्दीत पाणी प्यावयाचें नाहीं, ह्या प्रतिज्ञेनें मुलेंमाणसें माहुलीस पाठवून मी घराचे बाहेर आतां पडलों आहें. स्वतः देहांत प्रायश्चित्त कसें घ्यावें हें शिकण्याची जर राघोबा तुझी इच्छा असली तर गंगाकिनारीं—

आनंदी० : गंगाकिनारीं तपश्चर्या करीत बसण्याच्या गोष्टी शास्त्रीबोवा आतां विसरा. पेशव्यांचा असा उपमर्द करणारांना गंगाकिनारीं स्वस्थपणानें जाऊन बसण्याची फुरसत मिळत नसते. तुम्ही आम्हांला कोण प्रायश्चित्त सांगणार?— विद्वत्तेची खोटी घमेंड तुम्हांला झालेली, निःस्पृहतेचा नसता टेंभा तुम्हीं मिरवणारे, तपश्चर्येच्या व देवाधर्माच्या वल्गना तुमच्या तोंडांत कशाला? स्वतःच्या मोठेपणाच्या फाजील गर्वानें तुमची बुद्धि कुजली आहे, मुख्य न्यायाधीशाची जागा मिळाल्यामुळें तुमचें मन नासलें आहे. माझ्या तोंडून निघेल तो शब्द खरा ह्या अहंकारानें तुमचें शरीर तारवटून बेताल झालें आहे—तपश्चर्या आतां अंधारकोठडींत! प्राण जाऊन कपाळमोक्ष होईतों अंधारकोठडी तुमच्या कपाळाची सुटायची नाहीं म्हणून समजा. कोण आहे पलीकडचे दालनांत? सुमेरसिंग, खरकसिंग, तुळोजी, या, लवकर या आणि ह्या उन्मत्त माथेफिरूला कैद करा—शास्त्रीबोवा, पुन्हां एकवार नीट विचार करा. तुमच्या सांगण्यावरून किरकोळही प्रायश्चित्त आतां आम्ही घेत नाहीं. पण तुम्हांला जर एखाद्या डोंगरी किल्ल्यावरील अंधारकोठडी टाळावयाची असेल आणि गंगाकिनारीं स्वस्थपणें स्नानसंध्या करीत बसण्याची परवानगी पाहिजे असेल, तर नारायणाच्या वधासंबंधानें श्रीमंतांची लवलेशही चूक नाहीं, इतकेंच नव्हे तर असले धर्मभीरू, प्रतापी व पुण्यश्लोक श्रीमंत पेशव्यांच्या गादीस पुन्हां लाभणार नाहींत, असें भर दरबारांत जाहीर करण्यास तुम्ही तयार झालें पाहिजे.

(सुमेरसिंग, खरकसिंग व तुळोजी येतात.)

तुळो० : हें जाहीर कशाला करावयाला पाहिजे? सूर्याचा प्रकाश जसा लपवितां यावयाचा नाहीं, तसें या धर्मावताराचें तेज लपवितां येणार नाहीं.

खरक० व सुमेर० : जगांत अशी एकही तलवार नाहीं, जी श्रीमंतांचा प्रताप कबूल करणार नाहीं.

तुळो० : जगांत अशी एकही जीभ नाहीं, जी ह्या पुण्यश्लोक श्रीमंतांचे पोवाडे गाणार नाहीं.

आनंदी० : पण ही जीभ श्रीमंतांचें मस्तक धडापासून दूर करूं पहात आहे ना!

सुमेर० व खरक० : हुकूम व्हावा; हीं जीभ येथल्या येथें छाटून टाकतों.

(रामशास्त्र्यांचे दोन्ही बाजूस दोघे उभे राहतात.)

आनंदी० : शास्त्रीबुवा, तुम्हांला आम्हीं कैद केलें आहे. बोला, अंधारकोठडींत पडतां कां भर दरबारांत श्रीमंतांचें यश गाऊन आताचे अपराधांतून

मोकळे होतां ?

राम० : बाईसाहेब, पाहिजे तर माझी जीभ छाटून टाकण्याचा हुकूम करा, पाहिजे तर अंधारकोठडींत कांट्यांच्या पिंजऱ्यांत मला कोंडून ठेवा, पाहिजे तर ज्या ह्या तलवारींनीं नारायणरावांचे तुकडे तुकडे केले त्याच ह्या तलवारी माझ्याही शरीरावर पाहिजे तशा चालवा; मला कोठेंही न्या, कसाही ठेवा, शब्द उच्चारण्याची जिभेंत शक्ती असेतों मोठमोठ्यानें ओरडून सर्व दुनियेला मी जाहीर करणार कीं, 'नारायणरावांचा खून राघोबानें केला आणि ह्या पापाला देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं.'

आनंदी० : ह्या उन्मत्त माथेफिरूच्या मुसक्या अगोदर बांधा—पकडा त्याला, पहातां काय, धरा त्याला.–अंधारकोठडींत देहांत प्रायश्चित आपणांस आतां लवकरच मिळेल.—पकडा त्याला, पहाता काय ?

(सुमेरसिंग, खरकसिंग पकडूं लागतात.)

दादा० : नका, शास्त्रीबुवांना कैद करूं नका. माझ्या डोक्यावर पूर्वीच्या पातकाचें ओझें मोठें आहे. नको, रामशास्त्र्यांच्या खुनाच्या पातकाची आणखी भर नको—जा, शास्त्रीबुवा, जा, आमच्या राज्यांतून एकदम बाहेर निघून जा. आमची निंदा करायला जर क्षणभर अधिक आमच्या राज्यांत राहिलां, तर खरोखरच तुमची जीभ छाटली जाईल.—सुमेरसिंग, खरकसिंग, तुळोजी, पुण्याच्या हद्दीबाहेर ह्यांना बंदोबस्तानें काढून लावा. ( )

## प्रवेश दुसरा

[स्थळ : मारुतीचे देवळाचा रस्ता. भिकंभट प्रवेश करतो.]

भिकं० : मोंगलांच्या स्वारीवर निघण्याकरितां सरकारनें गारपिरावर डेरे दिल्यापासून व गारदी पुणें शहर लुटणार ही अफवा पिकल्यापासून शहर कसें अगदीं शून्य झालें आहे—आतां हे मोकळे रस्ते पाहून मला तर बरें वाटतें. नाहीं तर कोण गर्दी! एखाद्या सरदाराच्या पुढेंमागें दहापांच भालदार

चोपदार असावेत आणि त्यांनीं रस्ता सगळा मोकळा करून त्या सरदारानें ऐसपैस जागेतून डुलत चालावें, तसा मी आज ह्या रस्त्यांतून डुलत चाललों आहे. माझ्या सभोंवतीं ऐसपैस जागा, आणि ती ह्या रहदारीच्या रस्त्यावर, शिवाय कडोसीला तीन रुपये! आणखी श्रीमंत श्रीमंत तें काय व्हावयाचें? (कडोसीचे रुपये काढून मोजून) हा रुपया चमकशास्त्र्यांनीं दिला, हा रुपया दुर्गाकाकूंनीं दिला, हा म्हाळसाकाकूंनीं दिला. काल तिघेही पंढरपुरच्या रस्त्याला रवाना झाले. आज नमकशास्त्र्यांचें आवर्तन आटपलें म्हणजे तेही त्याच मार्गाला लागणार. जातांना ते चौथा रुपया देतीलच. अरे, आमच्या ह्या मारुतीच्या देवळाकडे कोण लोक येताहेत?—मला तर रस्त्यावर गर्दी अगदीं खपेनाशी झाली आहे.—गर्दी मोडण्याचा मंत्र मला आतां अगदीं पाठ झाला आहे. हा मंत्र ओरडत एखाद्या आळींतून फिरून यावें, कीं लगेच आळीच्या आळी झाली ओस!—आतां मंत्र म्हणूं या म्हणजे ही मंडळी आपोआप पळून जातील—अहो, पळा, पळा, धूम ठोका; ह्या बाजूनें गारदी आले; शहर लुटण्याविषयीं श्रीमंतांनीं गारद्यांना हुकूम दिला आहे. आणि लुटालूट करीत गारदी ह्याच बाजूनें येत आहेत; पळा, जीव वांचवा, पळा, पळा. गेले बिचारे!—गारद्यांचें नांव घेतलें कीं, ठोकली ह्यांनीं धूम! काय पुन्हा मागें परततात!–अहो, नारायणरावांचा खून करणारे गारदी लुटालूट करीत आले; ह्याच बाजूने आले; श्रीमंत असाल तर लवकर पळा; भिक्षुक असाल तर अगोदर पळा, शास्त्री असाल तर प्रथम पळा–शास्त्र्यांवर ह्या खुनी गारद्यांचा दांत फार आहे–पळा–पळा–नका परतूं. ह्या बाजूनें खून करणारे गारदी—(सुमेरसिंग; खरकसिंग व तुळोजी येतात. भीतीने कांपतो) अरे बापरे खरेच आले–माझे रुपये लुटणार–तीनही रुपये लुटणार–खरेच आले.

सुमेर० : काय मूर्ख लोक आहेत! उगीच लुटालूट करणारे व खुनी म्हणून ह्यांनीं आमच्या नांवाचा बभ्रा चालविला आहे.

तुळो० : रावसाहेबांच्या वेळी निजामानें पुणें जाळलें, त्या वेळेला जसें पुणें ओस पडलें होतें तसें ह्या अशा खोट्या कंड्या पिकविण्यांत आल्यामुळें आज ओस पडलें आहे.

खरक० : अरे मूर्खा, भीतीनें असा कांपतोस कां! तुला कोणी कांहीं करीत नाहीं—पुण्याचे लोक हाडापिंडानें भित्रे, ह्यांत कांहीं शंका नाहीं. नाहींतर नुसत्या कंड्या पिकल्यामुळें पुणें असें ओस पडलें नसतें! कावेबाज पळ-

पुट्यांनीं, धूर्त भित्र्यांनीं व मिजासी चोरांनीं पुणें शहर भरलेलें आहे, म्हणून रजपूत म्हणत असतात, तें कांहीं खोटें नव्हे!—पहा कसा भीतीने कांपतो आहे तो.

**भिकं०** : तीनच रुपये आहेत, एकेकाला एकेक घ्या आणि मला जिवंत सोडा—तीनच आहेत.—चमकशास्त्री, काकू, आतांच गेल्या; त्यांनीं तीनच दिले—माझे प्राण वांचवा. (एकेकापुढें एक एक रुपया ठेवतो आणि नमस्कार घालतो.) देवा, प्राण वांचवा.

**सुमेर०** : मूर्ख कुठला! तुझा प्राण कोण घेतो?

**भिकं०** : (स्वगत) नमकशास्त्र्यांवर यांचा रोख दिसतो.

**तुळो०** : चमकशास्त्री तेवढे गेले; नमकशास्त्री नाहीं गेले?

**भिकं०** : आज जाणार आहेत.

**तुळो०** : त्यांना जरा हांक मार पाहूं!—हेंच तें मारुतीचें देवालय—हांक मार शास्त्रीबुवांना.

**भिकं०** : (स्वगत) आतां शास्त्रीबुवांची गठडी वळणार. (देवालयाच्या दरवाजाजवळ जाऊन उघड) शास्त्रीबुवा, अहो शास्त्रीबुवा!—पळा, धांवा, प्राण वांचवा—खून करणारे व लुटालूट करणारे गारदी आले आहेत हो! धांवा, पळा, प्राण वांचवा.

(दरवाजांतून आंत पळत जातो.)

**सुमेर०** : काय पागल माणूस आहे!

**तुळो०** : असल्या मूर्खांनींच आमच्या नांवाची छीःथू चोहोंकडे केली आहे.

(नमकशास्त्री भिकंभटाचा कान धरून बाहेर आणतो.)

**नमक०** : गाढवा, उगीच कां ओरडत सुटला आहेस?—कोण आले आहेत दाखीव पाहूं.

**तुळो०** : मूर्ख आहे, द्या सोडून.

**सुमेर० व खरक०** : पागल आहे, द्या सोडून.

(कान सोडून देतो.)

**तुळो०** : आपणाला एवढ्याचसाठीं बाहेर येण्याची तसदी दिली; बाईसाहेबांचा हुकूम झाला, चमकशास्त्री, नमकशास्त्री, ह्यांची नीट व्यवस्थेनें स्वारींत रवानगी करून द्या म्हणून.

**नमक०** : हुकूम कालच समजला. आज गर्गाचार्यांचे मुहूर्तानें चमकशास्त्री व

घरची मंडळी रवाना देखील झाली.—थोडें काम शिल्लक राहिलें होतें,—मी उद्यांचे मुक्कामाला त्यांना गांठणार आहें. श्रीमंतांचा कूच केव्हां होणार?

सुमेर० : श्रीमंत काल्च गारपिरावर डेरेदाखल झाले.

तुळो० : कालचा बाईसाहेबांचा घातवार होता; आज बाईसाहेब शनवारवाडा सोडून डेरेदाखल होतील. आणि उद्यां गारपिरावरून तळ उठून पंढरपुराकडे कूच होईल.

नमक : झालें तर, आम्हीं आयत्यावेळीं दाखल होणारच म्हणायचे!

तुळो० : हें एक काम बरें पार पडलें—सरदारसाहेब, चला, इतके लांब आलों आहों तें मारुतीरायाचें दर्शन घेऊं—शास्त्रीबुवा, आज पुन्हां भुताटकी नाहींना?

नमक० : छे! छे! भुताटकीचा आज पक्का बंदोबस्त केला आहे—यावें असें दर्शनाला. (नमकशास्त्री, तुळोजी, सुमेरसिंग, खरकसिंग जातात.)

भिकं० : वाघाच्या जबड्यांतूनच जिवंत सुटलों म्हणायचा—पण तीन रुपये गेले! पाच प्राणांपैकीं तीन प्राण गेल्यासारखेच आहेत.—(रुपये जमिनीवर पाहून हर्षानें) अरे, त्यांनीं रुपये नाहीं उचलले अं! (रुपये घेतो.) चांगले सज्जन आहेत; लुटालूट करणारे म्हणून उगीच लोक ह्यांची निंदा करतात. (रुपये मोजून) आली, गेलेली लक्ष्मी पुन्हां परत आली.—एक, दोन, तीन—लक्ष्मी चंचल आहे म्हणतात; पण तसें कांहीं नाहीं, माझ्या कंबरेला घट्ट मिठी मारून बसणार, असें आतां लक्षण दिसत आहे.

(कडोसीस रुपये लावतो. नमकशास्त्री येतो.)

नमक० : अरे भिकंभट, अरे भिकभट, जरा असा ये पाहूं.

भिकं : काय म्हणतां शास्त्रीबुवा?

नमक० : अरे, सरदार दर्शनाला आले; सहज आले, रिक्त हस्तानें आले; त्यांच्याजवळ आतां रुपये नाहींत. तीन रुपये त्यांनीं आतां देवापुढें ठेवण्याकरितां मागितले, तेव्हां थोडा वेळ तुझ्याजवळचे दे ते रुपये.

भिकं० : तीन गांठी घालून कडोसीला ठेवले आहेत. वेळ फार लागेल शास्त्रीबुवा गांठी सोडायला.

नमक : मी सोडतों, आटप लवकर.

(रुपये घेऊन जातो.)

भिकं० : लक्ष्मी चंचल हेंच खरें.—नाहीं, अजून लक्ष्मीला पकडून ठेवतां

येईल. आतां देवापुढें त्यांनीं तीन रुपये ठेवले म्हणजे आपण प्रथम उचलावेत. हं हें ठीक आहे. आज नशीब जोरावर आहे. आजच्या देवापुढच्या रुपयांत वांटणी मागायला कोणी भाऊबंद हजर नाहींत.—ह्या शास्त्रीणबाई म्हणजे माझ्याशीं भांडणारे भाऊबंदच—लक्ष्मीला हातांनीं घट्ट पकडावें आणि भाऊबंदांना लाथांनीं दूर ढकलावें, एरवीं सुख नाहीं. (जातो.)

## प्रवेश तिसरा

[स्थळ : शनवारवाड्याचा दिल्ली दरवाजा. बापू व नाना येतात.]

बापू० : ही महामायेची धिंडका आता एकदां बाहेर गेली म्हणजे सर्व जुळलें. मामांना, हरिपंतांना, पटवर्धनांना अखेर स्वारींत जावें लागलेंच अं! तुम्ही बरे सुटलां.

नाना० : मोरोबा स्वारींत गेले, तेव्हां बकासुराची पाळी टळली. सर्व सरदारांनीं काल पुन्हां शपथा घेतल्या, पंढरपुरास पोंचल्याबरोबर कांहीं तरी निमित्त काढून सर्वांनीं परत यावयाचें.

बापू० : पंढरपुराहून सरदारांनीं पाय काढल्याची बातमी आली, की इकडे मातोश्री गंगाबाईसाहेबांच्या नांवाची द्वाही फिरविली म्हणून समजा. ज्या बारभाईच्या कारस्थानाचा आपण पाया रचला, तें कारस्थान लवकरच फळास येणार यांत संशय नाहीं.

नाना० : रामशास्त्र्यांसारखा कडकडीत व तेजस्वी ब्राह्मण जर न्यायाधीशाचे जागीं नसता तर हें बारभाईचें कारस्थान कांहीं इतक्या लवकर फळास आलें नसतें.—शिवाय परवां आपण तर ओंकारेश्वराचे देवळांत फारच खुबीनें वागलांत; सर्वांच्या देखत आपण रामशास्त्र्यांना चापल्यामुळें दादासाहेबांचा विश्वास चटदिशी बसला; आणि—

बापू० : शास्त्रीबोवाही विशेष हट्टाला पेटले.—भर बाजारांत प्रायश्चित्ताचा

खल करणे चांगलें नाहीं, असें बोलल्यावर रामशास्त्र्यांचे डोळे काय लाल झाले! मला वाटलें, हा शीघ्रकोपी ब्राह्मण मला आतां शाप देतो कीं काय.

नाना० : नाहीं, रामशास्त्र्यांसारख्या पवित्र व निःस्पृही ब्राह्मणाचा क्रोधाग्नि सत्कृत्यास कधीही जाळणार नाहीं; उलट ह्या रागाची ज्योत आमच्या उद्योगास सतेज करील.

बापू० : आणि झालेही तसेंच—घरादारावर तुळशीपत्र ठेवून राघोबाला देहांत प्रायश्चित्त रामशास्त्र्यांनीं सांगितलें म्हणून तर इतक्या लवकर सर्व सरदारांत राघोबाच्या दुष्कृत्याबद्दल बभ्रा—

नाना० : हा विषय इतकाच पुरें. महामायेची स्वारी आली.

(आनंदीबाई, तुळोजी व दासी येतात.)

आनंदी० : तुळोजी, बापूंचा व नानांचा सल्ला वरचेवर घेत जा. पुण्यासच एकसारखा न राहतां पांचसात दिवसांनीं पुरंदरास खेप घालीत जा. पुरंदरास गंगू कैदेंत आहे; त्यामुळें तेथें कांहीं कारस्थान होण्याचा संभव आहे. तसें तुला वाटलें, तर एकदम कारस्थानी मंडळींना कैद कर.

तुळो० : सरकारनें त्याविषयीं काळजी करूं नये. निजामच्या मोहिमेवरून सरकारस्वारी परत आल्यावर बापूच सरकारास विनंती करतील की, तुळोजीने फार हुषारीनें सरकारची कामगिरी बजावली आहे, तेव्हां तुळोजीला आतां एखाद्या पथकाची सरदारकी द्यावी.

बापू० : पुण्यास व पुरंदरास हूं का चूं जर होऊं दिलें नाहीं, तर अलबत सरदारकी सरकारकडून मिळेलच.

नाना० : पुण्यास कोणचाच सरदार मागें ठेवण्यांत आलेला नाहीं, तर प्रांताच्या बंदोबस्ताची सर्व भिस्त कोतवालावरच आहे. सरदारानें बजावावयाची कामगिरी जर ह्यांनी बजावली तर सरदारकी कां मिळणार नाहीं?—हुषारी पाहून नोकरचाकरांना नांवारूपास आणण्यात येईल किंवा कसें, ह्याबद्दलची शंका बाईसाहेबांचे कारकीर्दीत कोणाचेही मनांत येणार नाहीं.

आनंदी० : तुळोजी, तूं पुणें प्रांताचा बंदोबस्त जर चांगला ठेवलास आणि आम्ही परत आल्यावर बापू व नाना ह्यांनी जर शिफारस केली, तर आमच्या नांवाचें जें आम्ही कोतवालकीचें पथक सुरू करणार आहों, त्याची सरदारकी तुलाच देऊं.

प० दासी : बाईसाहेब, त्या कोतवाली पथकांत माझ्या भावाला असामी देण्याची मेहेरबानी—

दु० दासी० : बाबासाहेब, माझ्या भावालाही त्याच पथकांत असामी देण्याची मेहेरबानी—

प० दासी : सरकार हिच्या एका भावाला असामी परवांच मिळाली आहे, आणि दुसऱ्या भावाला—

दु० दासी : माझ्या दुसऱ्या भावाला असामी मिळाली तर तुझें काय गांठोडें गेलें ग ?

प० दासी : सरकार, मला एकच भाऊ आहे, हिच्यासारखे दोन नाहींत; तेव्हां हिच्या एका भावाला असामी मिळाली तेवढी पुरे—

दु० दासी : सरकार, हिच्या एकाही भावाला असामी देऊं नये. श्रीमंत भूत पाहून दचकून बरळले म्हणून हीच सर्वांना सांगत होती.—सरकारला आठवण आहे; श्रीमंत भूत पाहून—

प० दासी : ती कधींची गोष्ट! आतां काय त्याचें? काल श्रीमंत मुहूर्तानें वाड्यांतून बाहेर पडले, त्या वेळेलादेखील त्यांना नारायणरावांचें भूत दिसलें ही तर बातमी मी कोणापाशी बोललें नाहीं ना ?—सरकार, माझ्या भावाला—

आनंदी० : पुरे ग तुझ्या भावाची आणि तुमच्या भाऊबंदकीची कर्मकथा! ह्यांना काल म्हणे तिकडे भूत दिसलें! मी आतां सगळा वाडा फिरून आलें, नारायणाच्या त्या मेलेल्या भुतानें कोठें तोंड काळें केलें कोण जाणे! मी लहानपणीं ऐकिलेल्या एकाही गोष्टींत भुतांनीं पुरुषांना भय दाखविलेलें नाहीं. भुतांनीं बायकांना भिववावयाचें ही जुनी चाल. पण आतां पाहतें तसें कांहीं नाहीं! पुरुषांना भय दाखविण्याची नवीन चाल ह्या आजकालच्या भुतांत कशी पडली, कोण जाणे बाई!—तुळोजी, आम्ही परत येईतों शनवारवाड्यांतील व पुणें शहरांतील ह्या नवीन बागुलबुवांचाही तूं बंदोबस्त केला पाहिजेस.

तुळो० : होय सरकार. मी हा सर्व बंदोबस्त करतों—आतांच पहा ह्या दिल्ली दरवाजाचें स्वरूप कालच्याहून किती पालटलें आहे! काल श्रीमंत जेव्हां येथून गेले तेव्हां ह्या दरवाजाकडे पाहून त्यांना वाटलें, कीं आ पसरलेल्या वाघाप्रमाणे हा दरवाजा त्यांना खावयास उठला आहे. आतां ह्या दरवाजाचें तसें स्वरूप कांहींच दिसत नाहीं.

बापू० : पूर्वजांची आठवण होऊन काल श्रीमंतांना तसें वाटलें असावें.

नाना० : पूर्वजांची आठवण झाली, हेंच खरें.—श्रीमंत म्हणाले, ह्या वाड्याला वाटत असेल, बांधणाराच्या तिसऱ्या पिढीचा खून—

आनंदी० : समजतात. हीं बोलणीं मला समजतात. ह्या वाड्याला असें वाटतें काय? पाहून घेईन, निजामच्या स्वारीहून परत आल्यावर पाहून घेईन. रामशास्त्री निसटून गेला, पण तुळोजी, ह्या वाड्याला तर येथून हालता नाहीं ना यावयाचें!—ह्या वाड्यानें आणि ज्यांना आमच्या राज्यांतून हालून बाहेर जातां यावयाचें नाहीं त्या सर्व स्थावरांनीं, आम्हाला वाकुल्या दाखविण्याचें ताबडतोब सोडून दिलें पाहिजे. हा वाडा जर आम्हाला त्रास देण्याकरितां भुतेंखेतें चौकात वावरूं देऊं लागला, तर ह्या वाड्यांतील सर्व महाल जमीनदोस्त करून माझ्या कोतवाली पथकाचें निशाण मी ह्या ठिकाणीं रोवण्यास कमी करणार नाहीं. बापू, नाना, हा वाडा ज्यांनीं बांधला, त्यांचा जर अभिमान तुम्हांला वाटत असेल, पेशव्यांची ही सातमजली कीर्ती धुळीस मिळूं नये असें जर तुम्हांला वाटत असेल, तर रामशास्त्र्यानें आमच्याविरुद्ध उत्पन्न केलेलीं पुणें शहरांतील भुतें गाडून टाकण्याचें कामीं तुळोजीला तुम्ही मनोभावानें मदत करा.

तुळो० : ह्यावेळीं कशाला हे विचार!—मेणा तयार आहे; बाईसाहेब, चलायचें मेण्याकडे.

(पडदा.)

### अंक चवथा समाप्त

## अंक पांचवा
### प्रवेश पहिला

[स्थळ : नमकशास्त्र्यांचें घर. एका बाजूला दुर्गा, एका बाजूला म्हाळसा व मध्यें भिकंभट उभा आहे.]

भिकं० : म्हाळसाकाकू, दुर्गाकाकू, आतां उगीच देवापुढच्या पैशाबद्दल भांडण्यांत काय अर्थ आहे? आमच्या देवळांत आतां शास्त्रीबुवांमुळें दर्शनाला येतो कोण?

म्हाळ० : न यायला काय झालें?

दुर्गा० : आम्ही पंढरपुराहून परत आलों हें लोकांना समजलें म्हणजे पुन्हां लोकांची गर्दी होईल दर्शनाला.

भिकं० : आतां तुमच्यामुळें नाहीं गर्दी व्हावयाची. सर्व लोक शास्त्रीबुवांना अपेशी म्हणत आहेत. दादासाहेबांबरोबर पंढरपुरास गेले आणि बारभाईंच्या सैन्यापुढें दादासाहेबांना पळ काढावा लागला; शास्त्रीबुवांना सर्व लोक अपेशी समजतात.

(नमकशास्त्री येतो)

नमक० : अपेशी कां म्हणून समजतात? आमच्यामुळें तर बारभाईंना यश आलें.—आमच्या मारुतीनें नारायणरावांचें रूप धारण केलें; आणि आनंदीबाईचें कारस्थान बाहेर काढलें!—अपेशी कां म्हणून समजतात!—मीं दादासाहेबांना सांगितलें पंढरपुरीं तरी सुवर्णतुला करा म्हणून; पण ऐकतो कोण? आतां अपेशी कां म्हणून?—निजाम प्रथम माझ्या अनुष्ठानामुळें दादासाहेबांना अनुकूल झाला—अरे यशापयशाची सूत्रें हालवीत होतों मीं!—अपेशी कां म्हणून? दादासाहेब जोंपर्यंत माझ्या सांगण्याप्रमाणें वागत

होतें तोंपर्यंत पंढरपुराजवळ त्यांनीं बारभाईंच्या सैन्याची खोड मोडली व निजामाला त्यांनीं अनुकूल करून घेतलें.—अपेशी कां म्हणून?—मग सुवर्णतुला करण्याचें नाकारलें त्यांनीं; उलटलें गाडें! मींही दिला दादासाहेबांचा पक्ष सोडून, निजामही माझ्यानंतर वळला बापूंच्या पक्षाला; आणि नंतर चमत्कार झाला! पहा माझा पायगुण बारभाईंना कसा यश देता झाला!—अपेशी कां म्हणून? मी झालों मात्र बारभाईंच्या बाजूचा, तों सैन्यांतले सर्व मातबर माणूस एकामागून एक दादासाहेबांना सोडून येऊं लागले—अपेशी कां म्हणून? हरिपंत फडके म्हणाले, आहे...नमकशास्त्र्यांचा पायगुणच तसा चांगला आहे.

दुर्गा० : इकडचा पायगुण चांगला, म्हणून तर आम्हां दोघांनाही हरिपंतांनीं अक्कासाहेबांबरोबर बारामतीहून पुरंदरास गंगाबाईसाहेबांजवळ पाठवून दिलें.

नमक० : मग का रे भिकंभट, लोकांनीं आम्हांला अपेशी काय म्हणून म्हणावें?

भिकं० : मला तेंच समजत नाहीं; म्हणतात एवढेंच खरें.

नमक० : म्हणतात म्हणजे रे? लोकांना तूं बजावून सांगत जा. नमकशास्त्र्यांच्या व चमकशास्त्र्यांच्या अनुष्ठानामुळें बारभाईंना यश आलें. अपेशी कां म्हणून?

दुर्गा० : बारभाईंना यश आलें इतकेंच नव्हे तर आम्ही दोघीजणी पुरंदरास गंगाबाईसाहेबांजवळ होतों, म्हणून पेशव्यांच्या गादीला मालक सवाई माधवराव जन्मास आले.

नमक० : हो, हें मी विसरलोंच होतों. भिकंभट, हेही तूं सर्वांना सांग, ह्या दोघीजणी पुरंदरास हजर होत्या म्हणून श्रीमंत सरकार जन्मास आले.—पायगुणच तसा, आतां अपेशी कां म्हणून? बोल.

म्हाळसा० : गंगाबाईसाहेबांना आम्ही सगळी हकीकत सांगितली; आम्ही एकमेकींशी कशा भांडलों, आणि त्यामुळें हुकुमाचा कागद कसा बाहेर पडला, आम्हीं सगळें सांगितलें.

दुर्गा० : त्या वेळेला बाईसाहेब म्हणाल्या, केव्हां केव्हां घरगुतीं कज्जामुळेंही राज्याच्या गादीचें कल्याण होतें.

म्हाळसा० : आमचें भांडण कांहीं वायां गेलें नाहीं. आमची हकीकत ऐकून घेतल्यावर बाईसाहेबांनीं बापूंना कळविलें. शास्त्रीणबाईंच्या देवळांचें उत्पन्न

सरकारांत जप्त आहे तें सोडून द्यावें.

दुर्गा० : आमच्या मारुतीनें श्रीमंत नारायणरावसाहेबांचें रूप धारण केलें, त्याची हकिगत बाईसाहेबांनीं ऐकली, तेव्हां तर मारुतीच्या दर्शनाला केव्हां जाईन असें बाईसाहेबांना झालें!

म्हाळसा० : आणि बाईसाहेब मला म्हणाल्या, पुण्यास आल्यावर दर्शनाकरितां मीं तुमच्या देवळांत आल्यावाचून राहणार नाहीं.

दुर्गा० : म्हणून म्हणतें, मारुतीपुढचें ह्या भिकंभटानें कांहीं घेऊं नये, असा पक्का बंदोबस्त एव्हांपासून केला पाहिजे.

भिकं० : पण मी कां म्हणून ऐकेन?—आतां कांहीं पूर्वीसारखा हा भिकंभट अप्रसिद्ध नाहीं. मला बापू ओळखतात, नाना ओळखतात, पुण्यांतले सगळे लोक ओळखतात. गारद्यांना भर चव्हाट्यावर खुनी म्हणणारा पठ्ठ्या मी, अशी माझी कीर्ति सर्व पुणें शहरभर आहे. शिवाय दादासाहेब जेव्हां मुंबईकरांकडे जाऊन मुंबईकरांना घेऊन पुण्यावर चाल करून येऊं लागले, तेव्हां मीं देवळांत रोज रुद्राभिषेक सुरू केला, आणि माझ्या अनुष्ठानामुळें तळकोंकणांत शिंद्यांनीं व पटवर्धनांनीं मुंबईकरांचा पराभव केला. तेव्हां आतां देवापुढें कोणी कांहीं ठेविलें तर त्याला शास्त्रीबुवांनाही हात लावूं नाहीं देणार, आणि काकूंनाही त्यांतला हिस्सा नाहीं देणार.—लढाईच्या वेळेला तेवढा मी आणि आतां वांटणी मागायला तेवढ्या ह्या तयार!—पुन्हां दुसरी लढाई झाली तर मी—

(चमकशास्त्री येतो.)

चमक० : आतां पुन्हां लढाई होत नाहीं आणि कांहीं नाहीं.—मिटला, सगळा तंटा मिटला, आणि भाऊबंदकी संपली. मी आतांच नानांचें व बापूंचें दर्शन घेऊन आलों. सांडणीस्वारानें ताजी बातमी आणली; मुंबईकर आणि दादा-साहेब दोघेही तह करायला तयार आहेत, आणि बारभाईच्या मुख्य अटी त्यांना कबूल झाल्या आहेत. थोड्याच दिवसांत तहावर दादासाहेबांची सही होऊन येईल. तेव्हां बापू मला म्हणाले, शास्त्रीबुवा, श्रीमंत सवाई माधव-रावांच्या पहिल्या दरबाराला चांगला मुहूर्त शोधून काढा.

नमक० : आमच्या देवळाचें उत्पन्न सुटल्याशिवाय मुहूर्त कांहीं चांगला सांपडा-वयाचा नाहीं.—चमकशास्त्री तुम्हीं पोथ्या पुस्तकांतून चांगला मुहूर्त शोधून काढा, नाना-बापूंना मुहूर्त कळवायचें तेवढें मला सांगा, म्हणजे आणतों

दुप्पट उत्पन्न सोडवून.

चमक० : बापूंनी सांगितलेंच, तुमचा मारुती जागतें दैवत आहे. तेव्हां पूर्वींचें उत्पन्न सोडलें आहे, आणि दरबारच्या दिवशीं नवीनही पूर्वीच्या इतकेंच देऊं; म्हणजे तुमचीही आपआपसांत भाऊबंदकी राहणार नाहीं.

दुर्गा० व म्हाळसा० : मग कशाला आम्ही भांडतों?

नमक० : भिकंभट, आम्हांला अपेशी म्हणणाऱ्यांच्या घरोघर जाऊन आमचें हें नवें यश जर तू सर्वांना मोठमोठ्यानें ओरडून सांगितलेंस तर मारुतीच्या पूजेची वृत्ति तुला बक्षीस करून देऊं.

चमक० : चला नमकशास्त्री, ह्या मुहूर्ताच्या कामाला लागू प्रथम. चांगला मुहूर्त पाहिला पाहिजे. चला लवकर.

(जातात.)

## प्रवेश दुसरा

[स्थळ : दादासाहेबांची छावणी. दादासाहेब व आनंदी येतात.]

आनंदी० : माझी एवढी विनंती ऐकावयाची होती.

दादा० : तुझी विनंति ऐकून मीं माझें बदनाम करून घेतलें, आणि असा रानावनांत येऊन पडलों—रामशास्त्र्यांनीं सांगितलें देहांत प्रायश्चित्त पाहिजे म्हणून तेंच खरें—असा पळून येऊन मुंबईकरांच्या आश्रयाला राहिलों त्यापेक्षां जर मी नाना-बापूंच्या हातीं जिवंत सांपडलों असतों आणि त्यांनीं मला देहांत-प्रायश्चित्त दिलें असतें तर ह्या जन्मींच्या खुनाचे पातकांतून ह्या जन्मीं तरी मुक्त झालों असतों.

आनंदी० : मजकडे पाहून तरी असले विचार मनांत येऊं देऊं नयेत.—एक दोन लढाईंत अपेश आलें म्हणून काय झालें? अजून चांगले दिवस येणार नाहींत म्हणून कशावरून? शिवाय मुंबईकर जर म्हणत आहेत अर्धं राज्य लिहून दिल्यावर व पुण्यास गारद्यांच्या ऐवजीं त्यांचे कंपू ठेवून घेण्याचें कबूल

केल्यावर पुन्हा लढाईची जंगी तयारी करण्यास ते तयार आहेत, तर आपण तरी मागें कां घेतां ? मुंबईकरांच्या म्हणण्याला रुकार द्यावयाचा होता गडे. आपण राजवैभवाला कंटाळला असाल, पण माझ्याकरितां—निदान ह्यावेळीं माझ्या पोटी असलेल्या आपल्या पुत्राकरितां—मुंबईकरांच्या म्हणण्याला संमति द्यावयाची होती. कांहीं करा पण पुन्हां एकवार पुण्यास पेशवे आपण व्हा, थोड्या महिन्यांनीं आपणास होणाऱ्या बालपेशव्यांचे सवाई बाजीराव असें नांव ठेवून त्याला गादी अर्पण करा. आणि नंतर पाहिजे तर स्नानसंध्या करीत बसून पुण्यास धर्ममार्गास लागा.

दादा० : मला ह्या सर्व उलाढालींचा कंटाळा आला आहे—तुझ्या नादीं लागून मीं माझ्या पुतण्याचा खून केला, आणि आतां जर मी तुझ्या नादीं लागलों आणि मुंबईकरांना पुन्हा भरीस घालून त्यांच्या सर्व अटी कबूल करून जर पुन्हां लढाईची तयारी केली, तर पेशवाईवर मीं माझ्या हातानें गाढवाचे नांगर फिरवल्यासारखें होईल. महादजी शिंद्यांनीं काल असें लख्ख बोलून नाहीं का दाखविलें ? आज महादजी व मुंबईकर पुन्हां आले कीं शिंदे सांगतील त्याप्रमाणें तहनाम्यावर मी निमूटपणें सही करणार.

आनंदी० : पुण्यास असतांना त्या रामशास्त्र्यानें भंडावलें होतें आणि आतां येथें शिंदे उपदेश करायला आले आहेत.—आम्हांला त्या माधवानें आणि नारायणानें कैदेंत टाकलें होतें त्या वेळेला ह्या उपदेशकांनीं तोंडें कोठें काळीं केलीं होतीं कोण जाणें! आले हे महादजी शिंदे. आतां तहनाम्यावर सही होणार.—गडे, आजच्या दिवस तरी सही करूं नये.

(महादजी शिंदे येतो.)

महा० : दादासाहेब, मुंबईकर पलीकडच्या तंबूंत येऊन बसले आहेत, आणि तहनाम्याचे सर्व कागद लिहून तयार आहेत.—राज्यकारभारांतलें मन आपण काढलें असून आपल्या देहाचें सार्थक करण्याचे मार्गाला आपण लागणार, हें ऐकून आपल्या छावणींतील सर्व लोक आपले धन्यवाद गाऊं लागले आहेत.

दादा० : मला बरें म्हणणारा जगांत कोणी उरला आहेसें मला वाटत नाहीं.—बारभाईकडील सर्वांनीं मला शिव्याशाप द्यावेत हें रास्तच आहे. मुंबईकरांच्या लोभाचे कोड पुरवावे तसे मीं पुरविले नाहींत म्हणून तेही मजवर नाराज असणारच. मला आतां कोणी इष्टमित्र उरला नाहीं—कोणी तरी मला मनापासून चांगला म्हणत असेल काय ?

महा० : सरकार, आम्हां सर्वांच्या बोलण्यावर आपला विश्वास नसणें साहजिक आहे—पण रामशास्त्री तर खोटें नाहीं ना बोलावयाचे ?

आनंदी० : खोटे न बोलायला काय झालें त्यांना ? इकडून आपल्या पुतण्याचा खून करण्यांत आला, असें धडधडीत खोटें त्यानें पुण्यास प्रत्येकापाशीं सांगितलें.

महा० : जसे मनांत असेल तसे रामशास्त्री बोलतात. आंत एक, बाहेर एक असा भेद त्यांचेजवळ नाहीं. रामशास्त्री आजकाल आमचे छावणींत आहेत. ह्या बाजूच्या तीर्थयात्रा करण्यांत इतके दिवस त्यांनीं घालविले व आतां स्वगृहीं माहुलीला जाणार आहेत. इतक्यांत तह होणार व सरकार पेशवाई-वरचा हक्क सोडणार ही बातमी ऐकून ते काल छावणींत आले. दादासाहेब तहावर सही करणार हें खरें आहे, असें मीं सांगितल्याबरोबर राघोबादादांना एवढी वरी वासना झाली, अशी वाणी ते एकदम वदले ! तेव्हां म्हणतों सरकार, शुभस्य शीघ्रं; पलीकडच्या तंबूत जाऊन तहनाम्यावर सही करण्यास विलंब करूं नये.

दादा० : महादजी, मला शुभ आणि अशुभ दोनही सारखींच आहेत. युद्धांत ज्याला अपेश आलें, त्यानें पुढें शुभाशुभाची पर्वा कशाला करावी ?—तथापि तहनाम्यावर सही करून कर्मकटकटींतून केव्हां सुटेन असें मला झालें असल्यामुळें आपण सांगाल त्या कागदावर सही करण्यास मी तयार आहें. चला, माझी ना नाहीं.

(दादासाहेब व महादजी जातात.)

आनंदी० : ह्या रामशास्त्र्यानें अखेर येथेही आपला दावा साधला अं—ह्या मेल्याचें नांव ऐकण्याबरोबर काय करूं नि काय नको असें मला होऊन जातें ! हा आमच्यामागें असा हात धुऊन कां लागला आहे, कोण जाणें ! आम्ही त्याची न्यायाधीशाची जागा काढून घेतली नाहीं, दरबारांतला त्याचा मान कमी केला नाहीं; त्यानें दिलेला एखादा निकालही फिरविण्याचें आमच्या स्वप्नींही आलें नाहीं; उलट तो जर आम्ही म्हणत होतों त्याप्रमाणें आम्हांस प्रायश्चित्त देऊन आमच्या बाजूचा झाला असता तर मोठी लढाई जिंकणाऱ्या सरदारालाही न मिळणारी जहागीर आम्हीं त्याला दिली असती. पण स्वतःचें नाक कापून त्यानें आम्हांला अपशकुन आतांपर्यंत एकसारखा केला !—ह्याच्या ह्या अधमपणाला नांव तरी कोणचें द्यावें ? ‘के नाम एते न जानीमहे.’ साधली —आमच्या पूर्वजन्मींच्या वैऱ्यांनीं अखेर साधली !—त्या गंगटीचा पोर

पेशव्यांच्या गादीवर बसणार; नानाबापूंच्या हातीं सर्व अधिकार जाणार, आणि रामशास्त्र्यांसारखे माथेफिरू आमची अप्रतिष्ठा सर्व आबालवृद्धांस सांगत फिरणार! नाहीं, माझ्यानें ह्या गोष्टी सहन करवत नाहींत—माझ्या पोटांत असलेल्या सवाई बाजीरावा, तुझ्या मातेचा हा विलाप कान देऊन ऐक, आणि तुझ्या शत्रूंचा पक्का सूड उगविण्याची तयारी एव्हांपासूनच कर. तुझ्या आईच्या ह्यापुढील खटपटीनें पेशवाईचें पद जर तुला मिळालें नाहीं, तर अमक्याचें सहाय्य कसें घेऊं, तमक्याची मदत कशी मागूं, असल्या वेडगळपणाच्या कल्पना सूड उगविण्याच्या वेळीं तुझ्या पित्याप्रमाणें मनांत देखील आणूं नको; पाहिजे तें कर, कोणालाही बोलावून आण, कोण पाहिजे त्याच्या हातावर पेशव्यांच्या कुळांत जन्मास आल्याचें उदक सोड, पण आम्हांला पेशवाईस अंतरावयास लावणाऱ्या बारभाईंची घरें जमीनदोस्त करण्यास चुकूं नको; असा सूड उगवितांना बारभाईंबरोबर अखेर भाऊबंदकीमुळें महाराष्ट्राचेंही वाटोळें करण्याचा प्रसंग आला तरी मागें पुढें पाहूं नको; असा तुला माझा-ह्या आईचा गर्भावस्थेंतच उपदेश आहे...(जाते.)

## प्रवेश तिसरा

[स्थळ : शनवारवाडा. दरबारचा महाल. नाना, रामशास्त्री, चमकशास्त्री, शिंदे व इतर सरदार बसले आहेत. बापू तान्हुल्या सवाई माधवरावाला हातांत घेऊन येतात. भालदार चोपदारांचें ललकारणें होऊन खडी ताजीम देण्यांत येते. बापू मुलाला घेऊन गादीवर बसतात व सर्वांचे मुजरे होतात.]

नाना० : श्रीमंत सवाई माधवराव यांच्या पहिल्या दरबाराचा दिवस इतक्या लवकर येईल, असें बारभाईंपैकीं कोणासही श्रीमंतांच्या नांवाची द्वाही फिरवितांना वाटलें नव्हतें. परमेश्वरी कृपेनें तो दिवस आज उगवला आहे.

गृहकलह सुरू करून दादासाहेबांनीं सर्वांचाच नाश करण्यास प्रारंभ केला होता; पण बापूंच्यासारखे मार्गदर्शक मुत्सद्दी आम्हां सर्वांच्या सुदैवानें त्या वेळीं बारभाईंच्या कारस्थानाचा बोजा शिरावर घेण्यास पुढें आले. हरिपंत फडके, शिंदे, पटवर्धन ह्यांच्यासारख्या सरदारांनीं आपल्या तलवारी बारभाईकरितां म्यानांतून बाहेर काढल्या, आणि रामशास्त्र्यांसारख्या महात्म्यांनीं सत्याचा पक्ष उचलून धरून महाराष्ट्रांतील आबालवृद्धांच्या मनांत बारभाईंना हस्तें परहस्तें मदत करण्याची सुबुद्धि उत्पन्न केली. त्या सर्वांच्या यशाचा कळस म्हणजे आजचा हा दरबार होय. दादासाहेबांनीं पेशवाईवरील सर्व हक्क सोडून दिला आहे. श्रीमंत सवाई माधवराव यांना पेशवे मानण्याचें कबूल केले आहे व बारभाईंच्या ह्या तहनाम्याचे कारस्थानास ह्याउपर अडथळा न करण्याचें वचन दिलें आहे. ह्या तहनाम्याचे कागद सर्वांच्या सहीशिक्क्यानिशीं शिंद्यांनीं आज दरबारांत आणले आहेत, आणि शिंद्यांचेच इच्छेवरून हे कागद आतां रामशास्त्र्यांकडून श्रीमंतांना अर्पण करण्यांत येणार आहेत.

बापू० : ह्या बाल श्रीमंतांच्यातर्फे रामशास्त्र्यांसारख्या निःस्पृह व तपस्वी विद्वानांचे आशीर्वाद पदरांत घेण्यापूर्वी सर्व दरबारी मंडळीला मला एक विनंती करावयाची आहे. बारभाईंचा मार्गदर्शक म्हणून बाल श्रीमंतांना घेऊन ह्या ठिकाणीं बसलों नाहीं. ह्या गादीचा एक सर्वांत वृद्ध नोकर म्हणून मला आपण हा मान दिला आहे. माझ्या आयुष्यांत मीं गृहकलह बरेच पाहिले आहेत. दिल्लीच्या बादशहांच्या गृहकलहाचा मला प्रत्यक्ष थोडासा अनुभव आहे; निजामच्या गृहकलहांत मला कित्येक वेळां पडावें लागलें आहे; आणि पानिपतच्या पूर्वींच्या व पानिपतनंतरच्या महाराष्ट्रांतील सर्व गृहकलहांत कोणच्या ना कोणच्या तरी बाजूनें मी स्वतः काम करीत आलों आहें. ज्या गृहकलहाचा शेवट आजच्या ह्या दरबारानें होत आहे, असल्या गृहकलहाची तोड पूर्वींच्या इतिहासांत मला तर आठवत नाहीं. भाऊबंदांना मारून गादीवर बसण्याचा नीचपणाचा कित्ता औरंगजेब बादशहानें ह्या देशास घालून दिला, आणि तोच कित्ता राघोबानें गिरविला. पण दिल्लीहून पुण्याचें पाणी कांहीं निराळेंच असल्यामुळें औरंगजेबाप्रमाणें गादीचा उपभोग राघोबाला घेतां आला नाहीं. राघोबाचें परिपत्य पेशव्यांच्या घराबाहेरच्या बारभाईंनीं मिळून केलें, हें आमच्या महाराष्ट्रांतील गृहकलहाचें एक विशेष स्वरूप आहे. 'बारभाईचा कारभार' दिल्लीस आजपर्यंत कोणच्याही गृहकलहानंतर चालला

नाहीं; निजामशाहींत कोणच्याही गृहकलहानंतर राजघराण्याबाहेरच्या पुढाऱ्यांचा कारभार स्थापला गेला नाहीं. ताराबाईच्या गृहकलहानंतर बारभाईच्या कारस्थानास सुरुवात झाली नाहीं. पेशव्यांचें घराणें नशीबवान असें मी म्हणतों, याचें कारण ह्या घराण्यानें महाराष्ट्राचें साम्राज्य चोहोंकडे स्थापलें इतकेंच नव्हे, तर आज महाराष्ट्रांत बारभाईचा कारभार सुरू होण्यास ह्याच घराण्यांतला गृहकलह कारणीभूत झाला आहे. ज्या घराण्याचे दुर्गुणही आज महाराष्ट्रांतील राजसत्तेस नवीन वळण देण्यास कारणीभूत होतात. त्या घराण्यास नशीबवान कां समजूं नये? एका व्यक्तीच्या हातांत राजसत्ता गेल्यानें गृहकलह सुरू होतो व पुढें गृहकलहानें सर्व देश पारतंत्र्यांत बुडतो, असा इतिहासाचा अनुभव आहे. पण राघोबाच्या गृहकलहामुळें महाराष्ट्रांत एका व्यक्तीच्या राजसत्तेला आळा बसला असून, 'बारभाईचा कारभार' आपण सर्व दरबाऱ्यांनीं सुरू केला आहे. राजसत्तेंतील एका व्यक्तीच्या प्राबल्याचा रोग आज आपण समूळ उपटून टाकिला आहे; आणि ह्यापुढें ही गाडी बारभाईच्या कारभाराचे मर्यादेमुळें आमच्या शत्रूंना भीतीनें कांपावयास लावल्याशिवाय राहाणार नाहीं. महाराष्ट्राचें स्वराज्य व साम्राज्य ह्यापूर्वी एका व्यक्तीचें किंवा एका घराण्याचें होतें; तें आतां सर्व दरबाऱ्यांचें—बारभाईचें—झालें आहे. राघोबाच्या गृहकलहामुळें बारभाईच्या कारभाराचें रोप ह्या भूमीत रोवलें गेलें, आणि ह्यापुढें वृक्षाचीं मुळें ह्या भूमींत खोल जाण्यास फारसा वेळ लागणार नाहीं, ह्याची साक्ष शास्त्रीबुवांच्या हातांत असलेला हा तहनाम्याचा कागद पटवीत आहे. तेव्हां ह्या श्रीमंतांबरोबरच बारभाईच्या कारभारालाही शास्त्रीबुवांनींही आशीर्वाद दिला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

राम० : बालश्रीमंतांबरोबरच बारभाईच्या कारभाराचें यश वृद्धिंगत होवो असा सर्व वेदांचा, सर्व शास्त्रांचा आशीर्वाद ह्या गादीला आहे. बारभाईची खेती फळास येत नाहीं, अशी एक जुनी म्हण आहे; ती म्हण बारभाईच्या कारभाराच्या ह्या यशानें आज खोटी ठरली आहे. आमच्यांतील आपापसांतील तंटे—मग ते व्यक्तिविषयक असोत—जातीविषयक असोत—किंवा धर्मविषयक असोत—हे तंटे विकोपास जाऊन जर आमच्या धर्माचें व देशाचें नुकसान होऊं नये अशी इच्छा असेल, तर खेड्यांतील खेतीपासून तों साम्राज्याच्या सत्तेपर्यंत सर्व लहानथोर प्रसंगीं पंचांनीं—बारभाईनीं मिळून कामें करण्याचें वळण स्वतःला व इतरांना लावण्याचा हट्ट धरावा. व्यक्ति

तितक्या प्रकृति असावयाच्याच; चार भांडीं एका ठिकाणीं आलीं म्हणजे एकमेकांवर आदळावयाचींच. पण असे भेद ओळखतांना व एकमेकांवर आपटतांना दुसऱ्याचा चक्काचूर करण्याच्या दुष्ट बुद्धीचा जर विटाळ होऊं दिला नाहीं तर बारभाईची खेती एका व्यक्तीच्या खेतीहून बारापट अधिक उत्पन्न देणारी होते, हें तुमच्या निदर्शनास तेव्हांच येईल. प्रत्येक गोष्टीप्रमाणें भांडणालाही मर्यादा असली पाहिजे. ज्या भांडणामुळें भांडण करणाऱ्या दोनही पक्षांचा नाश होणार अशीं चिन्हें दिसू लागतात तें भांडण एकदम थांबविलें पाहिजे. अभ्युदयाकरितां भांडण भांडावयाचें असतें; अभ्युदयाचेऐवजीं जर उलट नाशच होऊं लागला तर भांडण तरी कशासाठी भांडावयाचें? स्वतःचा नाश झालेला पत्करला पण दुसऱ्याचा नाश होवो, अशा दुष्ट बुद्धीनें भांडण भांडणें म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराशींच तंटा करणें होय. राघोबादादानें मुळींच भांडावयाचें नव्हतें, असें मी म्हणत नाहीं; पण पुतण्याचा खून केल्यानें भांडण्याच्या मर्यादेचें उल्लंघन झालें. आधींच आमच्यांत देशस्थ, कोंकणस्थ, अमका ह्या जातीचा, तमका त्या जातीचा अशी नाना प्रकारच्या भांडणांची भुतें वावरत आहेत. हीं भांडणें मर्यादा सोडून भांडण्याचें उदाहरण जर खुद्द पेशव्यांनीं घालून दिलें तर सर्व देशाचा नाश होण्यास कितीसा वेळ लागणार? म्हणून दुष्टबुद्धि राघोबा पेशव्यांच्या गादीवर असेतों पुण्यास पाणीही प्यावयाचें नाहीं अशी मी प्रतिज्ञा केली. राघोबाच्या दुष्ट बुद्धीबरोबर बेकीच्या रोगाला, बापू, नाना, तुम्ही बारभाईनीं हद्दपार केल्यामुळें मला पुण्यास पुन्हा एकवार यावेंसें वाटलें; माहुलीस जाऊन परमेश्वराचे चिंतनांत अखेरचा काळ घालवीत बसण्यापूर्वी ह्या नूतन श्रीमंतांचें मला दर्शन झालें; व बारभाईच्या—महाराष्ट्रांतील जन-समूहाच्या—सद्गुणांच्या कारभाराचा हा दरबार पाहण्याचा योग आला; हा परमेश्वरी अनुग्रहच मजवर झाला असें मी समजतों. महाराष्ट्रांत सर्वांची एकी अशी निरंतर नांदो व बालश्रीमंताबरोबरच बारभाईच्या कारभाराचें यश रोजचे रोज वाढीला लागो, अशी परमेश्वराची करुणा भाकून महादजी शिंद्यांनीं आणलेला हा तहनाम्याचा कागद श्रीमंतांचे चरणीं मी अर्पण करितों.

(पडदा.)

समाप्त

IRBK-0122685